# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३४ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त// (ऑनलाईन अॅपव्दारे) दिनांक : २५/०८/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**२५/०८/२०२० मंगळवार** रोजी सकाळी **११**.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे) स्थायी समिती सभापती अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | पाटील राजेंद्र झिपरु |
| ढेकळे सदाशिव गणपत | देशमुख प्रतिभा गजानन |
| पोकळे दिलीप बबनराव | काळे रेश्मा कुंदन |
| कोल्हे प्रविण रामदास | लढढा नितीन बालमुकुंद |
| खडके सुनिल वामनराव | भंगाळे विष्णु रामदास |
| सनकत चेतन गणेश | बरडे नितीन मनोहर |
| सोनवणे मुकुंदा भागवत | शेख सैईदा युसुफ |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी व श्री.सुनिल गोराणे, नगरसचिव उपस्थित होते.

**वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** आजच्या ऑनलाईन सभेमध्ये सर्व सदस्यांचे स्वागत आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे कि सर्वांनी वंदेमातरम साठी उभे राहायचे आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** माझी एक विनंती आहे कि, सभागृहातील जे सर्व ए.सी. आहेत ते बंद करावेत आणि संपुर्ण दरवाजे उघडे ठेवावे. याकरीता की कोरोना व्हायरस चा प्रादुर्भाव होतो .

**नगरसचिव :-** आजच्या ऑनलाईन सभेमध्ये सर्व सदस्यांचे स्वागत आहे. आजच्या या सभेमधील विषयपत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.२२/०५/२०२० रोजी सकाळी ११.०० व दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.२२/०५/२०२० रोजी सकाळी ११.०० व दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** कोवीड- १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्यांबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री. नितीन लढढा :-** सर्व भांडवली बांधकामावर खर्चाच्या संदर्भात राज्य शासनाने ज्या सुचना निर्गमित केलेल्या आहे. परंतु माझं म्हणणं आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचा जो फंड आहे. त्याच्या संदर्भात ते निर्बंध लागु होतील का ?

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्य नितीन भाऊंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. शासनाचा जो जी.आर. आहे. त्यात नविन कामांना मंजुरी देतांना काही बंधन घातलेली आहेत. परंतु त्याच्यामध्ये शासनाचा निधी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी असा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे त्याबाबत थोडी संदिग्धता आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु याबाबतीत आपण मा.महापौरांशी त्या वेळेस चर्चा करुन एक प्रस्ताव आपण राज्य शासनाला पाठविलेला आहे की , महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पामध्ये ज्या ज्या बाबींसाठी तरतुद असेल आणि प्रत्यक्ष आम्हाला निधी उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नातुन तर अशी कामे करण्यासाठी त्याला राज्य शासनाची मनाई नसावी. याच्या बद्दल आपण प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याच्याबाबत आपण रिमाईंडर ही पाठविलेले आहे. परंतु अद्यापपावेतो राज्य शासनाकडुन अश्या प्रकारच्या कोणत्याही सुचना आलेल्या नाहीत. परंतु एक मत त्याच्यातुन निश्‍चित होतं की, राज्य शासन ज्या वेळेला निर्णय घेते त्या वेळेस राज्य शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना वाटप होणारा निधी याच्यासाठीच तो प्रामुख्याने लागु होणार आहे. आता अनेक अश्या महानगरपालिका आहे ज्यांच्या स्वत:चे उत्पन्न खुप मोठं आहे. त्यामुळे अश्या वेळेला सरसकट महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या उत्पन्नामधुन होणाऱ्या कामांना सुध्दा प्रतिबंध घालणं हा शासनाचा उद्देश असावा अस वाटत नाही. परंतु आपल्याला त्यांच्याकडुन काही मान्यता आलेली नाही. परंतु आपण जी अति अत्यावश्यक कामं आहे. आरोग्य असेल, पाणी पुरवठा असेल. किंवा दवाखाना विभागाकडील असतील. तर तिच कामे सद्या आपण हाती घेत आहोत आणि आपण पाठपुरावा करत आहे त्याच्या बाबतीमध्ये आणि मला खात्री आहे की, राज्य शासन त्याच्या बाबतीत निश्‍चित संमती आपल्याला देईल.

**श्री.नितीन लढढा :-** मा.आयुक्त महोदय, मला ऐवढं म्हणायचे आहे की, राज्य शासनाकडे आपण पत्र व्यवहार केलेला आहे. राज्य शासनाकडुन कदाचित उत्तर मिळणे संदर्भात विलंब ही होऊ शकतो. परंतु जळगांव महानगरपालिका सारख्या ज्या इतर महानगरपालिका आहेत. त्या महानगरपालिकांच्या आयुक्तांना आपण स्वत: फोन लावुन याच्या संदर्भात चर्चा केली का कि, तेथे त्यांनी काय निर्णय घेतलेले आहेत. त्यांनी जर का, आपल्या स्वयं निधीतुन अशी कामे सुरु केलेली असेल. तर आपण ही ते अपेक्षित धरून ज्या पध्दतीने इतर महानगरपालिका निर्णय घेत आहे. तर आज आपल्याकडे परिस्थिती अशी आहे की, संपुर्ण जळगांव शहरात आपण बघाल तर रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. एकवेळ असा असेल की आपल्याकडे निधी नाही आणि आपण कामं करु शकत नाही तो भाग समजु शकतो. परंतु निधीची उपलब्धता आहे आणि निधीची उपलब्धता असुन सुध्दा आपण सामान्य नागरीकांना न्याय देऊ शकलो नाही. तर ते कुठेतरी मनाला योग्य वाटत नाही. या अनुषंगाने आजच आपण आपल्या स्तरावर काही महानगरपालिकेच्या मा.आयुक्त साहेबांना विचारून चर्चा करून तश्या पध्दतीचा निर्णय त्यांनी घेतलेला असेल. तसा निर्णय महासभेसमोर आपण ही पाठवावा जेणे करून त्याच्या वर विकास कामांचे संदर्भात जे प्राधान्य क्रमाने असलेले कामं असतील ते मार्गी लावण्याच्या संदर्भात काही तरी ठोस निर्णय घेता येईल.

**मा.आयुक्त :-** माझ यापुर्वीच काही महानगरपालिकेच्या आयुक्तांशी किंवा त्यांच्या इंजिनिअरींग डिपार्टमेंटशी चर्चा झालेली आहे. सर्व साधारणपणे महानगरपालिका स्वत:च्या उत्पन्नातुन जी काही कामं त्यांनी बजेट मध्ये प्रोव्हीजन केलेली असेल. अशी कामे घेण्याच्या संदर्भामध्ये सर्वांमध्ये एकमत आहे की, राज्य शासन त्याबाबतीत करणार नाही. हा फंड वेगळा आहे. त्याचा परिणाम अर्थातच राज्य शासनाच्या निधी वर किंवा राज्य शासनाच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होणार नाही. तसं त्याचं जर इम्प्लाईड मिनींग आपण विचारात घेतल. त्याच्यात अंर्तभुत याचा हेतु हाच आहे की, राज्य शासनावर येणारा आर्थिक बोजा या वर्षी नव्याने निर्माण करु नये म्हणुन राज्य शासनांच्या कामांना ते निर्बंध लागु राहतील. परंतु महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नामधल्या कामांना ते निर्बंध लागु राहणार नाही आणि याच पध्दतीने बहुतांश महानगरपालिका पुढे जात आहे. आपणही त्याच पध्दतीने करत आहे. सद्या तरी याच्यामध्ये एक दिसत आहे की, नविन कामांच्या संदर्भात हे आदेश आहे म्हणुन देखभाल दुरुस्तीची जी कामं आहे, मेनटेनंन्सची जी कामं आहे, रिपेअरची जी कामं आहे. गटारी रिपेअरचे असेल किंवा आता जो आपण मुद्दा उपस्थित केला. रस्त्यांच्या दुरुस्तीचा विषय असेल. त्याच्या वर आपला खर्च करण्यात कुठलीही अडचण नाही. ते आताही आपण करीत आहोत भविष्यात सुध्दा आपण करणार आहोत. फक्त जी कॅपीटल वर्कस आहे, नविन भांडवली कामे हाती घेणार आहे. त्याच्या बाबतीत थोडी साशंकता आहे. पण मला वाटत की, पावसाळा संपेपर्यंत त्याही बाबतीत आपल धोरण क्लिअर होऊन जाईल. आणि ज्या वेळेला आपल्याला नविन कामे सुरु करायचे आहेत. तो पर्यंत आपल्या ह्या सगळया अडचणी दुर झालेल्या असेल. सद्या तरी आपल्याला लोकांच्या दृष्टीने जी अत्यावश्यक सेवा आहेत. त्या पुरविण्यामध्ये राज्य शासनाच्या या ४ मे च्या बंधनाची काही अडचण येणार नाही. अशी मला खात्री आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, आयुक्त साहेबांनी जे निवेदन केलेल आहे ते वस्तुस्थिती धरून आहे परंतु माझं त्याच्या अनुषंगाने म्हणण आहे. रस्ते दुरुस्तीच्या अनुषंगाने आजच्या सभेत काही प्रस्ताव आहे. खडीकरणाचे आहे आणि त्याच रिपेअर करणे संदर्भात डांबरीकरणाचे सुध्दा प्रस्ताव प्रशासनाने तयार केलेले आहे. परंतु सदर रस्त्यांची परिस्थिती रिपेअरींगच्या लायक सुध्दा राहिलेली नाहीत. ज्या पध्दतीने आपण ४-५ कोटीचे रिपेअरींग वर खर्च करण्याच्या संदर्भातला म्हणजे आजच्या वस्तुस्थितीला रिपेअरींग करणे सुध्दा तेवढे ही गरजेचे आहे. परंतु रिपेअरींगचा हा खर्च वारंवार करावा लागतो आणि जर कधी आपल्याकडे निधीची उपलब्धता आहे. तर प्राथमिकतेने ज्या रस्त्यांची वर्दळीचे जे रस्ते आहे. रिपेअरींगच्या सोबत, म्हणजे रिपेअरींग आज करुन त्याच्या वर खर्च वाया घालविण्या पेक्षा त्याचे जर नव्याने डांबरीकरणाचे प्रस्ताव केले. तर ते दिर्घकाळ टिकेल आणि मनपाच्या आर्थिक निधी मध्ये ही त्याची मोठी बचत होईल नाही तर हा ४-५ कोटीचा खर्च केल्यानंतर अजुन पावसाळा संपायला दिड ते दोन महिन्याचा कालावधी आहे. आपण मुरूम आणि खडी याचे मिश्रण करून खड्डे बुजविणार आहोत. पुन्हा एक दोन पाऊस झाले तर हा खर्च वाया जाऊ शकतो. त्याच्या वर आपण त्याला डांबरीकरण करुन त्याला प्रोटेक्ट करणार आहोत. परंतु ते प्रोटेक्ट करतांना काय झालेल आहे की, एखाद्या रस्त्यावर १० ते २० टक्के प्रमाणावर जर खड्डे असतील. तर ते मेनटेन करण्याच्या दृष्टीने ती योग्य भुमिका असेल. परंतु आज परिस्थिती कशी आहे. रस्ते मुळात २० टक्के शिल्लक राहिलेले आहे आणि ८० टक्के खड्डे झालेले आहे. ८० टक्के खड्डे जर आपण बुजविण्याच्या संदर्भातला निर्णय घेतला, तर त्या रस्त्यांना ठिगळ लावल्या सारखी परिस्थिती दिसेल, आणि मग तेथुन वाहन जातांना एखाद्या स्पिडब्रेकर वरून वाहन जाते अशी परिस्थिती दिसेल. ते केल्यानंतर ही या सामान्य नागरीकांना त्याच्या मधुन दिलासा मिळेल किंवा त्यांच समाधान होईल अशी वस्तुस्थिती राहणार नाही. या बाबतीतही आपण विचार करायचा आहे. आपल्याकडे जी आज निधीची उपलब्धता आहे. त्याच्या मध्ये मा.पदाधिकाऱ्यांसोबत बसुन त्यांच्याशी चर्चा करून जे रस्ते रिपेअरींगच्या लायक नाही. ज्या रस्त्यांचे रिपेअरींगने काम भागु शकेल अश्यांच्या बाबतीत तसा निर्णय घ्यावा आणि जिथे रस्ता संपुष्टात आलेला असेल. त्याच्या बाबतीत डब्ल्यु.बी.एम.पासुन तर नव्याने डांबरीकरणाच्या संदर्भात भुमिका स्विकारावी जेणे करुन नागरीकांना ही दिलासा मिळेल. मनपाचा पैसा ही वाचेल आणि नागरीकांना ही त्याच समाधान मिळेल.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब.

**मा.आयुक्त :-** पावसाळयानंतर जेव्हा आपल्याला डांबरी पध्दतीने जेव्हा पॅचवर्क करायच असेल. तेव्हा किंवा अन्य पध्दतीने असेल हे करत असतांना त्या त्या रस्त्याची अवस्था ही खरोखर रिपेअरेबल आहे किंवा आता पुर्ण रस्त्याचा १०० टक्के सरफेस आपल्याला दुरुस्त केले पाहिजे. याची पाहणी सिटी इंजिनिअर डिपार्टमेंट मार्फत आपण करु.त्या वेळेला सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन आपला निधी किंवा आपला उपलब्ध पैसा अतिशय योग्य पध्दतीने कसा खर्च करता येईल, आणि मर्यादीत उपलब्ध निधी मध्ये आपण लोकांना जास्तीत जास्त चांगल्या पध्दतीची सेवा कशी देऊ. याच्या बाबतीमध्ये सर्व सन्मा.पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन आपण त्याचे धोरण ठरवु.या प्रमाणे आपण या वर्षाचा रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेऊ.

**मा.सभापती :-** बोला पोकळे साहेब, दिलीपभाऊ पोकळे बोला.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझा तोच विषय आहे. सदरचा हा जो शासन निर्णय आहे हा ४ मे २०२० चा आहे. शासन निर्णया मध्ये जो अंदाज घेतलेला आहे. शासनाने तो पुढील दोन तीन महिन्याचा घेतलेला आहे. मे, जुन,जुलै, ऑगस्ट त्याला चौथा महिना चालु आहे आता मग या शासन निर्णयाचा आज रोजी प्रभाव आहे का ? याच्या नंतर काही सुधारीत निर्णय आलेला आहे का शासनाचा कारण आपली २२ तारखेला मिटींग झालेली आहे. मागची २२/०५ ला, त्या मिटींगमध्ये हा विषय आलेला नाही. मा.आयुक्त साहेबांनी हा विषय १२/०५ ला मान्य केलेला आहे. मान्यता दिलेली आहे. मग जर अश्या परिस्थितीत शासनाने धोरण म्हणुन दोन तिन महिन्याचा विचार केलेला आहे. तर आजच्या तारखेला आपण ती चर्चा करत आहे या विषयाच्या संदर्भात ती संयुक्तीक आहे का ?

**मा.आयुक्त :-** हा जो आपल्याकडे आलेला जी.आर. आहे त्याची आपण अर्थिक परिस्थिती वर सर्व सन्मा.पदाधिकारींची चर्चेसाठी जी एक अनौपचारीक बैठक घेतली होती. त्याच्या मध्ये आपण या विषयावर सविस्तर चर्चा केली होती. त्याच्यावर आपण वाचन ही केलं होतं. परवाची जी महासभा झाली त्या मध्येही बेंच समोर सुध्दा आपण या विषयावर चर्चा केलेली आहे. दुसरा जो आपला मुद्दा आहे की, आताच्या परिस्थितीत हा निर्णय संयुक्तीक आहे का ? हा जो शासनाचा निर्णय आहे हा संपुर्ण आपल्या आर्थिक वर्ष २०२०-२०२१ साठी लागु आहे. जो पर्यंत शासन बदल करत नाही तो पर्यंत मार्च २०२१ पर्यंत आपल्याला ही बंधनं ही शासनाने घालुन दिलेली आहे आणि ही पुर्ण आर्थिक वर्षासाठी असल्यामुळं तर मार्च २०२१ पर्यंत त्याच अंमल चालु राहणार आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मग साहेब आपण असं गृहित धरायचे आहे की, प्रभागातील जे रस्ते आहे विकास कामे आहे आपण २१ पर्यंत प्रस्ताव ठेवु शकत नाही. २०२१ मार्च पर्यंत.

**मा.आयुक्त :-** आता जो सन्मा.सदस्य नितीन भाऊंनी जो मुद्दा उपस्थित केला होता तेच याच्या बाबतीमध्ये आहे. जरी हा आपल्याला मार्च २०२१ पर्यंत लागु असला की, नविन कामांची आपण कुठल्याही प्रकारची निविदा काढु नये किंवा मान्यता इंजिनिअर्सने देऊ नये. परंतु राज्य शासनाकडुन आपण एक मुभा अशी मागत आहे की, आपल्या महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीतुन जे काही नविन कामे हाती घ्यायची आहे. त्या बाबतीत राज्य शासनाचा आक्षेप नसावा. राज्य शासनाकडुन जो निधी उपलब्ध होण्यामध्ये जी मर्यादा आहे. त्याच्याच बाबतीमध्ये हा जी.आर. फक्त लागु असेल. महानगरपालिकेच्या निधिमधुन भलेही ते आपले वार्डा मधील दुरुस्तीचे कामे असतील, नविन कामं असतील, रस्त्यांचे कामं असतील, गटारचे कामं असतील. जर महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नातुन निधी उपलब्ध होत आहे आणि आपल्या बजेट मध्ये तरतुद असेल तर राज्य शासनाचा त्याच्या मध्ये आक्षेप नसावा. ती सर्व साधारणपणे सगळया महानगरपालिकांची एकमत आहे, आणि तसाच प्रस्ताव आपण पाठविलेला आहे. मला खात्री आहे की, आपल्या निधीमधुन या आर्थिक वर्षामध्ये नविन कामे सुरु करण्यामध्ये सुध्दा राज्य शासनाची कुठलीही अडचण येणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आपण जे म्हटले आता की, सिटी इंजिनिअर मार्फत सर्व्हे करावा शहरातील रस्त्यांचा, तर याच्या पहिले आपण निविदा काढल्या होत्या का रस्ते दुरुस्तीच्या ?

**श्री.डि.एस.खडके :-** यापुर्वी आपण ६ निविदा काढल्या होत्या. प्रभाग क्र.१,२, प्रभाग क्र.४,५, प्रभाग क्र.३,१६,१७, प्रभाग क्र.६ व ७, प्रभाग क्र.१०,११, १२ पार्ट, प्रभाग क्र.१३,१४ व १२ पार्ट, प्रभाग क्र.८ व ९, प्रभाग क्र.१५,१८, १९ मधील डांबरी रस्ते दुरुस्ती करणे बाबत निविदा काढलेल्या होत्या.

**श्री.नितीन बरडे :-** यातील किती कामे पुर्ण झालेले आहे. याचं सर्व्हे सिटी इंजिनिअर किंवा संबंधीत अधिकाऱ्यांनी केल का ? ते कामे झाले की नाही रस्ता दुरुस्तीचे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि याच्यावरती खर्च किती झाला आता पर्यंत.

**श्री.नितीन बरडे :-** किती महिन्यापुर्वी झाले होते हे रस्ते दुरुस्ती, तारीख सांगा मला.

**डि.एस.खडके :-** हा एक वर्षापुर्वीचा कार्यादेश होता. काही कामांचे बिलं झालेले आहे काही कामे अपुर्ण अवस्थेत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** याची साईट व्हिजीट केली होती का ? सिटी ईंजिनिअर म्हणा किंवा संबंधीत अधिकाऱ्यांनी की, कामं झाले आहे की, नाही झाले आहे.

**डि.एस.खडके :-** शहर अभियंता आणि ज्युनियर इंजिनिअरने व्हिजीट केली असेल असे अपेक्षित आहे. कारण मी आता त्या बद्दल काहीच सांगु शकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** कारण की, आयुक्त साहेब याच्यात काय झालेलं आहे. मी १२ नंबर प्रभागातली निविदा आहे याच्यात. मी पहिल्यापासुन पाठीमागे लागलेला आहे. तर साहेब आमच्या इंजिनिअरला आम्ही वारंवार सुचना केल्या की, हे रस्ते का दुरूस्त करत नाही. उदा.चर्च रोड, मायादेवी नगर, आमचे जे युनिट ऑफिस आहे. बांधकाम विभागाचे तर ते युनिट ऑफिस मधील रोटरी भवन पर्यंतचा रस्ता हा दुरुस्तीसाठी आम्ही इस्टीमेट मध्ये दिलेला होता. अद्यापपर्यंत ते रस्ते दुरूस्त झालेले नाही. मग त्याचे बिलं कसे काय बनले. आता पर्यंत माझ्या माहिती प्रमाणे ८ महिन्यापुर्वी टेंडर काढलेले आहे. रु.१,६५,२२,२४८/-चे, खर्च दाखविण्यात आलेला आहे रु.१,२४,००,६९३/- रुपयांचा मग शिल्लक रक्कम आणि हे रस्ते दुरूस्ती झालेली रक्कम, रस्त्यात दुरूस्ती झालेली आहे का ? की बोगस बिलं बनविले गेले. त्याच्या संदर्भात मी आज तुमच्याकडे ही तक्रार देत आहे. याची संपुर्णपणे चौकशी करण्यात यावी. आता तुम्ही ते २४ लाख म्हणा किंवा जे इतर टेंडर काढत आहे नविन, नविन टेंडर रस्ते दुरुस्तीचे काढत आहे. ते रस्ते कोणते घेणार काय घेणार. की याच्यातले झालेलेच रस्ते पुन्हा घेणार. आठ महिन्यापुर्वी हे टेंडर झाले साहेब, आज तुम्ही एस.पी. ऑफिस ते कोर्ट चौक चार महिन्यापुर्वी रस्ता दुरूस्ती केला होता. आता तुम्ही या रस्त्यावर जावुन बघा. तर तेथे किती खड्डे आहे, म्हणजे ते रस्ते कश्या पध्दतीने बुजवले गेले.याचे ऑडिट कोण करणार. आता पुढील होणारे रस्ते जर तुम्ही याचे ऑडिट करणार नाही तर आम्हाला आमच्या स्तरावर ऑडिट करुन तुम्हाला द्याव लागेल.

**डि.एस.खडके :-** भाऊ आता आपण जे टेंडर काढलेले आहे त्याची काल माहिती घेतली त्या अनुषंगाने मक्तेदाराचे नांव, कार्यादेश करणाऱ्याचे नांव, कार्यादेश रक्कम, झालेला खर्च आणि शिल्लक रक्कम हे आपल्याला देत आहे. आपले काही पर्टीक्युलर असेल तर मी,

**श्री.नितीन बरडे :-** हे माझ्याकडे डिटेल्स आहे. हे मी काढलं म्हणुन तुम्ही घेऊन आलेले आहे. मी हे चार दिवसापुर्वी काढलं म्हणुन तुम्ही घेऊन आलेले आहे. आयुक्त साहेब ते पहिले रस्तेच झालेले नाही ते कामच झालेले नाही आहे आमचे.

**डि.एस.खडके :-** भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब, हे लेखी तक्रार आहे माझी हे रस्ते दुरूस्ती आठ महिन्यापुर्वी झालेले आहे, आणि आजही शहरात आहे तशीच परिस्थिती आहे. तरी तुम्ही या कामांची चौकशी करण्यात यावी. हे जवळ जवळ दोन कोटीचे टेंडर काढले गेले होते आठ महिन्यापुर्वी.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे आज आपण रितसर तक्रार देत आहे ठिक आहे. परंतु आपण जो काही सभेमध्ये मुद्दा उपस्थित केलेला आहे की, त्या निविदेमधली काही रक्कम ही ऑलरेडी खर्च पडलेली आहे ,म्हणजे काम झालं आणि त्याची बिलं दिली गेली आहे. तर कुठल्या रस्त्यावर किती काम झालेल आहे. ते आपण ऑडिटर कडून त्याची तपासणी करु न घेऊ. आपण जे म्हणत आहे की, ४ महिन्यापुर्वी कामे झाली आणि आज रस्त्याची अवस्था पाहुन काम न झाल्या सारखं आहे. तर त्याची आताच्या सिटी इंजिनिअर कढुन आपण पाहणी करु न घेऊ आणि जर त्याच्यामध्ये अनियमितता आढळली तर त्याची दखल निश्चित घेता येईल. तुम्ही लेखी तक्रार देत आहेत. त्याचीही आपण चौकशी करु. परंतु ४ महिन्यापुर्वी झालेल्या रस्त्यांच्या बाबती मध्ये आता जी आपण रस्ता दुरुस्तीची कामं करत आहे. आता खडी आणि मुरुमाने आपण तात्पूरत्या स्वरुपात भरणार आहोत आणि पावसाळा संपल्यानंतर डांबरीकरणाने अश्या बाबतीमध्ये पुर्वी केलेल्या रस्त्यावरती किंवा त्याच रस्त्यावरती म्हणण्यापेक्षा त्याच ठिकाणावरती पुन्हा खर्च होणार नाही. याची आपण दक्षता घेऊ. कामाची जर प्रतवारी चांगली नसेल. त्याची जबाबदारी आपल्या ठेकेदारावर व इंजिनिअरवर निश्चित करता येईल.

**श्री.नितीन बरडे :-** पण सर आमचे ते पहिले रस्ते आहे तेच झाले नाही, ते कामच झाले नाही.

**मा.आयुक्त :-** आपण त्याची चौकशी करु. आता तुम्हाला सांगितलं कि सिटी इंजिनिअरने त्याच्यावर १ कोटी आणि काही तरी खर्च पडलेला आहे. आता काम झाली असं दिसत आहे . पण प्रत्यक्षात तुमचं म्हणण आहे की, कदाचित कामं झाली किंवा नाही झाली. आपण याची सगळी चौकशी करु त्याच्यातुन काय वस्तुस्थिती आहे ते आपल्या समोर येईल.

**श्री.नितीन बरडे :-** आमच्या प्रभागाचा परवा लोकमत मध्ये एक फोटो आला होता.पुल वाहुन गेल्याचा, तीन महिन्यापुर्वी आपले संबंधीत सिटी इंजिनिअर भोळे साहेब यांना मी दाखविलं होत. तर त्याच्यावर ५ लाख रु पये खर्च अपेक्षित आहे. तो खर्च आम्हाला मिळेल का ?

**मा.आयुक्त :-** सन्मा.सभापती, आता ज्या कामांच्या संदर्भामध्ये जे धोरण निश्चित करायचं म्हणतो कि जी शहरामधील विविध भागामधली अत्यावश्यक स्वरूपाची कामे असतील की, ज्याच्यामुळे आज खरोखर नागरीकांची गैरसोय होत आहे. अश्या कामांना आपल्याला निश्चितच प्राधान्य द्याव लागेल. आपण म्हणता जर ते काम असं आपल्या निकषात बसत असेल. तर त्याचा ही आपल्याला विचार करावा लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब,कसं आहे आता तेथे रस्ता नाही लोकांना जायला. तर आपल्या कोणता फंड उपलब्ध होईल का?

**मा.सभापती :-** प्रशासनाने जसं नितीन भाऊ म्हणत आहे. त्याप्रमाणे प्रत्यक्ष स्पॉटवर जावं. स्पॉट व्हिजीट करावी. तिथली गरज समजुन घ्यावी, आणि ते म्हणत आहे तशी जर खरोखर निकड असेल तर ताबडतोब तशी कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त :-** आपल्याला निधी म्हणजे म.न.पा.चाच निधी त्या ठिकाणी वापरावा लागेल. जी काही आपली अर्थ संकल्पात तरतुद आहे.

**श्री.नितीन बरडे :-** म.न.पा.चा निधी आहे का शिल्लक तुमच्याकडे साहेब ?

**श्री.चेतन सनकत :-** साहेब आवाज येत नाही. रेकॉर्ड मध्ये नोंद होईल का मग याची.

**श्री.डि.एस.खडके :-** भाऊ मी त्या पुलाची पाहणी केलेली आहे. तो पुल नविन तयार करणे आवश्यक आहे आणि जेव्हा मी माहिती घेतली नेमाडे साहेबांकडुन त्यांनी मला अशी माहिती दिली की, ते ४२ कोटी मध्ये ते काम प्रस्तावीत आहे. तर ते बि.ॲण्ड.सी मार्फत त्याची निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे. अशी मला माहिती मिळाली. परंतु जर ते ४२ कोटी मध्ये नसेल तर ते काम अत्यावश्यक आहे ते करणे भाग आहे. ते आपण मनपा निधी मधुन प्रस्तावीत करु.

**श्री.नितीन बरडे :-** ते पुलापर्यंत काम घेतलेल आहे. पण ते ४२ कोटींच काम होणारच नाही. तर तात्पूरती लोकांना व्यवस्था काय ? रस्ता बंद होईल ना तो आज रस्ता बंद झालेला आहे. पुल वाहुन गेलेला आहे पुलाची साईड वाहुन गेलेली आहे तुम्ही बघितलं.

**डि.एस.खडके :-** पुलाची पाहणी केलेली आहे मी तेथे ३ मिटर ते ३.५ मिटर पर्यंतचा पुल अस्तित्वात आहे. परंतु सेंटरला त्यात थोडा क्रॅक गेलेला आहे. त्याच्यावर जड वाहतुक होणार नाही, छोटया गाडया जातील. तात्पूरती दुरुस्ती करून काही फायदा नाही. तात्पूरती दुरुस्ती तेथे टिकणारच नाही. कारण ते कॉंक्रीट आहे आणि कॉंक्रीटला पुलाच्या सेंटरला पुर्ण क्रॅक गेलेला आहे तो. त्यामुळे तेथे नविनच पुल तयार करणे आवश्यक आहे. ४२ कोटी मध्ये शासनाकडे निधीसाठी मागणी प्रस्ताव झालेला आहे आणि शासनाकडे मंजुर झाल्यानंतरच आपण काही तरी निर्णय घ्यायला पाहिजे. अनुदानातुन काम प्रस्तावीत आहे आणि अनुदानातुन प्रस्तावीत असुन ते काम मनपा निधीतुन करायला आपल्याला काहीतरी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** खडके साहेब आपण ते ४२ कोटी येतील तेव्हा येतील. तो पुलापर्यंतचा विषय करा फक्त पुलाचा विषय करा की हे काम मनपा निधीतं होईल का ?

**डि.एस.खडके :-** पुलाच काम, आता साहेबांनी सांगितल, सर्व ४ मे च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने महासभेच धोरण मंजुर होईल त्यानुसार ते काम आपण प्रस्तावीत करु.

**श्री.नितीन बरडे :-** निधी आहे मनपाकडे, मनपाकडे निधी उपलब्ध आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** करता येईल की नाही करता येईल ? निधी आहे का ?

**डि.एस.खडके :-** करता येईल.

**मा.आयुक्त :-** महानगरपालिकेची आर्थिक स्थिती आपणास सर्वांना सुपरिचित आहेच. त्यामुळे त्याच्यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नसावी. परंतु या वर्षी जे काही अर्थसंकल्पामध्ये उत्पन्न अपेक्षित धरलेलं आहे. आता कुठ आपण अनलॉकच्या एक एक टप्पापुढे चाललेलो आहे, अजुनही सर्व आर्थिक व्यवहार पुर्ण क्षमतेने सुरु नाही झालेलेआहेत. त्यामुळे नेमका याचा या वर्षाच्या उत्पन्नावर किती परिणाम होईल याचा अंदाज आज बांधणं अवघड आहे. पण जो काही निधी आपल्याला लॉकडाऊनच्या नंतर आपली घरपट्टीची वसुली असेल किंवा शॉपींग सेंटर मधुन येणारी आपल्याला जी काही भाडयाची वसुली असेल. याच्या मधुन जो काही निधी असेल ती आपल्याला विकास कामांसाठी उपलब्ध होणार आहे. त्याच्यावर मी म्हटल्याप्रमाणे आपल्याला सर्व पदाधिकाऱ्यांना बसुन त्या उपलब्ध निधीचा आपल्या शहराची प्राथमिकता विचारात घेऊन आपल्याला त्याच नियोजन करावं लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** आता तर आपली महानगरपालिका कर्जमुक्त झालेली आहे. तर ३ कोटी रुपये वाचत असतील ना आपल्याला दर महिन्याला.

**मा.आयुक्त :-** या सगळयांचा विचार आपण बजेट करतांना केलेला आहे, आणि सुधारीत बजेट जेव्हा आपण येणाऱ्या डिसेंबर मध्ये करणार आहोत. तर आपण जे म्हणत आहे की, ३ कोटी रूपये वगैरे होऊनच आपलं ते सुधारीत बजेट होणार आहे. त्यावेळेला आपल्याला त्यावेळेची आर्थिक स्थिती अतिशय क्लियर होईल.

**श्री.नितीन लढढा :-** नाही पण सर अजुन ३ कोटी वाचता कुठे आहे. आपल्या अनुदानातुन ते ३ कोटीची कपात होत आहे. नितीन भाऊ ३ कोटी रुपये दर महिन्याला येणाऱ्या अनुदानातुन कपात होत आहे. परंतु मा.आयुक्त महोदय, जसं नितीन भाऊंनी सांगितल एखाद काम अत्यावश्यक असेल ज्याच्या मुळे नागरीकांचा जनसंपर्क तुटत असेल किंवा येणेजाणेच्या संदर्भात अडचणी निर्माण होत असतील. ज्या पध्दतीने आपल्या घरामध्ये काही खायला नसतं. तर पाहुणे आल्यानंतर आपण काही तरी व्यवस्था करून त्यांना पाहुणचार करतो. तश्या पध्दतीने काही तरी पाहुणचार आमच्या नितीन भाऊंचा विचार करायला हवं आपण आणि त्या दृष्टीकोणातुन त्याचं नियोजन करावं. जेणेकरुन ४२ कोटीत प्रस्तावीत असेल त्याच्या संदर्भात जो काही तातडीने आणि कमीतकमी खर्चा मध्ये जे काही नियोजन करता येईल. त्याच्या बाबतीने आपण प्राथमिकतेने त्याचा विचार करायला हवा.

**श्री.नितीन बरडे :-** नितीन भाऊ जर आपण कर्जमुक्त झालेले आहे. तर ते पैसं शिल्लक राहत असतील ना. आयुक्त साहेबांनी सांगाव. आयुक्त साहेब आपल्याला पैसे भरावे लागत आहे का ?

**मा.आयुक्त :-** मी म्हटल्या प्रमाणे याच्या मध्ये दोन गोष्टी आहे. एक ४२ कोटीच्या बाबतीत राज्य शासनाकडुन निर्णय अपेक्षित आहे. आतापर्यंत सकारात्मक, नकारात्मक असा कुठलाही नाही. चालु वर्षी निधी उपलब्ध होण्यामध्ये अडचण आहे हे बरोबर आहे. परंतु ४२ कोटीचा प्रस्ताव शासनाने या पुर्वी मान्य केलेला आहे. त्याचे निविदा होऊन प्रस्ताव आता अंतीम निर्णयावर आहे. आपण असे करु या की, आपल्याला हे ४२ कोटी जर राज्य शासनाकडुन मिळाले तर आपला हा प्रश्न आणि ४२ कोटी मध्ये अंर्तभुत असणारे प्रश्न सुटतील. परंतु जर समजा ४२ कोटी निधी उपलब्ध होण्यामध्ये जर अडचण आली, आणि त्याच्या मधील जर काही अति अत्यावश्यक कामं आपल्या निधीतुन घ्यायची जर वेळ आली. तर मात्र आज त्याच्या मध्ये Yes किंवा No चा निर्णय घेण्यासारखी आपली क्लियारीटी नाही. आपल्याला थोडे दिवस थांबाव लागेल. परंतु मी म्हटल्या प्रमाणे सुधारीत अर्थसंकल्पाच्या वेळेला आपल्याला निश्चित किती निधी उपलब्ध होणार आहे. त्याचा आपल्याला अंदाज येईल, आणि मग त्याच्यामधुन आपण आपली प्राधान्याची कामं हाती घेऊ. त्याच्या मध्ये आपण जसं म्हणत आहात तसं सर्व सहमतीनं, ज्याला आपल्याला प्राधान्य देणे आवश्यक असेल. तर आपण त्याला ही देऊ.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आपण, एक मिनीट भाऊ, साहेब आता आपण २४ लाखाचा मुरुम आणि खडीचे टेंडर काढत आहे. आता अंदाजीत २४ लाख रूपये लागत आहे. माझ्याकडे जो भाग आहे स्टेट बँक कॉलनी, पवन हिल्सचा, मला टेंडरची गरज नाही. मला फक्त महानगरपालिकेकडुन फक्त जे.सी.बी. आणि वाहनांची व्यवस्था पाहिजे. आता पर्यंत मी २०० ट्रॅक्टर मुरूम टाकला आहे. कधीच महानगरपालिकेच टेंडर नाही. मी महानगरपालिकेचे पैसे वाचविले आहे. मला कधी यंत्रणा भेटली तर मी अजुन १००-१५० ट्रॅक्टर मुरुम टाकीन तेथे. कच्चे रस्त्यांवर.

**श्री.नितीन लढढा :-** अत्यंत महत्वाचा विषय आहे नितीन भाऊंचा याच्यामध्ये महानगरपालिकेचा मोठा आर्थिक फायदा होत आहे . मुरूमांचे टेकडया त्यांच्या प्रभागातच आहे आणि ट्रान्सपोर्टेशन आपल्याला फक्त महानगरपालिकेच्या वाहनातुन आणि कामेही जी आहे महानगरपालिकेच्या रस्ते बुजण्याचंच काम आहे आणि दुसरे असे कि नितीन भाऊंनी प्रश्न उपस्थित केला. त्याच उत्तर आपण संक्षिप्तपणे टाळलं. जळगांव शहर महानगरपालिका ही कर्जमुक्त झालेली आहे का?

**श्री.नितीन बरडे :-** कारण की, आज सकाळ पेपरला मोठी पुरवणी आहे. कर्ज मुक्त झाली महानगरपालिका, मला तुम्ही सांगा कर्जमुक्त झाली की नाही.

**मा.आयुक्त :-** ज्या वित्तीय संस्थांकडुन आपण कर्ज घेतलेलं होत. याच्यातुन आपण मुक्त झालेलो आहोत. आपल्या वतीनं ज्या काही वित्तीय संस्थांनी आपल्याला कर्ज दिलेलं होत. ते कर्ज राज्य शासनाने भरले ते आपल्याला सर्वांना कल्पना आहे. आता राज्य शासनाने महानगरपालिकेला जे काही अगाऊ रक्कम दिली. पण म्हणु या त्याच्या बाबतीमध्ये जो काही राज्य शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय आहे. या प्रमाणे आपल्याला जी.एस.टी.च्या माध्यमातुन मिळणारे अनुदानातुन दर महा ३ कोटी रुपये हे राज्य शासन कापुन घेत आहे. आता राज्य शासनाचा ॲडव्हान्स म्हणु या, ते कर्ज नाही किंवा त्याच्या वरती कुठल्याही प्रकारचे व्याज नाही. यामुळे अश्या अर्थानं बघितलं तर आपण ज्या वित्तीय संस्थांकडुन कर्ज घेतल होतं. त्यामधुन आपण कर्ज मुक्त झालो हे निश्चित आहे. राज्य शासनाचा आपण काही देण लागतो. त्याला कर्ज म्हणायचे नाही कारण त्याच्यावर व्याज नाही. ही अगावु रक्कम राज्य शासनाने भरलेली आहे आणि आपल्याला दिलेली आहे, आणि आता राज्य शासनाला आपण दर महा ३ कोटी मधुन देत आहोत किंवा ते ३ कोटी राज्य शासन आपल्या निधीतुन परस्पर कापुन घेत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** म्हणजे दिड -दोनशे कोटी भरायचेच आहे आपल्याला.

**श्री.सुनिल खडके :-** बिन व्याजी आहे ते आता पर्यंत व्याज भरुन थकले आहे आपण.

**मा.सभापती :-** बोला राजुदादा बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नितीन भाऊंनी जो विषय मांडला , आपली मुद्दल जशीच्या तशी राहत होती. आज जे आपले ३ कोटी जात आहे ते मुद्दलापोटी जात आहे. आपल व्याज थांबलेल आहे नाहीतर आता पर्यंत व्याजच भरत राहिलो असतो आपण. हे सन्मा.सदस्यांना अवगत कराव.

**श्री.नितीन लढढा :-** मा.आयुक्त महोदय राज्य शासनाचे आता किती भरणे बाकी आहे. राज्य शासनाला किती रक्कम देणे बाकी आहे.

**मा.आयुक्त :-** त्याची आकडेवारी घ्यावी लागेल, आता मला वाटतं आहे एकुण १२५ कोटी आपण आपल्या वतीने भरलेले आहे.आपले लेखापरिक्षक सांगत आहे त्या प्रमाणे, १२९ कोटी ऑड काही असेल आपण १३० कोटी धरु या. १३० कोटी आपल्याकडुन राज्य शासनाला भरलेले आहे, आणि ४२ हप्त्यांपैकी १२ महिन्यांची वसुली झाली म्हणजे १२ x ३ असे ३६ कोटी आपले जमा झाले. जर १२९ कोटी मधुन जर ३६ कोटी आपले कमी झाले तर ९३ कोटी अजुन अपले बाकी आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे ९३ कोटी अजुन आपल्याला शासनाला द्यायचे आहे.

**मा.आयुक्त :-** ४२ पैकी १२ म्हणजे अजुन ३० हप्ते म्हणजे अडीच वर्ष दर महिन्याला ३-३ कोटी रक्कम आपल्याला राज्य शासनाकडे जमा करायची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ओके.

**मा.सभापती :-** चेतन भाऊ बोला, बोला चेतन सनकत.

**श्री.चेतन सनकत :-** ताई माझा विषय असा आहे की, आता सर्व अभियंतांमार्फत एक मुरूम आणि खडीच्या माध्यमाने खड्डे बुजविण्याच काम महानगरपालिकेने हाती घेतलेल आहे, म्हणजे प्रत्येक युनिटसाठी ३ लाख रुपयाची आपण काही तरी व्यवस्था केलेली आहे. अशी मला माहिती मिळालेली आहे. पण ३ लाख रुपयात काही खड्डे बुजले जाणार नाही. जळगांव शहराची परिस्थिती बघितली तर त्याच्या मध्ये ऐवढ्या पैश्यांमध्ये काही होणार नाही अस माझं मत आहे. तरी साहेबांना आणि आपल्याला विनंती आहे माझी की, याला दुप्पट करुन ६ लाखाची मर्यादा करावी. म्हणजे जास्तीत जास्त खड्डे बुजविले जातील. याच्यासाठी मी विनंती करीत आहे की, आपण तसा त्यांना आदेश द्यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, जसा सनकत भाऊ म्हणत आहे. ३ लाखामध्ये किती मुरुम टाकणार आहे. याचा ही आकडा आपल्यामार्फत सभागृहाला समजावुन द्यावा.

**मा.सभापती :-** खडके साहेब माहिती द्या.

**श्री.डी.एस.खडके :-** ३ लाखाच्या अंदाजपत्रकात जवळपास ४० ते ४५ ब्रास खडी येणार आहे. १० ब्रासच्या जवळपास मुरुम येणार आहे. मुरुमाची क्वॉन्टीटी खडीच्या प्रमाणात २५ टक्के असते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** खडी म्हणजे कोणती खडी वापरणार आहे ?

**श्री.डी.एस.खडके :-** ४० एमएम ४० मिलीमिटर,

**श्री.विष्णु भंगाळे :-** मुरूम टाकतांना वापरली जाते का ?

**श्री.डी.एस.खडके :-** मुरूम आणि खडी मध्ये २५ टक्के वाईड भरण्यासाठी २५ टक्के सॉफ्ट मुरूमाची प्रोव्हीजन करावी लागते. त्या अनुषंगाने आपण खड्डे भरण्याच टेन्टेटीव्ह अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्या अनुषंगाने ३ लाखात ४०० खड्डे भरले जातील असं अपेक्षित आहे. ५ फुट x ५ फुट x ६ इंचाचा जरी खड्डा पकडला तर ४०० खड्डे भरले जातील असं अपेक्षित आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, आयुक्त साहेब, नक्की खड्डे बुजणे. आज जळगांव शहराची गरज आहे. परंतु एक विनंती आहे की, हे काम चांगल्या प्रकारे होत आहे का, त्या मुरूमासोबत ती खडी चांगल्या प्रकारे दाबली जाते का ? की मुरूमाचाच फक्त उपयोग त्याच्या वरती होत आहे. त्याच्यानंतर चिखल पुन्हा रोडावर होतो. याच्या माध्यमातुन आपण कामाच्या क्वालीटी बाबत आपण निरिक्षण कराव आणि सनकत भाऊंनी सांगितल्या प्रमाणे ते खड्डे बुजविण्यासाठी वाढवुन द्याव, जेणे करुन शहरातील खड्डे तरी बुजले जातील. रोड होणे जर आपल्याला सद्या तरी मुश्कील दिसत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती ताई, माझ्या प्रभाग क्र.५ मध्ये शाहुनगरचा रस्ता याची निविदा प्रक्रिया झालेली होती काम ही सुरु झालेलं होत. मी खडके साहेबांना विचारल की, अत्यंत म्हणजे पिंप्राळा पासुन तर महानगरपालिकेपर्यंत येण्याचा तो एकमेव मार्ग आहे, आणि त्याच्या मध्ये आज अशी परिस्थिती आहे. तो इंदिरानगरच्या मिल पासुनचा आज तेथे वाहन जर स्लिप झालं तर नाल्यामध्ये ही पडु शकतो अशी परिस्थिती आहे. दाट वस्तीचा भाग आहे झोपडपट्टी आहे. रात्रंदिवस वर्दळ असते. परंतु ते काम पुढे का गेलं नाही याच्या संदर्भातली माहिती द्यावी.

**श्री.डी.एस.खडके :-** भाऊ त्या कामाच डब्ल्यु.बी.एम. झालेलं आहे. पुढचं डांबरीकरणाच काम बाकी आहे. मी भोळे साहेबांकडुन चौकशी केली भोळे साहेबांनी सांगितल की काही आठवत नाही, आणि फाईलचाही शोध घेत आहे, फाईल मिळाली की, मी आपल्याला कळवितो .

**श्री.नितीन लढढा :-** अडीच वर्षापुर्वी अर्धवट काम झाल आहे. पुरेस काम का झाल नाही याच्या संदर्भात मक्तेदाराला काही नोटीस दिली का ? मक्तेदार काम का करत नाही. मक्तेदार काम करत नसला तर त्याला काळया यादीत टाकणे संदर्भात प्रशासनाने विचार केला का ?

**श्री.डी.एस.खडके :-** भोळे साहेबांशी चर्चाही केली मी आता त्यांना त्या कॅन्ट्रॅक्टरच नांव ही आठवत नाही. नंतर मी फाईलचा शोध घेतला फाईल काही ट्रेसआऊट झाली नाही.

**श्री.नितीन लढढा :-** फाईल सापडत नाही तर फाईल जाते कुठे म्हणजे अर्धवट काम केलेल आहे. मक्तेदाराने आणि अर्धवट कामाच बिल सुध्दा मागण्यासाठी मक्तेदार आलेला नाही, आणि अत्यंत वाईट परिस्थिती आहे. आपण बघाल ना तर आपण पायदळ चालु शकत नाही त्या रस्त्यावर.

**श्री.नितीन बरडे :-** नितीन भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याच्याच सोबत जो मा.नितीन भाऊंनी विषय उचलला, त्याच रोडाला लागुन गटारीच काम सुरु आहे. तर माझी सभागृहाला एक विनंती आहे. गटार पहिल्यापासुन सुरुवात केली आणि मध्ये काही गटार सोडुन दिली. परत पुढची गटार चालु केली आणि तेथील गटारीचा प्रॉब्लेम असा आहे की, प्लॉट धारक आणि रोड हे मेजरमेंट जमत नाही. पण हे किती दिवस चालेल. जे टेंडर तीन वर्षापासुन काढलेलं आहे. तीन चार वर्षापासुन ते टेंडर आहे. त्याच्यावर काम चालु होत आणि आजच्या तारखेला रोड किती आणि प्लॉट धारकाचा प्लॉट किती याचं जर फैसला होत नसेल तर फक्त रोड म्हणजे आपण तेवढया एरियाची गटार सोडुन दिली म्हणजे काम होईल का ? आधी त्या प्लॉट धारकाच्या प्लॉट मधुन गटार काढली होती. ती चालत होती आपल्या मनपाला पण आता नविन गटार काढत असतांना स्वत: प्लॉट धारक नाही म्हणत आहे. मी स्वत: त्या स्पॉटला जाऊन आलो आहे आणि ती चेक केली. त्यांचं म्हणणं अस आहे की, हा जो रोड आहे अतिक्रमणामध्ये तिकडे सरकला आणि तिकडे अतिक्रमण झालं आहे. मग असं झालं तर आपण गटार प्लॉट धारकाच्या जागेतुन काढु शकतो का ? आणि जर तो प्लॉट धारक त्याला मंजुरी देणारच नाही. समझा नाही दिली. तर इतका गॅप, इतके वरुन येणारं पाणी, ऐवढी मोठया गटारीच नियोजन आपल्या माध्यमातुन केलेल आहे हे काय कामाच ठरेल. आणि मधला जो गॅप सोडलेला आहे, एकदा जर आपण व्हिजीट मारली तर निश्चित मला अस वाटत की ते आपल्या लक्षात येईल. आपल्याच प्रभागातला तो विषय आहे, आमच्याच प्रभागाला लागुन तो विषय आहे आणि चंद्रकांत चौधरी म्हणुन त्यांचा तो प्लॉट आहे म्हणुन मी आपल्याला लक्षात आणु इच्छितो की, आपण याच्यावरचा निर्णय टी.पी.च्या माध्यमातुन वाणी साहेबांना सांगुन असेल, इंजिनिअर साहेबांना सांगुन असेल की, जे योग्य असेल ते करा. टी.पी.ला पत्र दिल. एक वर्ष झालं, त्याच्या नंतर दुसर पत्र ४-६ महिन्यानंतर दिलं. पण तरी ही त्याच्यावरती फैसला होत नाही. तर याच्यावर कधी निर्णय होईल.

**मा.सभापती :-** प्रशासनाने या गोष्टींची दखल घ्यायची आहे की, ह्या खुप गंभिर बाबी आहेत. जेव्हा सन्मा.सदस्य अश्या एखाद्या त्याच्या प्रभागातल्या गोष्टीचा पाठपुरावा वारंवार करत आहे. जसं आता नितीन भाऊंनी सागितल की, ठेकेदाराने

अर्धवट काम करून सोडुन दिलेल आहे. जेवढं केलं त्याच बिल सुध्दा आता मागायला आला नाही. ठिक आहे सर आपण आता आलेले आहात. बांधकामामध्ये पण तरी सुध्दा हे खांदेपालट हे होतच राहणार आहे. अधिकारी बदलला की, काम ठप्प पडणं ही जर पध्दत असेल तर या पध्दतीने कामं पुढे जाणार नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, परत खडके साहेब सहा महिन्याने रिटायर होणार आहे.

**मा.सभापती :-** सहा महिन्यात नाही. पुढच्या महिन्यात.

**श्री.नितीन बरडे :-** एकच महिना,

**श्री.विष्णु भंगाळे :-** एकच महिना. जय गोपाळ व्हायचे काम आहे. तुमच्या राज्यात तरी चांगल करुन जा नाही तर वेगळा हार घालायला याव लागेल.

**श्री.नितीन लढढा :-** मला वाटत ताई, आता खडके साहेब जे काही आश्वासन या सभागृहात देतील ते एका महिन्याच्या आत मधले असले तरच विश्वास ठेवावा.

**मा.सभापती :-** त्यांनी त्यांचे कार्यकाळात दिलेले आश्वासन पुर्ण करूनच जावं.

**मा.आयुक्त :-** त्यांच आश्वासन आपण सिटी इंजिनिअर म्हणुन घेऊ या वैयक्तीक खडके म्हणुन नको.

**श्री.नितीन लढढा :-** आता होत तसच ना जस ताई बोलल्यात ना.

**मा.सभापती :-** असे उत्तर आम्हाला आणि सभागृहाला अपेक्षित नाही की, आता खडके साहेब रिटायर झाले आणि खडके साहेबांनी सांगितल होत की, प्रयत्न केले आणि आता नविन अधिकारी आलेला आहे. नविन अधिकाऱ्याला ते समजुन घ्यायला आणि कार्यान्वीत करायला वेळ लागणार आहे. असे होऊ नये म्हणुन खडके साहेबांनी जे या महत्वाची गोष्टी आहे त्यांच्या कार्यकाळात करून जावे, अशी संपुर्ण सभागृहाची भावना आहे. प्रशासनाच्या निर्दशनास सभापती म्हणुन मी आणुन देत आहे, आणि येथे प्रशासनाला एक सुचना पुन्हा करावी असे वाटते की, आता आपली ही जी रिटायरमेंट खुप वेगाने लोकांची बऱ्याच जणांची होत आहे. माझी प्रशासनाला ही विनंती आहे की, ज्या वेळेला ही महत्वाची पदे रिक्त होणार आहे. त्यांच्या नंतर या पदावर अधिकारी कोण येणार. तर त्या अधिकाऱ्याला आता पासुनच त्यांच्या सोबत जोडुन दिले तर नंतरची कामे ही सुरळीतपणे पार पाडली जातील. त्या अधिकाऱ्याला त्याचा आता सद्याचा कार्यभार ठेवावाच आणि त्याच सोबत अतिरिक्त हे कार्यभार जोडुन द्यावा, म्हणजे त्या अधिकाऱ्याला या विषयांच आकलन झालेल असणार आणि पद घेतल्यानंतर आणि पद स्विकारल्यानंतर त्या अधिकाऱ्याकडुन हे उत्तर सभागृहाला अपेक्षित नाही की, मी आत्ता येथे आलेलो आहे. मला हे समजुन घ्यायला माहिती करुन घ्यायला फाईल बघायला वेळ लागेल, हे उत्तर पुन्हा सभागृहापुढे येऊ नये म्हणुन प्रशासनाला ही सुचना आहे की, आता ज्या अधिकाऱ्यांचा रिटायरमेंट आहे. जे महत्वाच्या पदांवर रिटायरमेंट होणार आहे. त्यांच्या सोबत आता पासुनच एक जबाबदार अधिकारीची पदस्थापना आपण करणार आहात. नियमानुसार त्यांना त्या अधिकाऱ्यांसोबत जोडुन देण्यात याव.

**श्री.डि.एस.खडके :-** नक्की ताई, तरी मला अस नाही की कामकाजाचा अनुभव नाही. मी जरी नविन वाटत असेल, तर मला पुर्ण बांधकाम विभागाच्या कामकाजाचा अनुभव आहे. तो प्रश्न नाहीच आहे येथे परंतु काही काही फाईलीच्या संदर्भात दोन दोन, तीन तीन वर्षाच्या फाईली असेल. तर मला ही कोणी इंजिनिअरने सांगीतले असेल तर मी त्याच्यामध्ये लक्ष घालेल. परंतु नितीन भाऊंनी सांगितल त्या प्रमाणे मी फाईलचा ही शोध घेतला, भोळे साहेबांशीही चौकशी केली. ते फाईल बघुन नक्कीच त्यांना या प्रश्नाच उत्तर देईन. विष्णु भाऊंचाही असेल तर ते आपण साईड वरती बघु. तीन वर्षापासुन ते प्रकरण आहे, आणि खाजगी प्लॉट मधुन गटार कोणीही काढु देणार नाही, आणि ते काढणे ही योग्य नाही. टाऊन प्लॅनींगवाल्यांशी ही आपण दोन तीन वेळा संपर्क केलेला आहे. त्या टाऊन प्लॅनींगवाल्याशीही बैठक घेऊ आणि त्या माध्यमातुन नक्कीच काही मार्ग निघेल तर काढु. एक महिना जरी असला तर जितक माझ्याशी शक्य होईल आणि जास्तीत जास्ती मी काम करण्याचा प्रयत्न करणार आहे, आणि जे काही निविदा असेल त्या मी माझ्याच काळात काढुन देईल. पुढच्या वेळेस कमीत कमी निविदांचा घोळ तरी राहणार नाही. तेवढे मी आश्वासन देतो.

**मा.सभापती :-** तुमच्या कार्यक्षमतेबद्दल कोणालाच शंका नाही सर, आम्हाला तुमच्या कार्यक्षमतेवर पुर्ण विश्वास आहे म्हणुनच आम्ही सगळे म्हणतो आहोत की, आपण आहात तोवर ही सर्व कामे मार्गी लावुन जा.

**मा.सभापती :-** बोला बोला, बोला ताई .

**सौ.सैईदाबी शेख :-** काशिनाथ के पासके रोड का कुछ करो, सब खराब हो गया वो.

**मा.सभापती :-** खडके साहेब, खडके साहेब काशिनाथ रोडचा त्यांचा विषय आहे. वारंवार या सदस्यांनी काशिनाथ रोडवर मुरुम टाकण्याबाबत प्रशासनाला स्थायीच्या मिटींगमध्ये विनंती केलेली आहे.

**सौ.सैईदाबी शेख :-** काशिनाथ रोडका बहोत रस्ता खराब हो गया.

**श्री.डि.एस.खडके :-** हॉटेल काशिनाथ ते अशोक किराणा, त्यावर मुरुम टाकता येणार नाही. कारण की, तो रोड बराच डांबरी आहे. आणि तो रोड पुर्ण डांबरीकरण करणेच अपेक्षित आहे. शेरा चौकाचाच रस्ता म्हणत आहे ना तुम्ही. त्या

रस्त्याची मी पाहणी केलेली आहे. त्या रस्त्यावर ६०-७० टक्के खड्डे आहे. आपण तरी ही तात्पुरते काय करता येईल बघु या. पंरतु आपल्या डांबरीकरणाच्या प्रपोजल मध्ये आपण त्याच नविन प्रपोजल घेतलेल आहे.

**सौ.सैईदाबी शेख :-** कब करेंगे फिर

**श्री.डि.एस.खडके :-** डांबरी रस्त्यामध्ये ही घेऊ किंवा नविन रस्त्याच प्रपोजल असेल तर ते नविन रस्ता आपण प्रपोजल करणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** जागेवरती डांबरच शिल्लक नाही.

**मा.सभापती :-** प्रविण कोल्हे, ऑनलाईन आपल्यासोबत जॉईन आहे. त्यांना बोलायचे आहे. बोला प्रविण भाऊ.

**श्री.प्रविण कोल्हे :-** धन्यवाद मॅडम, जो माझा प्रभाग आहे मॅडम, विषय तेथे काय झाल आहे माहित आहे का? पुर्ण जे प्रभाग आहे ना ?

**मा.सभापती :-** आपला आवाज येत नाही प्रविण भाऊ.

**श्री.प्रविण कोल्हे :-** मॅडम, एकच मिनीट, गाडी चालु नको करु. हॅलो हॅलो, तेथे डांबरी रस्त्यांचा खुप कमी प्रमाण आहे, पुर्ण कच्चे रस्ते आहे माझ्या वार्डात आता सद्या जे पेपरामध्ये येत आहे. तेथे पण जे.सी.बी. मी पाठविला होता. महानगरपालिकेला दोन वेळेस जेसीबी मागीतले. पण मिळाले नाही.

**मा.सभापती :-** प्रविण भाऊ रिमुव्ह झाले आहे अॅड करा त्यांना.

**श्री.सुनिल खडके :-** खडके साहेब, जुना जे खेडी रस्ता आहे ना, त्या रस्त्या संबंधीत बोलत आहे ते. खुप घान झाला आहे रस्ता काल पेपरला येऊन गेली होती बातमी स्वप्नशील अपार्टमेंट आहे नगरसेविका रंजनाताई यांनी मांडलेला विषय आहे. त्यांचा विषय आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कांचनताई सोनवणे मॅडमांनी मांडलेला विषय आहे.

**श्री.सुनिल खडके :-** तो वेगळा विषय आहे भाऊ.

**मा.सभापती :-** रंजनाताई सपकाळे

**श्री.सुनिल खडके :-** हो, रंजनाताई सपकाळे, तो रस्ता खुप खराब झालेला आहे आणि पुढे तर इतके खड्डे पडलेले आहे, डांबरी रस्ता आहे. परंतु खुप खड्डे पडलेले आहे. कारण तेथे आपला अंडरड्रेनेज आलेल आहे. त्याचही काम अमृत योजनेमुळे पडलेल आहे. तो रस्ता खराब झालेला आहे. त्याचही काही करता आल तर करा. ते पण घ्या. कारण नागरीकांची खुप गैरसोई होत आहे. तो अर्धा वार्ड मला लागुन आहे.

**श्री.डि.एस.खडके :-** अमृतची चारी बुजविण्याबद्दल त्यांना इन्स्ट्रक्शन देतो आणि पाहणी करुन घेतो काय करता येईल.

**मा.सभापती :-** बोला बोला राजुदादा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रभाग क्र.१४, डि-मार्ट, मेहरुणची स्मशानभुमी, रामेश्वर कॉलनीचा, आदित्य चौकची अशी अवस्था झालेली आहे की, माणुस पायी सुध्दा चालु शकत नाही. मला परिसरातील नागरीकांनी निवेदन सुध्दा दिलेले आहे. मी संबंधीत जे आपले इंजिनियर आहे नेमाडे साहेब यांच्याशी संपर्क साधुन दोन तीन वेळा त्यांना सुचना केल्या की, या रस्त्याची डागडुगी असेल रिपेअरींग असेल, ते लवकरात लवकर करण्यात यावी. पण अजुन पर्यंत त्या कामाला सुरुवात झालेली नाही आणि डांबरी जो रस्ता होता त्याच्यावर मुरुम टाकण्यात आला आणि त्या रस्त्यावर अजुन घान झाली. तर लवकरात लवकर तो रस्ता रिपेअर करण्यात यावा.

**मा.सभापती :-** सगळयाच नगरसेवकांच्या एकंदर रस्त्याच्या तक्रारी आहेत.तर प्रशासनाने या सगळयाच तक्रारींची दखल घ्यायची आहे. कारण प्रत्येकाच्या प्रभागातल्या रस्त्याच्या समस्या ह्या १०० टक्के खऱ्या आहे आणि सर्व नगरसेवकांना यामुळे खुप अडचणी फेस कराव्या लागत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अध्यक्ष मॅडम, आता खडके साहेब तर पुढच्या महिन्यात रिटायर होऊन जातील. ट्रॅक्टर मिळत नाही १५-१५ दिवस आम्हाला, ट्रॅक्टर मिळत नाही.बांधकामाच ट्रॅक्टर उपलब्ध होत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, जर ट्रॅक्टर मिळत नाही आणि त्यानी सांगितल्या प्रमाणे त्याला जे.सी.बी. पाहिजे आणि काही सुविधा पाहिजे. आपल्या युनिट मध्ये जे जे.सी.बी. आहे. जेव्हा पासुन आलेले आहे. त्याच्या टायरांची परिस्थिती इतकी खराब झालेली आहे. आजच्या तारखेला पंक्चर इतके जोडलेले आहे की, नविन टायर त्याच्यात एक वेळेस नाही दोन वेळेस घेऊन टाकले असत. अशी परिस्थिती त्या जे.सी.बी.च्या टायरांची झालेली आहे. एक विनंती आहे की, आरोग्याला जे टॅक्टर असेल किंवा आपल्या बांधकामात जे टॅक्टर असेल. याची सुध्दा आपण दखल घेतली गेली पाहिजे याच्याकडे त्यांना गरज टायरांची आहे. पण जर पंक्चर काढुन काढुन जर आपण बिल काढाल. तर टायरांच्या किमतीपेक्षा जास्त त्या पंक्चरांची किंमत झालेली आहे आणि काम सुध्दा होत नाही. ते टायर खोलण आणि परत घेऊन जाण त्याच्या दिवसाचा खोळंबा होतो. अश्या ज्या काही आवश्यक वस्तु आहे त्याच्याकडे लक्ष दिल पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मॅडम, विषय घ्या. नंतर अर्धा तास द्या सर्वांना.

**मा.सभापती :-** प्रशासनाने आता या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पहिले अजेंड्यावरचे विषय घ्या.
**मा.सभापती :-** सगळया सदस्यांनी केलेल्या तक्रारींची प्रशासनाने दखल घ्यायची आहे. आपण अजेंडयावरचे विषय आधी घेऊ मग सन्मा.सदस्यांच्या काही तक्रारी असतील तर त्यावर चर्चा करु.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते मान्य, त्याच्यामध्ये चर्चा ठेवा अर्धा तास.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांच्या कडील शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि.०४ मे २०२० अन्वये कोवीड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत वित्तीय उपाययोजना करण्यांबाबत कळविण्यांत आलेले आहे. सदर शासन निर्णयाचे अवलोकन केले व माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- देशमुख प्रतिभा गजानन**
**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.दिलीप पोकळे :-** दि.१९/०८/२०२० डॉकेट सोबत आलेला शासनाचा प्रस्ताव मान्य आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.
**श्री.कपील पवार, मुलेप :-** आपण या वर्षी वार्षिक लेख्यामध्ये म.न.पा.फंड यानंतर म.न.पा. निधी आणि शासकीय निधी या तिघांचा एकत्रित वार्षिक लेखा दिलेला आहे. आज पर्यंत फक्त म.न.पा. फंडाचाच लेखा दिला जात होता. या वर्षापासुन पुर्ण वार्षिक लेखा आपल्या अभ्यासासाठी दिलेला आहे. त्या सदंर्भात काही जरी शंका असेल. ते तुम्ही विचारु शकता.
**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यालाही मान्यता घेऊन घ्यावी. शासकीय लेख्याच्या व निधीच्या संदर्भातला पवार साहेबांनी प्रथमताच ही सुरूवात केलेली आहे आणि ते योग्य आहे. जसं म.न.पा. निधीतुन जो अहवाल आपल्याकडे सादर होतो. त्या प्रमाणे शासकीय निधीच्या सदर्भातला हा सुध्दा त्यांनी पहिल्यांदा आपल्याकडे दिलेला आहे आणि मला वाटत तो मान्य करायला हरकत नाही. आणि योग्य विषय आहे तो.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नितीन भाऊ त्याच्यावर अभ्यास करून पुढच्या सभेला घेण्यात यावा.
**श्री.नितीन लढ्ढा :-** शासकीय निधीचा आहे तर तुम्ही सभेपुढे घेऊन घ्यावा. अभ्यास करण्याच्या अनुषंगाने पुढच्या स्थायी समिती समोर त्याला मान्यता द्या.
**मा.सभापती :-** सदस्यांना अभ्यास करण्याची ईच्छा आहे. चांगली बाब आहे ही. आपण पुढच्या सभेत या बद्दलचा निर्णय घेऊ या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण पत्रात आरंभिची शिल्लक रु.४२,४७,७८,८६९/- व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.५१३,३५,४७,८४३/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.५००,५०,७९,०९४/- मात्र इतका आहे. वर्ष अखेर शिल्लक रक्कम रु.५५,३२,४७,६१८/- इतकी आहे. सदर शिल्लकेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव चे शेअर्स ची रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र दर्शविलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ९४ (१) चे तरतुदी नुसार सन २०१९-२० चा वार्षिक हिशोबाची माहिती घेतली.

तथापी प्रशासनाने शासकीय निधींच्या जमा व खर्चाचा सुध्दा वार्षीक हिशोब तयार केलेला असून आज सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांना त्याच्या प्रती वितरीत केलेल्या आहेत सदर निधीच्या जमा खर्चाच्या वार्षिक हिशोबाचा सन्मा.सदस्यांना अभ्यास करावयाचा असल्यामुळे सदरचा विषय अभ्यास करण्यासाठी पूढील स्थायी समिती सभेपावेतो तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ४:-** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी मधील शिक्षिका व मदतनीस यांना बालवाडया सुरु करण्याची परवानगी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ते दि.३०/११/२०२० पावेतो नविन आदेश होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.रेश्मा काळे :-** अनुमोदन आहे, सदर विषयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि असे शिक्षक व मदतनीस यांच्या मानधनावरील येणारा खर्च महिला व बालकल्याण निधीतुन केला जाणार आहे. सदर डॉकेट स्थायी समिती समोर येण्यापुर्वी महिला व बालकल्याण समितीसमोर येणे अभिप्रेत होते. महिला व बालकल्याण समिती स्वतंत्र असतांना सदर प्रकरण त्यांच्याकडे न पाठविणे ही एक प्रकारे समितीच्या हक्कांवर गदा आणण्या सारखाच आहे. सद्यस्थितीत सदर विषयाची कोणतीही घाई नाही. सबब प्रशासकीय शिस्त लावण्याच्या दृष्टीने सदर प्रकरण आधी महिला व बालकल्याण समिती समोर ठेवाव व त्यानंतर स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करावा.

**मा.सभापती :-** नुकतीच जी महासभा आपली झालेली आहे. त्यामध्ये सुध्दा असाच शिक्षण विभागाचा एक प्रस्ताव आलेला होता आणि मीच त्यावेळेला सुचना तेथे मांडली होती की, महिला आणि बालकल्याण ही एक स्वतंत्र समिती आपल्याकडे अस्तित्वात आहे. त्या समितीचे स्वत:चे काही अधिकार आहे. आणि त्या समितीशी संबंधीत जेव्हा एखाद प्रकरण येत आहे. मग ते महासभेसमोर असो किंवा स्थायी समिती समोर असो. ते त्या समिती समोर गेल्यानंतरच ते प्रस्ताव येणे अभिप्रेत आहे. अश्या पध्दतीने हे प्रशासकीय शिस्तीचाच एक भाग आहे आणि ही शिस्त कुठेतरी मोडली जात आहे. हा ठराव करायचा नाही असा उद्देश या सभागृहाचा अजिबात नाही. मात्र प्रशासनाला ही एक शिस्त लागली पाहिजे. त्या समितीच्या हक्कांवर गदा येता कामा नये म्हणुन या विषयाची आता लगेच घाई सुध्दा नाही. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर आपल्या सर्व बालवाड्या बंदच आहे. नविन आदेश येईपावेतो त्या बंदच राहणार आहे. त्यामुळे ही प्रशासकीय शिस्त लागावी म्हणुन हे प्रकरण आपण अमान्य करत आहोत. हे प्रकरण महिला बालकल्याण समिती समोर पाठवाव. त्याच्यानंतर हे स्थायी समितीसमोर ठेवण्यात याव.

**मा.आयुक्त :-** यापुर्वी आपण महिला बालकल्याण समितीला पाठवत होतो. का म्हणुन या वेळेस पाठविले नाही. अस आहेत का ?

**श्री.पांडुरंग पाटील, बालवाडी अधिक्षक :-** यापुर्वी आपण पाठविलेले नव्हते कारण हा विषय यापुर्वी स्थायी समितीची मंजुरी घेवनुच करत होतो.

**मा.आयुक्त :-** यापुर्वी पाठवत नव्हते म्हणुन पाठविले नाही. ठिक आहे यापुढे आपण पाठवायला सुरुवात करा. आता हा विषय महिला बालकल्याण समिती समोर ठेवा आणि त्यांची शिफारस घेऊन मग स्थायी समिती समोर येऊ द्या. कायमस्वरुपी याच पध्दतीने करा. जो काही विषय महिला बालकल्याण समितीचा क्लियर राखीव असलेल्या ५ टक्के पध्दतीचे असे कुठलेही विषय स्थायी समिती असेल, महासभा असेल, यांच्याकडे जाण्यापुर्वी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीसहच गेले पाहिजे. यापुढे असा कुठलाही विषय असाच येईल याची दक्षता घ्यावी.

**मा.सभापती :-** बोला चेतनदादा बोला.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सभापतीताई, आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मला फक्त एक ही माहिती पाहिजे की, डॉकेट यांनी महासभेसमोर पाठविलेल्या डॉकेटवर, ४ नंबरचा विषय आहे, महिला बालकल्याण समितीचा विषय आहे. पण त्याच्यावर वाहुळे साहेबांचे अभिप्राय दिसत नाही. मुलेप यांचे अभिप्राय नाही या विषयावर. म्हणजे आपण इकडे २० लाख खर्च अपेक्षित धरत आहे. त्याला मंजुरी देत आहे. त्याच्यावर त्यांचे अभिप्राय असणे गरजेचे आहे माझ्यामते.

**मा.सभापती :-** सदस्यांचा हा विषय मांडण्याचा उद्देश असा वाटत आहे की, मुख्यलेखापरिक्षकांचा अभिप्राय याच्यात यासाठी अभिप्रेत आहे की, सभागृहाला निर्णय घेण्यासाठी त्या अभिप्रायाची मदत होत असते.

**श्री.पांडुरंग पाटील, बालवाडी अधिक्षक :-** मा.मुलेप यांच्याकडे उपायुक्त पदाचाही चार्ज असल्यामुळे त्यांनी एकत्रित पणे त्यांचा अभिप्राय सादर केलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा. सभापती महोदया, तस बघितल तर हा विषय येथे यायलाच नको होता. ज्या वेळेस आपल्याकडे हे डॉकेट सभेमध्ये घेण्याच्या संदर्भात पाठविलेले होते. त्याच वेळेस हे डॉकेट आपण प्रशासनाकडे पुन्हा सुचना देऊन जर पाठविल असत की, हा विषय महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातुन येणे अपेक्षित आहे. तर आज काय झाल

असत, आपला चर्चा मध्ये इतका वेळ वाया गेला नसता. आपला तो अधिकार आहे. ज्या वेळेला आपल्याला वाटते की, स्थायी समिती समोर हा निर्णय घेणे अपेक्षित आहे. जेणे करुन महिला व बालकल्याण समितीची मान्यता अपेक्षित आहे. आपण तश्या पध्दतीने रिमार्क केला असता. तर प्रशासनाने महिला व बालकल्याण सभापतीकडे पाठविला असता त्यांच्या मंजुरीनंतर तो प्रस्ताव आपल्याकडे आला असता. याच्यात काय होत, हा जो वेळ वाया गेला हा वेळ वाया गेला नसता.

**श्री.संतोष वाहुळे, मुलेप :-** सन्मा.सभागृह या विषयाच्या वेळेला माझ्याकडे उपायुक्त पदाचा मुलेप पदाचा चार्ज होता. त्यामुळे त्याच्यामध्ये मी उपायुक्त पदानुसारच त्याला रिमार्क दिलेले आहे आणि ते नस्तीवरती ही बघितलेले आहे. माझे स्वत:चे रिमार्क त्याच्यावरती आहे.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब, डॉकेटमध्ये येथे उपायुक्त तथा मुलेप असे असणे गरजेचे होते म्हणुन आपल्याला मुलेप म्हणुन डॉकेटवर कुठेही अस दिसत नाही म्हणुन मी हा विषय उपस्थित केलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मारून द्या एक कोंबडा मारून द्या.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ आम्ही नविन सदस्य आहे तर आम्हाला तर शंका येईल ना.

**नगरसचिव :-** भाऊ, सर्वानुमते आहेत ना हे चारही विषय.

**श्री.नितीन लढढा :-** हो, हो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदर विषयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, बालवाडी शिक्षिका व मदतनिस यांच्या मानधनावरील येणारा खर्च महिला व बालकल्याण निधीतून करण्यांत येणार आहे. सदर प्रकरण स्थायी समिती समोर येणेपूर्वी महिला व बालकल्याण समिती समोर येणे अभिप्रेत होते. महिला व बालकल्याण ही स्वतंत्र समिती अस्तित्वात असतांना सदर प्रकरण त्यांच्याकडेस न पाठविणे हि एक प्रकारे सदर समितीचे हक्कांवर गदा आणल्या सारखेच आहे. सबब प्रशासकीय शिस्त लागण्याचे दृष्टीने सदर प्रकरण महिला व बालकल्याण समिती कडेस मान्यतेस्तव सादर करण्यात यावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**
**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० अंतर्गत खंडेराव नगर परिसर (स्लम) व मांगवाडा, भिलवाडा, पिंप्राळा हुडको परिसरात आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार राकेश प्रकाश सोनवणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दरानुसार सदर कामी येणारा रक्कम रु.२८,६१,४८२/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा अशी मी सुचना देतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० अंतर्गत खंडेराव नगर परिसर (स्लम) व मांगवाडा भिलवाडा पिंप्राळा हुडको परिसरात आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१८४/१९ दि.१६/०१/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२२/०१/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३/०५ सन २०१९-२० https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१०४३ दि.०४/०२/२०२० चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमान पत्रात दि.०५/०२/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत संगणकाव्दारे ०३ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता प्राप्त झालेल्या ०३ मक्तेदारांचे ई-निविदा कागदपत्रांचे छाननी केली असता स्वामी कंन्स्ट्रक्शन यांची ई-निविदा अपात्र ठरविण्यात आलेली असल्याने त्यांचे फोल्डर क्रं.०२ उघडण्यात आलेले नाही तसेच खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम

मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार ई निविदा फोल्डर क्रं.०२ ओपन करुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२८,९०,३८४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| | राकेश प्रकाश सोनवणे | निविदा रक्कमेवर १% कमीचे दराने | २८,६१,४८ ‍/- |
| | योगराज गणेश पाटील | निविदा रक्कमेवर ०.९८% कमीचे दराने | २८,६२,०५ ‍/- |

तुलनात्क तक्ता पाहता मक्तेदार राकेश प्रकाश सोनवणे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे सर्वात कमी आलेले दर व त्यानुसार सदर कामी येणारा रक्कम रु.२८,६१,४८२/- मात्र चा खर्च हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करणेस मनपा अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ६:-** जळगांव शहर महानगरपालिकेचा मालकीचा जनावरांचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी देखभाली करीता २५% पेक्षा जास्त स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हा प्रस्ताव अमान्य करण्यात येतो. कारण डॉकेटचे संपुर्ण अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, महासभा ठराव क्र.२१७ दि.१५/११/२०१९ अन्वये तीन वर्षासाठी ई-निविदेद्वारे संस्थेची निवड करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र प्रशासनाने सदर ई-निविदा न काढता, परस्पर कोटेशन पध्दतीने प्रक्रीया करण्याचा प्रयत्न करून कार्यवाही करुन सदर प्रस्ताव राबवुन सदर प्रकरणी महासभेच्या ठरावाच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली दिसुन येते.

**श्री.नितीन लढढा :-** सन्मा.सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला भाऊ.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सदर कार्यवाही कोटेशन पध्दतीने करणे उचित नाही. सदर प्रकरणी ई-निविदा शक्य नसल्यास प्रशासनाने सदर बाब पुन्हा महासभेसमोर ठेवणे आवश्यक होते. सदर प्रकरण महासभेपुढे उचित कार्यवाहीसाठी सादर करावा.

**श्री.नितीन लढढा :-** सन्मा.सभापती महोदया, हा कोंडवाडा दि.१२/०९/२०१४ पासुन देण्यात आलेला होता. सदर मक्त्याचा कालावधी दि.११/०९/२०१९ म्हणजे तब्बल हा ११ महिन्याचा कालावधी झाला, पुर्वी अस्तीत्वात असलेल्या मक्तेदाराचा कालावधी हा संपुष्टात आलेला आहे. आज ११ महिने, म्हणजे ही जे ढेकळे साहेबांनी सुचना मांडली ती गैर नाही की, महासभेचा ठराव क्र.२१७ याच्यात अत्यंत स्पष्टपणे म्हटलेल आहे. तसेच सदरचा कोंडवाडा पुनश्च: निविदा न करता, म.न.पा. मार्फत सुरु करावयाचे झाल्यास मनपाचा जो काही खर्च होईल. त्याच्या संदर्भातली भुमिका विस्तृत केलेली होती. प्रस्तावीत केले प्रमाणे महापालिकेचा भटक्या जनावरांचा कोंडवाडा तीन वर्षाच्या कालावधीसाठी देखभाली करीता देणे करीता संस्थेची ई-निविदा प्रमाणे निवड करणेस मान्यता देण्यात येत आहे. अत्यंत स्पष्ट जे डॉकेट आज आलेले आहे. त्याच्यामध्ये सुध्दा हा ठराव क्र.२१७ च्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु ठरावामध्ये स्पष्ट सुचना असतांना ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करून हा कोंडवाडा चालविण्याच्या दृष्टीकोणातुन कार्यवाही अपेक्षित होती. एकतर १०-११ महिन्यानंतर झालेला निर्णय आणि त्या निर्णय मध्ये पण झालेल्या तांत्रिक चुका, अत्यंत गंभिर बाब आहे. म्हणजे आज मला सांगा ११ महिने मुद्दत संपल्यानंतर ही आज कोटेशनच्या माध्यमातुन मागविण्यात आल, पुर्ण प्रक्रिया अंतिम झाली, स्थायी समिती समोर मान्यतेला येते. मक्तेदाराकडुन अनामती आपल्याकडे भरल्या जातात आणि पुनश्च: विषय कुठे आला की, ठराव काय झाला होता. मग मला सांगा प्रशासनाकडुन ज्या विभागाने हे संपुर्ण कोटेशन मागविले आणि ज्या ठरावाचा संदर्भ याच्यामध्ये नमुद केलेला आहे. मग त्यानी तो ठराव वाचला नाही का ? आणि जर वाचला असेल तर अशी गंभीर चुक झाली कशी काय ? आणि याच्या मध्ये मोठा वेळ वाया जातो. एक एक वर्ष मुदत संपुन सुध्दा कार्यवाही करतांना, पुन्हा तशीच अडचण निर्माण होते. पुन्हा आता त्या संदर्भात ई-निविदा राबवायची. पुन्हा त्याच्यात महिना दोन

महिन्याचा प्रवास जाईल तर या सर्व गोष्टींना जबाबदार कोण ? आणि जर अश्या पध्दतीने कोणी जबाबदार व्यक्ती असेल की, ज्यांच्या कडुन अश्या पध्दतीचे तांत्रिक चुका घडल्या असतील. मग त्यांच्या विरुध्द प्रशासन काय कार्यवाही प्रस्तावीत करेल. त्याच्या संदर्भात सुध्दा खुलासा होणे गरजेचं आहे. कारण हा एकच विषय नाही. अश्या प्रकरणांमध्ये बऱ्याच गोष्टी आपल्या नॉलेजला असतात. ज्या विभागामध्ये एखाद्या कामाची मुदत, आज एखादा काम मान्य केल असेल. एक वर्षासाठी केल असेल किंवा दोन वर्षासाठी केलेल असेल किंवा तीन वर्षासाठी केलेल असेल. एक वर्षानंतर, दोन वर्षानंतर किंवा तिन वर्षानंतर ती मुदत केव्हा संपुष्टात येईल त्या संबंधीत खातेप्रमुखांना त्याची जाणीव असते, माहिती असते. मग ज्या वेळेला माहित आहे की, एखाद्या मक्त्याची डिसेंबर मध्ये मुदत संपणार आहे. तर साधारणता सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर पासुन ती नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे हे विभागप्रमुखांच्या कर्तव्याचा भाग आहे. परंतु ज्या वेळेला सदस्य किंवा कोणीही त्रयस्त क्ष व्यक्ती याबाबी ज्या वेळेला प्रशासनाला निदर्शनात आणुन देत असतील आणि त्यानंतर प्रशासन कुठेतरी कार्यवाहीला सुरूवात करत असेल. त्याच्या मध्ये पुन्हा तिन, चार, सहा, महिन्याचा कालावधी होतो. ही मुळात पध्दतच अत्यंत चुकीची आहे. या संदर्भात ज्यांच्याकडुन अश्या चुका घडत असतील. त्याच्या संदर्भात आपण जो पर्यंत शिस्तभंगाची कार्यवाही करत नाही. तो पर्यंत या गोष्टींमध्ये सुधारणा होण हे आपण अपेक्षित आहे असे धरुन चालणार नाही.

**मा.आयुक्त :-** मा.महासभेने घेतलेला निर्णय हा त्याची अंमलबजावणी करत असतांना पुर्णपणे दुर्लक्षीत करुन जर समझा वेगळया पध्दतीने जर अंमलबजावणी केली असेल तर अर्थात ही प्रशासकीय दृष्टया गंभीर बाब आहे. याची आपण गंभीर दखल घेऊ, याची आपण जबाबदारी निश्चित करु आणि सन्मा.सदस्यांनी जसा मुद्दा मांडला की, असे प्रकार होऊ नये म्हणुन अश्या प्रकारची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर निश्चितच शिस्तभंगाची कार्यवाही करु. हा विषय नेहमी करता येणार नाही. ज्या वेळेला एखाद्या प्लेन ठेक्याची मुदत संपते, कारण ती संपल्यानंतर ते नविन ठेका देण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरु होते आणि मधला जो काही गॅप असतो त्यात जुन्या ठेकेदाराला आपल्याला मुदत वाढवुन द्यावी लागते. काही वेळेला आयुक्तांना मुदत वाढवुन द्यावी लागते. कारण महानगरपालिकेचे कामकाज चालु ठेवायला पाहिजे. काही वेळेला स्थायी समिती समोर विषय येतात. आपल्याला मुदत वाढुन द्यावी लागते. हा प्रकार होऊ नये म्हणुन आपण सर्व खातेप्रमुखांना याच्या बद्दल सुचना देऊ. एखादा ठेका संपणार आहे तर त्याची तारीख आपल्याला पहिल्या पासुन माहित आहे. ॲग्रीमेंट करतांनाच आपण त्याची अंतिम मुदत दिलेली आहे. अश्या वेळेला किमान आपली ही प्रक्रिया होण्यासाठी दोन ते तीन महिन्याचा कालावधी विचारात घेता, तीन महिन्यापुर्वीच आपण नविन मक्तेदाराची नियुक्ती करण्यासंदर्भात जे काही असेल, टेंडरींग असेल किंवा कोटेशन असेल जे काही असेल ते आपण सुरु कराव आणि पहिल्या ठेकेदाराची मुदत संपण्यापुर्वी नविन ठेकेदार आपला इनप्लेस असला पाहिजे. या दृष्टीने आपल जी काही प्रशासकीय शिस्त असण आवश्यक आहे. त्या प्रमाणे आम्ही निश्चित प्रयत्न करु. खातेप्रमुखांना ही या बद्दल सुचना राहतील की, तुम्ही तातडीने आढावा घेतला पाहिजे. तिन महिन्यानंतर कोण कोणत्या ठेक्यांची मुदत संपणार आहे की, ज्यांची कार्यवाही आपल्याला आज पासुन करणे आवश्यक आहे. या पुढे जर समजा खातेप्रमुखांकडुनच दुर्लक्ष होत असेल तर लिपीक किंवा इंजिनिअर नव्हे तर खातेप्रमुख सुध्दा आपल्याला या प्रसंगामध्ये त्यांना जबाबदार धरावे लागणार आहे. असे प्रकार घडु नये म्हणुन जेव्हा नविन मक्तेदार नियुक्त झालेला नाही म्हणुन जुन्याच मक्तेदाराला आपल्याला मुदतवाढ द्यावी लागते. असा प्रसंग उदभवु नये म्हणुन जी काही प्रिकॉशन घेणे गरजेचे आहे. ती तातडीने घ्यावी आणि हे प्रकार पुन्हा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**श्री.नितीन लढढा :-** याची निविदा प्रक्रिया आता तातडीने प्रशासनाने राबवावी. कारण की, ऑलरेडी एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. आपण ई-निविदा पध्दतीने प्रक्रिया तातडीने सुरु करण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, आयुक्त साहेब ८-९ महिन्यापुर्वी जेव्हा हा विषय चर्चेला आला होता. त्यावेळेस याच्यावर बरीच चर्चा झाली. हा ठेका देतांना की, जळगांव शहराची वाढीव वस्ती आहे. मेहरूण भाग असेल, पिंप्राळा असेल, खेडी शिवार असेल. या परिसरात मोठया प्रमाणात शेतकरी वर्ग राहतो. यांची स्वत:ची गुरेढोरे असतात. आणि ज्यांना ठेका दिला जातो. ठेका दिल्यानंतर ह्या शेतकऱ्यांची जनावरे जी असतात त्या परिसरातुन हाकलुन जबरदस्तीने कोंडवाडयात टाकतात. कारण यांच्याकडे मॅन पावर असते मोठया प्रमाणात, गाड्या असतात आणि गाड्यांमध्ये लोड करून ते हे गुरेढोरे आणत असतात. मग हे फक्त मोकाट जनावरे न पकडता, त्यांचा जो पैसा अडकलेला असेल किंवा समजा वसुली करायची असेल. त्याच्यासाठी हे नाहक शेतकऱ्यांना त्रास देतात आणि याच्यामुळे शेतकऱ्यांमध्ये ,नागरीकांमध्ये महापालिकेच्या विरोधात मोठी नाराजी उत्पन्न होते आणि जेव्हा यांच्यामध्ये वाद उभे राहतात. आमच्या सारखे जे लोकप्रतिनिधी असतात, नगरसेवक असतात. त्यांच्याशी शेतकरी संपर्क साधतात. मी जेव्हा या लोकांना सुचना करतो, विनंती सुध्दा करतो, त्यावेळेला हे लोक ऐकायला सुध्दा तयार नसतात. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये याच्यासाठी

काळजी घेतली गेली पाहिजे आणि आपण जी चर्चा केली, त्याच्यावर मला वाटत हा ठेका देतांना विचार केल गेलेला नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त साहेब आणि अध्यक्ष महोदया, काल परवाच्या दिवशी तीन गायी पकडुन आणलेल्या आहे. घराबाहेरुन तो माणुस कोविड मध्ये ॲडमिट आहे. तरी त्या लोकांना त्यांनी रु.३६००/- मागितले. त्या करीता जे काही राजु भाऊ किंवा नितीन भाऊ बोलले, त्याच्यावर दखल घेऊन ज्यांनी ठेका घेतलेला आहे. त्यांच्यावर कार्यवाही करावी. कारण की मोहन नगर हा परवाचा विषय आहे तीन गायी आणल्या, जो माणुस तेथे राहतो तो कोविड मध्ये ॲडमिट आहे त्याचे परिवार पुर्ण तेथे आमदारांनी फोन केल्यावर सुध्दा तरी त्यांनी काल मागणी केली रु.३६००/- ची. तुम्ही गंभिरतेने दखल घ्यावी.

**श्री.नितीन बरडे :-** सद्या कोणाच आहे ?

**मा.सभापती :-** मला वाटत, मुळात या विषयाची सुरुवातच अशी झाली होती की, हा कोंडवाडा कशासाठी असावा.जी मोकाट जनावारे रस्त्यावर फिरतात किंवा मध्यभागी बसतात आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. तर ते अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन हा ठेका सुरु झाला होता.पण शहराच्या मध्यवर्ती भागात असे दृश्य आपल्याला फार कमी सद्या बघायला मिळते. जस घुगे पाटीलदादांनी सांगितल की, शेतकऱ्यांचा जो रहिवास आहे तो उपनगरांमध्ये आहे. उपनगरांमध्ये विभागला गेलेला आहे. त्यांची जी गुरेढोरे बाहेर असतात त्यांचा एक माणुस त्यांच्याकडे लक्ष सुध्दा देत असतो. तरी ही काही वेळेला हे ठेकेदाराची माणस हे मोकाट जनावरे म्हणुन पकडुन आणतात. मला अस वाटत की, आता हे असे मागच्या ठेकेदाराला जी मुदतवाढ देत आहोत सतत, आणि प्रशासनाकडुन ही निविदा प्रक्रिया होत नाही. निविदा प्रक्रिया सोडुन त्याच कोटेशन पध्दतीने करुन टाकलेल आहे. परस्पर नियमबाह्य पध्दतीने ते सगळ टाळण्यासाठी आपल्याला अस करता येऊ शकते एक की, आपली जी अतिक्रमण विभागाची टिम असते किंवा आरोग्य विभागाचे लोक असतात हे सतत रस्त्यावर असतातच हे उद्देशच हा होता या जनावरांसाठी की, वाहतुकीला कुठेही अडथळा निर्माण होऊ नये. तर या टिम मार्फत सुध्दा आपण असे जर कुठे जनावरे दिसले, मोकाट जनावर वाहतुकीला अडथळा करणारे, तर त्यांना हलविण्याच काम सुध्दा त्यांच्या मार्फत करून घेऊ शकतो. ज्यांना सद्या ही मुदतवाढ दिलेली असेल. त्याच्या बद्दल जर इतक्या गंभीर तक्रारी जर वारंवार येत असतील. मला वाटत सगळयाच नगरसेवकांनी ह्या तक्रारी फेस केलेल्या आहे. ते काम सुध्दा थांबवुन हे काम पन्हा नव्याने नविन अटीशर्ती सहीत नविन पध्दतीनेच सुरु करण्यात याव. तो पर्यंत ही जबाबदारी अतिक्रमण आणि आरोग्याचे कर्मचाऱ्यांकडे देण्यात यावी.

**श्री.नितीन बरडे :-** सद्या कोणाचा ठेका आहे मॅडम ?

**मा.सभापती :-** सद्या कोणाकडे आहे ठेका ?

**श्री.नितीन बरडे :-** कारण की, अध्यक्ष साहेब, काल सागर पार्क वर २५-३० म्हशी घुसलेल्या होत्या आणि आपली जी राणेताई आहे नगरसेविका, त्यांनी त्यांच्या मुलाच्या वाढदिवसाला कमीतकमी ५० ते ६० हजार रुपयांची झाडे लावलेली आहे. सागर पार्कला अक्षरशा १० ते १५ झाडे मोडुन टाकली त्या म्हशींनी त्यानंतर काव्यरत्नावली चौक ते गाडगेबाबा चौक कमीतकमी १५ गुरे राहतात रस्त्यावर एक महिलेचा ॲक्सीडेन्ट झाला ८ दिवसानंतर ती वारली तेथे, त्याची बातमी पेपरात नाही आली कारण त्यांच्या डोक्यावर मार बसला होता. ते लक्षात नाही आल ८ दिवसानंतर वारली ती महिला.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** आदरणीय महोदय, सन्मा.सभागृह, सदरचा मक्ता जो आहे सौ.सुगाबाई शिवप्रकाश चांगरे, गो सेवा संस्था, वसंतवाडी, जळगांव यांना देण्यात आलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मग गावात जे ढोर फिरत आहे त्यांच काय ? काल मी सागर पार्कचे फोटो टाकले होते व्हॉट्सअपवर तुम्ही बघितले ही असतील. नगरसेविका राणे यांनी ५०-६० हजार रूपये खर्च करुन झाडे लावलेले आहे तेथे.

**मा.सभापती :-** एकंतर अस लक्षात येत आहे की, ही जी संस्था काम करीत आहे. यांची खरोखर जी मोकाट गुरंढोरं आहे ते पकडण्याकडे कल दिसत नाही. मालक ज्यांची आहे अशी गुरंढोर पकडुन न्यायची आणि त्यांच्याकडुन दंड किंवा पावती किंवा खावटी किंवा सोडबांध पोटी रक्कम वसुल करायची. अशी यांची एकंदर कार्यपध्दती दिसुन येत आहे आणि म्हणुनच प्रशासनाला येथे अशी सुचना आहे की, या संस्थेचं काम ताबडतोब बंद कराव. नविन निविदा प्रक्रिया होईपावेतो हे काम आरोग्य विभागाकडुन आणि आपल्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी ते रस्त्यांवर असतातच त्यांच्या मार्फत करण्यात याव. आणि हा विषय पुन्हा महासभेपुढे ठेवुन योग्य ती त्याच्यासाठी अटीशर्ती आणि योग्य ते धोरण ठरवुन महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**श्री.नितीन लढढा :-** मी तेच म्हणत होतो की, क्वालीटी डिसिझन जे आहे धोरणात्मक निर्णय हा महासभेने घेतलेला आहे. आपण आता ज्या सुचना दिल्या त्याची प्रशासनाने दखल घ्यावी. अटीशर्ती आपण स्वत: तपासुन घ्याव्या. त्या अटीशर्ती तपासुन ई-निविदा प्रक्रिया सुरु करण्यात यावी. तो पर्यंत अस्तित्वात असलेल्या मक्तेदाराकडुन तो काम रद्द करून मनपाच्या माध्यमातुन आपण जश्या सुचना केल्या त्या पध्दतीने मनपाने तो कोंडवाडा चालु करावा स्वत:च्या अखत्यारीत.

**मा.सभापती :-** बोला बोला.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** आदरणीय सभापती, सन्मा.सदस्य नितीन भाऊंनी जो प्रश्न उपस्थित केला, आपण सुरूवातीला ई-निविदासाठीच प्रशासनाकडुन मान्यता घेतली होती. महासभेने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने आपण ई-निविदा काढण्यासाठी प्रशासनाची आणि आयुक्तांची मान्यता घेतली. परंतु अस निदर्शनास आल की, दर वर्षी जमा होणारी रक्कम ही ३ लाखापेक्षा कमी आहे आणि म्हणुनच प्रशासनाने त्याच्यावर रिमार्क दिल की, हया रक्कमवर ई-निविदा होऊ शकत नाही. कारण येणारा खर्च ३ लाखापेक्षा कमी आहे. त्यामुळे आपण दरपत्रक मागवुन दै.लोकमत मध्ये जाहिर निविदा काढली होती. त्याअनुषंगाने आपण ही निविदा केलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आता मागील ३ वर्षांमध्ये किती उत्पन्न आलेल आहे.

**मा.सभापती :-** येथे एक असा प्रश्न उपस्थित होतो की, प्रशासनाने जर तेथे अशी टिप्पणी दिलेली आहे की, हे कोटेशन मध्येच बसवाव लागेल. कारण याची ई-निविदा होऊ शकत नाही, ३ लाखाच्या आतला उत्पन्नाचा स्त्रोत आहे . तर ही बाब महासभेपुढे आणणे आवश्यक होत. महासभेचा जर ठराव आहे की, ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करावी आणि प्रशासन परस्पर ही टिप्पणी देऊन कोटेशन पध्दतीने कार्यवाही करुन प्रस्ताव सादर करतो. हे कुठपर्यंत उचित आहे. महासभेच्या ठरावा विरुध्द ही कार्यवाही झालेली आहे माझ म्हणण आहे. प्रशासन असे हे परस्पर करु शकणार नाही. महासभेपुढेच हा विषय आला पाहिजे आणि महासभेसमोरच आपण हे सर्व अटीशर्ती सर्व संमतीने एकदा ठरवुन घेऊ या की, कश्या पध्दतीने हे काम दिलं गेल पाहिजे. त्यामुळे पुन्हा हा विषय महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**श्री.नितीन लढढा :-** फक्त उत्पन्न किती आलेल आहे मागील ३ वर्षांमध्ये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया,

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** उपलब्ध आकडेवारी जी माझ्याकडे आहे आता, सन २०१७-१८ मध्ये रु.२१२१९/-, सन २०१८-१९ मध्ये रु.१५०३७/-, आणि दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०८/२०१९ पर्यंत रु.७,७६६/- अशी वसुली झालेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, या विभागावर म.न.पा.चे किती कर्मचाऱ्यांची नेमणुक आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याच्यावर मला एक असे विचारायचे आहे की, जुन्या काळापासुन बालगंधर्व नाट्यगृहाच्या मागे जो भरगावात तो कोंडवाडा तेथे आहे. अश्या ठिकाणी हा कोंडवाडा चालु आहे. आता शहरात तशी पाहिली तर आवश्यकता नाही. त्यामुळे काय होत तो कोपरा असेल किंवा ती जागा असेल. खुप घान आणि हे कोंडवाडा जर तेथुन काढला तर तो रस्ता मोकळा होणार. तो रस्ता होता तो आपण ब्लॉक केलेला आहे गार्डनचा आणि बालगंधर्वचा. जर याची व्यवस्था आपण दुसऱ्या ठिकाणी केली. जिथ याचा जास्त प्रकारे फायदा होऊ शकतो त्याच सुध्दा नियोजन आपण आपल्या महापालिकेच्या माध्यमातुन केल पाहिजे. शहरातल्या भर वस्तीतील ही जी जागा आहे. ही जे गुरं असेल, ढोरं असेल त्यांना पकडुन आणल्यानंतर तिथे जे प्रकार घडतात त्या वेळेस कस आहे. आपण आपल नियोजन केल पाहिजे. हा जो कोंडवाडा आहे. तो प्रभाग क्र.५ मध्ये आहे. तेथे भर मार्केट असुन स्कुल आहे लहान मुलांच्या, आर.आर.विद्यालय असेल, अनुभुती असेल, मॉडर्न गर्ल्स असेल, असे तिथे नेहमी भरत असतात आणि गर्दी खुप असते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मी मागच्या टाईमालाच बोललो होतो की, अश्या संस्थेला द्या की, त्यांच कोंडवाडा जळगांव शहराच्या बाहेर असेल, आणि आता यांनी जे बोललेल आहे त्याची ही दखल घ्यावी. कारण की, तो कोंडवाडा लहान पडतो. तर तो कोंडवाडा बंद करण्यात यावा व शहराच्या बाहेर ठेवण्यात यावा. अश्या मक्तेदाराला देण्यात यावा ज्याची स्वत:ची जागा आहे. वाटल्यास तर दोन पैसे कमी करण्यात यावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, नवनाथ भाऊंनी जो विषय मांडला, स्वत:ची जागा असलेले आपल्या जळगांव शहरामध्ये ठेका घ्यायला कोणीही तयार होणार नाही. म.न.पा.ची खुप जागा आहे. ओपनस्पेस आहे, किंवा विविध ठिकाणी आपल्या जागा पडलेल्या आहे. त्या जागेचा विचार याच्यासाठी करावा जेणे करुन ती सुविधा उपलब्ध होईल.

**मा.सभापती :-** मला वाटत आहे की, ह्या ज्या वेगवेगळया विचार धारा आपल्या समोर येत आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** सर्व बाबींवर चर्चा करुन निर्णय घ्यावा आपण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, आयुक्त साहेब हा जो कोंडवाड्याचा विषय आहे. जरा माईक बंद करून आवाज फिरत आहे. सभापती महोदया, कोंडवाडा आपण पुरवत आहे, मक्तेदार हा फक्त मॅन पावर पुरविणार आहे. मॅन पावरच्या बदल्यात ७५ टक्के रक्कम ते स्वत: ठेवणार आहे. २५ टक्के रक्कम ही महापालिकेला मिळणार आहे. त्याच्या बदल्यात रु.१२००/- ते एका जनावराचे घेणार आहे सोडण्यासाठी, रु ५०/- खावटीसाठी आणि रु २५/- त्याची सोडबांध करण्यासाठी. रु ७५/- त्या शेतकऱ्याकडुन किंवा जो कोणत्याही त्या गुराढोरांचा मालक असेल त्याच्याकडुन वसुल करणार आहे. मग हे आपण आपली माणसे लावुन का नाही करु शकत आहे. कॉन्ट्रक्ट बेसीसवर आपण ५ ते १० माणस

लावायचे त्यांच्याकडुन मोकाट जनावरे जमा करायचे. १००% रक्कम हे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडेल. समोरचा व्यक्ती ५ लोकांवरती ७५ टक्के रक्कम जर घेत असेल. तर २५ टक्के वरती महापालिकेने समाधान का मानाव.

**मा.सभापती :-** मला वाटत की, आता आपल्या समोर अनेक पर्याय आलेले आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ताई, याच्यावरती कर्मचाऱ्यांची नेमणुक किती आहे आणि याच्यावर किती खर्च होत आहे. हा एक प्रश्न उपस्थित केलेला आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** सन्मा.सभापती, याच्यावर आपण फक्त एकच कर्मचाऱ्याची नेमणुक केलेली आहे. त्याची माहिती संकलीत करणे आणि त्याच बिलींग करणे. या संदर्भामध्ये आपण त्याला आपल्याकडेच ८ व्या माळयावर ठेवलेला आहे. तो ते काम पाहतो.

**श्री.नितीन लढढा :-** कस आहे तुलनेने जर बघितल उत्पन्न तर रु १७०००/-,रु ७०००/-, रु १५०००/- मला वाटत जो कर्मचारी नेमणुक केलेला असेल हे त्याचे वार्षिक उत्पन्न आहे. हे उत्पन्न वार्षिक आहे सर.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदया, हा एक लोकांना द्यायच्या सेवेचा आणि लोकांच्या सुरक्षेचा विषय आहे. त्यामुळे त्यात आपण उत्पन्नाच गणित मांडण संयुक्तीक वाटत नाही. आपल म्हणण बरोबर आहे की, उत्पन्नाच्या तुलनेमध्ये खर्च जास्त होतो. पण असे आपले अनेक सेवेचे विषय आहे. ज्याच्यात आपल्याला उत्पन्नही नाही मात्र ही आपली जबाबदारी आहे आणि विशेषत: रस्त्यावर फिरणाऱ्या लोकांची वाहनांची जी सुरक्षा आहे. ती आपल्या दृष्टीने खुप किमती आहे. तरी याच्यामध्ये महापालिकेचा जरी खर्च जास्त होत आहे. तरी ते आपल्याला करणे खुप आवश्यक आहे आणि दुसरा मुद्दा की, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याच्या मार्फत हे कराव का ? मला अस व्यक्तीश: वाटत की, आरोग्य विभाग आणि अतिक्रमण विभाग यांच्याशी चर्चा करु. परंतु आपल्या कर्मचाऱ्यांना अस काम करणे किंवा त्याची ती कला नसते. विनाकारण आपल्यावर ही जबाबदारी घेणेपेक्षा ही जी संस्था आहे किंवा भविष्यामध्ये निविदा प्रक्रियाद्वारे जी येणारी संस्था असेल. यांच काम बिनचुक कस चालेल या दृष्टीने आपल्याला अटीशर्तीमध्ये काही बदल करावा लागेल का ? प्रत्यक्ष काम करत असतांना जसा आपण जो मुद्दा मांडला की, शेतकऱ्यांचे जनावरे उचलुन आणायचे आणि आपल टारगेट पुर्ण करायच असे होऊ नये. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये किंवा नवनाथ भाऊंनी जो मुद्दा मांडला की, अनावश्यक काही तरी केल जात आणि मग त्यांच्यावर रु ३६००/- चे दंड आकारले जातात. या सगळया गोष्टी होऊ नये. खरोखर ज्या कारणासाठी कोंडवाडा आपल्याला चालवायचा आहे की, रस्त्यावर मोकाट फिरणारे जनावरांपासुन लोकांना त्रास होऊ नये. अश्या जनावरांचा आपल्याला योग्य पध्दतीने बंदोबस्त करता यावा. अशी खबरदारी आपण द्यावी. महासभेने ई-निविदा म्हटल आहे परंतु ई-निविदा शेवटी याच्यामध्ये एकच मुद्दा महत्वाचा आहे. परंतु याच्या मध्ये महासभेच धोरण अस आहे की, निविदा प्रक्रियेने तुम्ही एजन्सी निश्चित करा. आता ही ई-निविदा असावी की, वृत्तपत्रातुन निविदा मागवावी ही तांत्रिक बाब आहे. जर ३ लाखाच्या वरचीच जर ई-निविदा होणार असेल तर त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यामध्ये काही तांत्रिक अडचण आहे. त्याच्यामुळे महासभेच्या ठरावाचा आपण अवमान केलेला आहे अस न समजता, त्याच्या मधल जे हे आहे. महासभेची ईच्छा अशी आहे की, निविदा प्रक्रियेमधुन ट्रान्फरन्सी बाळगुन तुम्ही याच्या मधुन एजन्सी निवडावी. तर आपण जर निविदा प्रक्रिया राबविली असेल तर महासभेच्या ठरावाचा आपण मान राखलेला आहे. अस म्हणायला आपल्याला काहीच हरकत नाही. ई-निविदा तांत्रिक कारणामुळे होऊ शकत नसेल. वर्तमान पत्रातुन जर आपण जाहिर प्रसिध्दी करुन जर सर्वांना सामान्य न्याय भुमिकेतुन जर आपण निविदा मागविली असेल.तर त्या निविदा प्रक्रियेतुन आलेल्या मक्तेदाराला आपण मान्यता द्यायला हरकत नाही. मात्र प्रत्यक्षात दैनंदिन कार्यपध्दती किंवा अटीशर्ती याचे जे आपण दोन तीन सुचना केलेल्या आहे सन्मा.सदस्यांनी याचा आपण विचार करु. निविदेमध्ये अटीशर्ती योग्य पध्दतीने टाकुया. त्या अटीशर्ती आपल्या पत्रामध्ये ही येतील ते ही आपण पाहु या. याच्या तुलनेमध्ये पुढच हे काम लोकांना बिनचुक त्रास न होऊ देता, आपला हेतु सफल होईल अश्या पध्दतीने आपली व्यवस्था करणे गरजेच आहे. मा.सभापतींनी जे म्हटल की, आपल्या आरोग्य खात्यामार्फत किंवा अतिक्रमणामार्फत हे तितकं काही व्यवहार्य होणार नाही. कारण ऑलरेडी आपल्याकडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. आपले कर्मचारी नेमल्यावर पुन्हा त्याच्यावर सुपरव्हिजन आली. त्यामुळे आपल्याला खाजगीकरणाचा जो फायदा आहे तो घेऊ या. मात्र आपले नियम पाळले जातील. अश्या पध्दतीने आपण व्यवस्था करु या.

**मा.सभापती :-** मला वाटत की, आयुक्त महोदय यांनी जे आपल्यासमोर सांगितले आहे, त्याच्यातला एक धागा असा आहे की, ही सेवा आहे आपण ही सेवा पुरवित आहे. त्यामुळे येथे जमा खर्चाचा हिशोब मांडता येणार नाही. जर आपण ही सेवा पुरवित आहोत. तर माझ्या डोक्यात असा एक नविन विचार येत आहे की, कोंडवाडा न करता आपण याची गोशाळा का करु नये. हा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, ज्या तक्रारी सुध्दा नगरसेवकांकडुन वारंवार येत आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय आपण जर गोशाळेचा जर विषय घेतला, तर मग नागरीक, शेतकरी आणि पब्लीक यांना जर अटकवल. तर ते म्हणतील की, आम्ही गोशाळेत सोडलेल आहे. तर त्याला दंड त्याला लागत नाही.

**मा.आयुक्त :-** मेन मुद्दा मा.सभापती, कोंडवाडा ही आपली कायदेशीर संकल्पना आहे, ही वर्षानुवर्ष चालत आलेली आहे. ईच्छा विरुध्द जनावरे आणुन ठेवण याला आपण कोंडवाडा म्हणतो शब्दश: गोशाळा जी लोकं गायी दान करतील त्यांच सांभाळ करणे, कोंडवाडा हा सांभाळ करणेसाठी नाही. कारण त्याच्या मध्ये. ठराविक आपले नियम आहे. ठराविक कालावधी नंतर त्यांचे जे मालक असतील. त्याने जर ते जनावरे क्लेम करायचे नसतील. तर आपण आपल्या पध्दतीने त्याची जी काही व्यवस्था लावयाची. कायमस्वरुपी अश्या जनावरांचा सांभाळ स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावा. अशी अपेक्षा नाही. गोशाळा ही संकल्पनाच पुर्ण वेगळी आहे. तर गोशाळेच्या संकल्पनेमध्ये आपण न जाता, जो काही कॅटलपॅन्ड म्हणुन जी कायद्यातली संकल्पना आहे. त्याचीच अंमलबजावणी करणे योग्य राहील.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, म्हणजे मी आता उपलब्ध आकडेवारीनुसार सांगतो आपल्याला, सन २०१९-२० मध्ये उत्पन्न मिळालेल आहे फक्त रु.७०००/- मनपाला. सात हजारच्या तुलनेवर जर टक्केवारी बघाल तर त्याच्यामध्ये २५ टक्के हा मनपाचा हिस्सा आहे. ७५ टक्के हा मक्तेदाराचा हिस्सा आहे. रु.७०००/- मनपाला मिळाले तर या जनावरांना कोंडवाडयामध्ये डांबुन फक्त रु.२८०००/- उत्पन्न मिळालेल आहे आणि त्या रु.२८०००/- उत्पन्नामध्ये ठरलेल्या २५ टक्के प्रमाणे रु.७०००/- तो मनपाला देय आहे. मला सांगा की, आताच नवनाथ भाऊंनी सांगितल की, रु ३६०० - रु ३६०० वसुल केली जातात. राजुभाऊ पाटलांनी सुध्दा तो विषय उपस्थित केला की, खाजगी जनावरे सुध्दा ते घेऊन जातात म्हणजे कुठेतरी हे मिळालेले उत्पन्न म.न.पा.कडे योग्यपध्दतीने दाखविले जात नाही. हा अत्यंत वस्तुस्थिती जन्य पुरावा आहे. म्हणजे साधारणता जर रु ७०००/- जर महानगरपालिकेला मिळत असेल आणि एका गायीच्या मागे रु १००० - रु १२००/- मिळत असेल, जी काही दंडाची रक्कम असेल. त्या प्रमाणे जर बघितल तर कोंडवाडयाच उद्दिष्ट सुध्दा सफल होतांना दिसुन येत नाही. निव्वळ फक्त नावाला ती संस्था चालविली जाते आणि त्या संस्थेच्या माध्यमातुन कोट्यावधीच्या किमतीची जागा आपली त्या मक्तेदाराच्या ताब्यात राहते म्हणजे निश्चितपणे हा जो काही सर्व प्रकार आहे. हा पारदर्शी प्रकार दिसुन येत नाही. हे सगळया आकड्यांवरुन दिसुन येत आहे. तर मला वाटत तातडीने मक्तेदाराची मुदत संपुष्टात आलेली असल्याने म.न.पा.ने जो काही निविदेचा कालावधी ८-१० दिवसांचा असेल, मला वाटत ताई महासभेने एक धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. आपण या मक्तेदाराला मान्यता द्यावी किंवा ई-निविदा पध्दतीचा अवलंब करावा. ८-१० दिवसाचा पिरियेड याच्यामध्ये जाऊ शकतो. परंतु मक्तेदारकडुन हे काम तातडीने काढुन घेण्यात यावे. शेवटी जर वर्षासाठी रु.३००००-३५००० मक्तेदाराला मिळालेले असेल, त्या तुलनेत २५ टक्के रु ७०००/- ची रक्कम म.न.पा.ला मिळालेली असेल. याचा अर्थ असा की, फक्त ३० ते ३५ गुरांची डांबण्याच्या संदर्भातली भुमिका मक्तेदाराने संपुर्ण वर्षामध्ये म्हणजे ३६५ दिवसांमध्ये ३० गुरेढोरे ही याच्या मध्ये डांबण्यात आलेली आहे म्हणजे त्याच जर ऐवरेज काढल. त्याच जर परसेंटेज काढले तर, दिवसातुन एक सुध्दा जनावर मक्तेदाराने शहरातुन नेण्याची कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. ही माहिती जी आहे ही १०० टक्के खोटी आणि वस्तुस्थितीला धरुन नसणारी ही माहिती आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, नितीन भाऊं जो विषय बोलले, त्याच्यावर एक उदाहरण मी आपल्याला देऊ इच्छितो की, मागील काळामध्ये महासभेत तो विषय मांडला होता. त्याच कारण अस होत की, सर्व फुटेज काढले होते. तो गाय वाहुन नेणारा माणुस अक्षरश: मी त्याला प्रुफ केल आणि पकडल आणि ती गाय कुठुन सोडविली, हाजी गफ्फारभाई मलिक यांच्या घराच्या मागे असलेल्या कत्तलखाण्यात जो कत्तल करणारा माणुस आहे त्याच्या दारातुन मी माझी जी काळी गाय आहे सोडवुन आणलेली आहे आणि तेथे नेणारा कोण होता. कोंडवाडयाचा माणुस होता आणि अश्या सुध्दा घटना घडलेल्या आहे. दुसरा कोणाच नाही माझ्या गायीचा सुध्दा विषय झालेला आहे. आपल्या सारखा माणुस सक्षम होता मी ते कॅमेरे रोडावरचे वार्डातले सर्व कॅमेरे चेक करत करत कुठ पर्यंत गेला आहे याचा शोध घेतला, म्हणुन त्याचा शोध लागला, गाय चोरीला गेली त्याची कंम्प्लेट देऊन टाकली त्याच काहीच नाही. ती गाय सापडली पण नसती, गाय होती कसायाच्या दारी म्हणजे कोंडवाड्याच्या माध्यमातुन हा सुध्दा प्रकार चालु आहे. यावर सुध्दा आपण लक्ष दिल पाहिजे.

**मा.सभापती :-** म्हणुनच मला असे वाटत आहे की, सभागृहाने हा विषय पुन्हा एकदा महासभेसमोर नेऊन त्याच्या बद्दलच्या सगळया अटीशर्ती पुन्हा एकदा नव्याने ठरवुन ई-निविदा निघु शकत नसेल तर काढु नका, कोटेशन पध्दतीने करा. पण तसा हा डिटेल ठराव हा महासभेमध्ये यायला पाहिजे. तर प्रशासनाने लवकरात लवकर याची अंमलबजावणी करावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** जर कोटेशन पध्दतीनेच करायचे आहे तर आता काय हरकत आहे.

**मा.सभापती :-** त्यासाठीच्या ज्या सर्व अटीशर्ती आहे विष्णुभाऊ, त्या अटीशर्तीचा येथे कुठेही उल्लेख नाही. या सगळया अडचणी जे तुम्ही लक्षात आणुन दिल्या, काही सन्मा.सदस्यांनी आणुन दिल्या, या सगळया रेकॉर्डवर घेऊन त्यानुसार एक प्रॉपर डॉकेट बनवुन त्यानुसार ठराव होणे अपेक्षित आहे. अस जर झाल नाही तर पुन्हा हे अश्याच पध्दतीने कामकाज चालेल. प्रशासनाने विष्णु भाऊंनी जो एक विषय लक्षात आणुन दिला आहे. तो पण महत्वाचा विषय आहे. बालगंधर्व

नाटयगृहाची जागा वापरली जात आहे. त्या संदर्भात सुध्दा प्रशासनाने निर्णय घेऊन डॉकेट तयार करुन महासभेपुढे धोरणात्मक निर्णयासाठी पाठवाव आणि या विषयाचा धोरणात्मक निर्णय आपण महासभेत घेऊ यात.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सभापती महोदया, ई-निविदा न निघण्याच कारण आपल्या कोंडवाडया द्वारे पकडलेले जनावरांची पावती कोण फाडत, त्याची पावती जर तो मक्तेदार फाडत असेल. तर पावती त्याची रु.२००-३००/- ची पण फाडली जाते. अस जर नाही केल तर खुप मोठी रक्कम येईल. आणि ई-निविदा सुध्दा काढता येईल. त्याची पावती कमीची फाडली जाते म्हणुन ई-निविदा निघत नाही. पण जर त्याने जितके पैसे घेतले तितकी पावती फाडली तर आपल उत्पन्न ही वाढेल. आणि त्याच्यावर ई-निविदा सुध्दा काढता येईल.

**मा.सभापती :-** प्रशासनाने सविस्तर

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती ताई, सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला वाटत, हा जो कोंडवाड्याचा विषय आहे आणि याची जी निविदा आहे, ही कोटेशन पध्दतीत बसतच नाही. याला बसविली गेली आहे. मी साक्षी आहे, माझ्या समोर शेतकऱ्यांची एक दिवसाला ८-८ व १०-१० हजाराची पावती फाडली आहेत आणि जर महिन्याला रु.७०००/- च उत्पन्न दाखविल जात असेल. मग नक्कीच मक्तेदाराच काम पारदर्शी नाही आणि आपण त्यांचा मक्ता रद्द करण्यात यावा. आपल्या कर्मचाऱ्याकडुन महिन्यासाठी किती वसुली होते ते पाहव.

**श्री.सुनिल खडके :-** मॅडम मला बोलायचे आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी:-** विषय असा आहे की, त्या वेळेला आपल्याला ई-निविदा करायची होती आणि ई-निविदा प्रमाणेच सर्व अटीशर्ती केलेल्या आहेत. प्रशासनाला किंवा लोकप्रतिनिधींना अस वाटत असेल की, याच्यामध्ये अटीशर्ती कमी आहे तर ते आपण खात्री करावी. माझ अस म्हणण आहे की, केलेली प्रक्रिया अत्यंत योग्य आहे कारण आता एक वर्षानंतर ही निविदा मंजुर होत आहे, म्हणजे उद्या पासुन हे काम कोणी करायच कस करायच, हा प्रश्न निर्माण होईल. आपल्याला या अटीशर्तींमध्ये जर काही अस वाटत असेल. ते आपण नक्की सुचना दया त्याचा आपण समावेश करु . आणि त्याच्यानंतर प्रक्रिया पुर्ण झालेली आहे आणि झालेली प्रक्रिया जी आहे सुरूवातीला ई-टेंडरच केलं होत. आणि ई-टेंडर समजुनच ही प्रक्रिया केलेली होती. मग नंतर अस लक्षात आल की, उत्पन्नाचा जो सोर्स आहे तो ३ लाखापेक्षा कमी आहे. तर सर्वात जास्त खपाच जे वृत्तपत्र आहे लोकमत याच्यामध्ये आपण जाहिर निविदा प्रसिध्द केलेली होती आणि त्या वृत्तपत्राच्या प्रसिध्दीच्या अनुषंगाने ह्या निविदा प्राप्त झालेल्या आहे. मला अस वाटत की, निविदा प्रक्रिये बद्दल आपल्या मनात काही साशंकता असेल तर ती नसावी. राहिला प्रश्न अटीशर्तींचा तर नक्कीच आपण अटीशर्तींची खात्री करावी राहिला प्रश्न अटीशर्तींचा तर त्याचा करारनामा केलेला नाही किंवा त्याला कार्यादेश देखील दिलेला नाही. मान्यतेसाठी सभेपुढे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ज्याला कोणालाही हे जात असेल त्यांना ॲड करून द्या ना.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी:-** माझ अस म्हणण आहे. याच्या मध्ये अजुन त्याला दुरुस्त्या करता येतील. तर आपल्याला वाटल की, केलेली निविदा प्रक्रिया ही चुकीची आहे, खात्री न करता हा ठेका रद्द करणे संयुक्तीक होणार नाही. हे माझे मत आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, मी अस म्हणु ईच्छितो की, जर ही निविदा झालेली आहे. सर्व आपली म.न.पा.ची त्या गोष्टींवर प्रोसिजर झालेली आहे. एक प्रकारे खर्च सुध्दा त्याच्यावर झालेला आहे. एक वर्ष त्याला लागलेला आहे. आपल्या ज्या दोन तीन अटीशर्तीत जर आता जो निविदा धारक आहे तो या अटीशर्तींवर बसत असेल आणि आपल्याला हव्या त्या गोष्टी मंजुर करून देत असेल. तर त्यालाच देणेस काय हरकत आहे. पुढील येणारा काळ सुध्दा आपला वाचेल आणि ती प्रक्रिया लवकर सुरु होईल.

**मा.आयुक्त :-** अटीशर्ती, अजुन आपण त्यांना नविन कामासाठी वर्कऑर्डर दिलेली नाही. आपण करार केलेला नाही. त्यामुळे विष्णु भाऊ आपण जे म्हणत आहे, ज्या अटीशर्ती आता आहे त्यात लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने टाकण आवश्यक आहे. ते निश्चित टाकु शकतो. त्या अटीशर्तींना अधिन राहुनच त्याने काम केल पाहिजे. त्यामुळे त्याच्या मान्यतेचा प्रश्न येणार नाही. अटी टाकणे हा आपला अधिकार आहे. जर आपण एकदा मंजुर केल्यानंतर किंवा एजन्सी निश्चित केल्यानंतर जे काही पुर्वीच्या करारामध्ये किंवा आताच्या टेंडर मधल्या ज्या अटीशर्ती आहे. त्याच्या मध्ये केव्हाही फेरबदल आपण करार करण्यापुर्वी करु शकतो. त्यामुळे आता जे सभागृहात सन्मा.सदस्यांच्या भावना व्यक्त झाल्या त्याच्या आधारे आता सुध्दा ज्या अटीशर्ती आहे, मला अशी विनंती करायची आहे सभागृहाला म्हणजे सभापतींच्या मार्फत की, जर आपण दोन तीन सदस्यांनी या अटीशर्तींचा अभ्यास केला एक दोन चार दिवसांमध्ये आणि त्याच्या मध्ये अजुन काही अतिरिक्त अटीशर्ती टाकणे आवश्यक आहे अस स्थायी समितीच्या वतीने जर सुचविल. तर त्या अटीशर्ती आपण टाकु आणि पुढचा

कालावधी न टाळता आपल्याला हे काम देता येईल त्याच्यामध्ये. दुसरी गोष्ट हा कालावधी कितीचा आहे या टेंडर मध्ये, किती वर्षासाठी आपण एजन्सी देत आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** तीन वर्षासाठी

**मा.आयुक्त :-** समझा हा तीन वर्षाचा कालावधी हे जास्त आहे. तर सुरवातीला एक वर्षाचा कालावधी आपण करु . एक वर्षाचा कालावधी विचारात घेऊन पुढे आपल्याला वाढुन द्यायच की नाही स्थायी समिती समोर ठेवुन पुन्हा आपल्याला निर्णय घेता येईल. हे सगळे आपले अधिकार आहे. आपल्या प्रक्रियेवर अविश्वास न दाखविता, त्याच्या मध्ये आपल्याला फुलप्रुफ कशी करता येईल. याचा विचार करणे जास्त योग्य राहील अस मला ही वाटत. तीन वर्षाचा एकदम ठराव न करता, सभागृहाला अस वाटत असेल, तीन वर्षाचे आपण त्यांना अधिकार न देता आपण टप्पा टप्याने देऊ या. त्याचा पहिले अनुभव बघु अनुभव चांगला राहिला तर मुदतवाढ देऊ. नाही वाटल तर आपल्याला ठेका केव्हाही रद्द करता येईल. तसा ही आपण आता ठराव करतांना निर्णय घ्यायला हरकत नाही आणि दोन तीन जे याच्या मधील ईच्छुक सदस्य आहे त्यांनी एक दोन तीन दिवसामध्ये काही आताच्या अटीशर्तीचा अभ्यास करून जर काही सुचना केल्या तर आपण त्याही सुचनाचा अंतरभाव नविन करारामध्ये करु या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला हेच म्हणायचे होते आयुक्त साहेब, आपल्याला जर ठेका द्यायचाच असेल तर तीन वर्षाचा न देता, एक वर्षाचा द्यावा मला तेच म्हणायचे होते.

**मा.सभापती :-** मुळात मला येथे हे लक्षात आणुन द्यायचे आहे. आता जस सन्मा.ढेकळेदादा यांनी सांगितल, ई-निविदेचा महासभेचा ठराव होता आणि प्रशासनाने टेक्नीकल कारणांमुळे कोटेशन पध्दतीने राबवली, निविदा मागविले, कोटेशन पध्दतीने असे उल्लेख आहे, मी पेपरला जी तुमची जाहिरात वाचली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ही ई-निविदा आहे की, टेंडर पध्दत आहे की, आपण डायरेक्टली मागविलेले आहे.

**मा.सभापती :-** डॉकेटचा जो संदर्भ आहे आपला त्याच्यात आपण म्हटलेल आहे, कोटेशन पध्दतीने.

**मा.आयुक्त :-** त्याला आपण कोटेशन म्हणतो, आपण जे टेंडर म्हणतो ना, आता त्याच्यामध्ये दोन गोष्टी आहे. एक म्हणजे जस मागच्या महासभेच्या वेळेला मला वाटत, नितीन भाऊंनी हा मुद्दा काढला होता. तो फार महत्वाचा मुद्दा होता की, राज्य शासनाने अस नियम केलेल आहे की, ३ लाखाच्या वर आता तुम्हाला जे काही कॉन्ट्रॅक्ट करायचे असेल ई टेंडर पध्दतीने करा. ई टेंडर म्हणजे राज्य शासनाची जी महाटेंडर साईट आहे. त्याच्यावर आपण ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने टेंडरींग करतो. दुसरी पध्दत म्हणजे दोन लाखाची जी आपल्या महापालिकेच्या अधिनियमात तरतुद आहे.दोन लाखाच्या आत आपल्याला वर्तमानपत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द न करता आपण स्पॉट कोटेशन, कोटेशन याच अर्थ दरपत्रकाची चौकशी करणे, दरपत्रक पध्दतीने आपण दोन लाखापर्यंत घेऊ शकतो.आपल्या कायद्यामधील तरतुद आहे. राज्य शासनाने ही तीन लाखापर्यंत केलेली आहे. याची चर्चा आपण परवा केलेली होती. आपण याच्या मध्ये कोणाकडुन ही तीन कोटेशन न घेता, रितसर वृत्तपत्रामध्ये जस उदयनी सांगितल दै.लोकमत मध्ये म्हणजे चांगला खप असलेल्या वर्तमान पत्रामध्ये आपण टेंडर प्रसिध्द केलेल आहे. फक्त हे कन्वेंन्शनल टेंडर आहे. नेहमीच टेंडर आहे. हे टेंडर ३ लाखाच्या वर असेल तरच ती वेबसाईट एक्सेप्ट करते. त्याच्यामुळे याला ई-टेंडर न म्हणता, आपला रेग्युलर टेंडर आहे. निविदा प्रक्रिया राबवुन त्याच्यामध्ये जे काही प्रस्ताव आले, त्या प्रस्तावामधुन जो आपल्याला जास्त रॉयल्टी देणार अशी संस्था निवडण्याचा प्रस्ताव आता आपण स्थायी समिती समोर ठेवलेला आहे.

**मा.सभापती :-** आता हा विषय जो आयुक्त साहेब आपण ठेवलेला आहे. या विषयामध्ये जी कागदपत्रांची मागणी आपण निविदा प्रक्रियेच्या वेळेला केलेली होती, माझ्या माहिती प्रमाणे, ती कागदपत्रे सुध्दा जी संस्था येथे पात्र ठरत आहे प्रशासनाच्या म्हणण्यानुसार त्या संस्थेच्या पात्रता यादी मधल्या कागदपत्रांमध्ये सुध्दा अपुर्णता आहे. अस असतांना हा विषय सभेसमोर मंजुरीसाठी आणणे कुठपर्यंत योग्य आहे. जेव्हा आपण प्रशासन म्हणुन इतर काही टेंडर प्रक्रिये मध्ये फार काटेकोर पध्दतीने नियमावलीच पालन करतो की, निविदेमध्ये जी जी काही कागदपत्र मेन्शन केलेली आहे, ती पात्र संस्थेने दाखल केलेली आहे की नाही. हे प्रशासन इतर बाबतींमध्ये इतका काटेकोरपणे पाळत, त्यावेळेला हीच पध्दत येथे का लागु केली गेली नाही. या विषयामध्ये अश्या अनेक गोष्टी आहे की, ज्यांचा आपल्याला येथे ठराव करणे मध्ये अडचण येऊ शकते. त्यामुळे माझी सभागृहाला हीच सुचना असणार आहे आणि विनंती असणार आहे की, हा विषय आपण पुन्हा एकदा महासभेसमोर नेऊ या. तेथे आपण याच पुर्ण धोरणात्मक निर्णय घेऊ या. सगळया सदस्यांच्या ज्या काही सुचना आहे. त्या तेथे अंतरभुत करून नविन पध्दतीने पुन्हा एकदा हि फ्रेश निविदा प्रक्रिया राबवुनच हा विषय मार्गी लावावा.पुन्हा अश्या तांत्रिक आणि कायदेशीर अडचणी आपल्या समोर येणार नाही आणि हा जो काही उशिर झालेला आहे. ह्या निविदा प्रक्रिया राबविण्याच्या उशिराला प्रशासनच सर्वस्वी जबाबदार आहे. याच्यामुळे याची जबाबदारी प्रशासनाने घेतलीच पाहिजे आणि पुढची निविदा प्रक्रिया मात्र इमिजेट राबविली पाहिजे. त्याला उशिर करता कामा नये. हा विषय आपण आज येथे अमान्य करु या आणि हा विषय महासभेसमोर पुन्हा या विषयाशी संबंधी सर्व बाबींची संपुर्ण चर्चा करून जस नितीन भाऊंनी आणि विष्णु भाऊंनी एक मुद्दा लक्षात आणुन दिला होता की, बालगंधर्वाची शहरातली आणि अत्यंत मोक्याची जेथे

आजुबाजुला अनेक शाळा आहेत.ही जागा आपण कोंडवाडयासाठी दिलेली आहे. या बदल सुध्दा प्रशासनाने दुसरा पर्यायी जागेचा विचार करावा. आणि इतर सदस्यांनी सांगितलेल्या नियमानुसारचे अटीशर्ती बनवुन पुन्हा हा विषय नव्याने महासभे समोर आणावा.

**श्री.नितीन लढढा :-** तो पर्यंत ज्या मक्तेदाराची मुदत संपुष्टात आलेली आहे. त्याच काम तातडीने प्रशासनाने थांबवाव.

**मा.सभापती :-** म्हणुनच प्रशासनाने हा विषय सत्वर पुर्ण करून मार्गी लावाव. महासभेसमोर हा विषय त्वरीत पाठवावा.

**श्री.नितीन लढढा :-** तस बघितल तर प्रशासनाने खुप सखोलपणे, विस्तृतपणे समाधान सभागृहाचा करून दिलेला आहे. परंतु तरी सुध्दा सभागृहाची ईच्छा असेल की, नव्याने निविदा प्रक्रिया राबवायची आहे. परंतु वेळेचाच प्रश्न येतो. मनुष्यबळाचा प्रश्न येतो. पुन्हा महासभा केव्हा निघेल, त्याच्यामध्ये विलंब होईल. तर याबाबत पुर्नविचार एकदा करावा आपण. खुप काही गंभिर विषय आहे. तांत्रिक कारणाने आणि तांत्रिक बाबींच ही मा.आयुक्त साहेबांनी समाधान केलेल आहे.कुठे कोटयावधी रूपयांचा एखादा विषय राहिला असता ज्याच्या प्रक्रियेमध्ये अनियमितता झालेली नाही. परंतु अनियमित्तेच्या बाबतीने प्रशासनाने सभागृहाच योग्य पध्दतीने समाधान केलेल आहे.वेळखाऊ प्रक्रिया टाळण्याच्या दृष्टीकोणातुन सभागृहाने विचार करावा. अन्यथा सभागृहाची ईच्छा असेल की, नव्याने निविदा प्रक्रिया राबवायची तर नव्याने राबवा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, आपण जे म्हणत आहे की, त्याच्या मध्ये काही कमी त्रृटी राहिल्यात. ज्या वेळेस आपण जाहिरात दिली. त्यावेळेच्या जे काही प्रक्रियेमधील त्रृटी आहे ज्या आपण नोंद केल्या होत्या त्याच्यात काही त्रृटी राहिल्या आहेत का ? याच उत्तर मिळाव. जी जाहिरात दिली होती आपण लोकमतला तर त्या माध्यमातुन काही त्रृटी त्याच्यात राहिल्या आहेत का?

**मा.आयुक्त :-** सन्मा.विष्णुभाऊंनी जे मुद्दे उपस्थित केले किंवा मा.सभापती महोदयांनी जे उपस्थित केलेले आहे. जे काही आपण पात्रतेचे निकष ठरविले होते. त्या निकषाला पात्र असणाऱ्या संस्था टेक्नीकल स्क्रुटीनी मधुन पुढे आलेल्या आहे की, काही अपात्र संस्थाची शिफारस प्रशासनाकडुन झालेली आहे का याची एकदा खातरजमा होणे गरजेच आहे. जस सभापती म्हटल्या की, काही संस्था पात्र नसतांना ही त्यांना पात्र ठरविल गेल आहे अस नाही. पण केल्या आहे का हे एकदा बघुन घ्या. आणि एकदा त्याची खात्री करा. जे काही कागदपत्रांची पात्रता, निविदासाठी पात्र ठरण्यासाठी करणे गरजेच होत. सगळया कागदपत्रांची पुर्तता झाली आहे की, अपुर्ण आहे. ज्या संस्थांची शिफारस आपण स्थायी समिती समोर केलेली आहे प्रशासनाने आपण टेन्डर मध्ये घातलेल्या अटीशर्तीना पात्र ठरता की नाही.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** सन्मा.सभागृह आपण निविदा प्रक्रिया करतांना जवळपास ११ कागदपत्रांची मागणी केलेली होती. त्याच्यामध्ये संस्थेचे कंपनीचे आपले नोंदणी प्रमाणपत्र असेल. धर्मदाय आयुक्त यांचेकडुन गोसेवा शाळेच प्रमाणपत्र असेल, राज्य कामगार विमा याच प्रमाणे पत्र असेल, संस्थेच्या नावाने भविष्य निर्वाह निधी पी.एफ.चे नोंदणी प्रमाणपत्र असेल,संस्थेच पॅनकार्ड असेल, जी.एस.टी.नोंदणी पत्रक असेल, शासकीय निमशासकीय संस्थेने त्यांचा कामाचा अनुभव मागविलेला होता. निविदा धारकावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याबाबतचा प्रमाणपत्र घेतलेल आहे. कंत्राटाने कालावधी करावयाच्या पगारचा दर महिना १० तारखेपर्यंतचा विषय आहे आणि बयाना अश्या मागण्या आपण या निविदेमध्ये केलेल्या आहेत.प्रशासनाच्या वतीन मला अस वाटत की, जी आवश्यक दस्तऐवज या निविदेसाठी अभिप्रेत आहेत. त्या मागविण्यात आलेल्या आहेत. आणि त्याची निविदा कमिटीने सुध्दा शिफारस केलेली आहे.

**मा.सभापती :-** क्र.२ आणि क्र.३ याची कागदपत्रे संस्थेने जोडलेली नाही. जी पात्र संस्था प्रशासनाने शिफारस केलेली आहे त्यांनी क्र.२ धर्मदाय आयुक्त यांच गोसेवा शाळेचा प्रमाणपत्र जोडलेल नाही. आणि क्र.३ चा राज्य कामगार विमा कायदा १९४८ अंतर्गतचा नोंदणी प्रमाणपत्र ते सुध्दा जोडलेल नाही. हे त्या डॉकेटच्या अभ्यासानंतर निदर्शनास आलेल आहे. असे अनेक गोष्टींच्या त्रृटी येथे दिसुन येत आहे. त्याच्यामुळे आपण या विषयावर खुप चर्चा न करता, हे संपुर्ण डॉकेट पुन्हा चांगल्या पध्दतीने तयार करून महासभेसमोर आणाव, पुढचा विषय घ्या.

**नितीन लढढा :-** निर्णय घेण्या संदर्भात आमच आक्षेप नाही. परंतु सभापती महोदया, आपल्याला या बाबत काही शंका असेल किंवा अजुन काही अवलोकन करायचे असेल. मला वाटत हा विषय तहकुब ठेवुन कारण काय आहे महासभेसमोर जायला अनिश्चित काळ आहे. महिना लागेल दोन महिने लागेल, स्थायी समिती सभा आपण दर आठवडयाला घेऊ शकता.आपण तहकुब करून सर्व कागदपत्रांच अवलोकन करून जर कधी समाधान होत असेल तर तसा पुढच्या स्थायी समिती सभेसमोर निर्णय घेता येईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, सन्मा.सदस्यांनी जे विचार मांडले, शेतकऱ्यांच्या बाबतीत, याच्या बाबतीत या आधी ही चर्चा झालेली आहे. प्रशासनाने याच्या बाबतीत काही विचार केला का ? अटीशर्ती मध्ये त्याची नोंद घेतली का ? आणि का नाही घेतली ? आणि घाई मध्ये घेतलेला कुठलाही निर्णय अडचणीचा ठरतो. आपण वाटरग्रेसच्या संबंधात पाहिलेल आहे. आपल्याला लवादाचा विषय आहे की, इतकी घाई कशासाठी आज ? अश्या तांत्रिक अडचणी निर्माण होतात आणि मग ठेकेदार सभागृहाला अडचणीत आणण्याचा काम करतो.

**मा.सभापती :-** आपली प्रशासनाला हीच सुचना आहे की, सन्मा.सदस्यांच्या ज्या काही सुचना आहे त्याच अंतरभाव या निविदा प्रक्रियेमध्ये दिसुन येत नाही. अटीशर्ती मध्ये दिसुन येत नाही. महासभेने ई-निविदा पध्दतीने केल होत, टेक्नीकल अडचणी होत्या.ते जरी मान्य केल तरी सुध्दा, कागदपत्रांची पुर्तता जी संस्था पात्र प्रशासनामार्फत दाखविली जात आहे. त्यांची दिसुन येत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा ही प्रक्रिया करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, तेच म्हणतो मी आपल्याला की, या संदर्भातल डॉकेट पुनश्च आपण एकदा अवलोकन करून घ्याव. निविदा प्रक्रिया मध्ये जस प्रशासन म्हणत आहे की, संपुर्ण अटीशर्तींची पुर्तता झाल्यानंतरच निविदा छाननी समितीने ते मान्य केलेले आहे.

**मा.सभापती :-** क्र.२ च्या कागदपत्रे दिसत आहे का तुम्हाला तेथे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब ठेवा, तहकुब ठेवुन पुढच्या स्थायी समितीमध्ये योग्य तो निर्णय असेल, पुन्हा ई-टेंडर करायच असेल किंवा पुन्हा महासभेकडे जायचे असेल तर तो निर्णय अबाधीत आहे आपला.

**श्री.भगतराम बालाणी :-** मा.सभापती महोदया, या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे सर्व सन्मा.सदस्यांनी आपआपले विचार मांडले आहे, या विषयावर लवकर निर्णय घेऊन पुढचा विषय सुरु करावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** गटनेते, निर्णय घ्या ना मग.

**श्री.भगतराम बालाणी :-** विष्णु भाऊ जर प्रत्येक सदस्य परत परत तोच विषय मांडत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** निर्णय घ्या ना मग लवकर तुम्हीच

**मा.सभापती :-** कागदपत्रांची पुर्तता दिसुन येत नाही. संस्था जी पात्र प्रशासनाने म्हटलेली आहे. ती पात्र दिसत नाही. तरी पुन्हा हा विषय प्रशासनाने तयार करून सादर करावा. महासभेसमोर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे पण, मुदत त्याच्या संपुष्टात आलेली आहे. त्याच काम प्रशासनाने त्वरीत थांबावाव.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** सर्वानुमते आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदर विषयाचे डॉकेट चे संपूर्ण अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, महासभा ठराव क्र.२१७ दि.१५/११/२०१९ अन्वये ३ वर्षासाठी ई-निविदेव्दारे संस्थेची निवड करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र प्रशासनाने सदर प्रकरणी ई-निविदा न काढता परस्पर कोटेशन पध्दत राबविण्याचा निर्णय घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करुन सदर प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रकरणी महासभेच्या ठरावाच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यांत आल्याचे दिसून येते. सबब सदर प्रकरणी ई-निविदा शक्य नसल्यास प्रशासनाने सदर बाब पुन्हा महासभेसमोर आणणे आवश्यक होते. तरी सदर प्रकरणी आज सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदस्यांनी सुचविलेल्या सर्व नियम व अटींचा अंतर्भाव असलेला प्रस्ताव तयार करुन त्वरीत सदर प्रकरण पुन्हा महासभेपुढे उचित निर्णयास्तव सादर करण्यात यावे. तसेच सदर मक्त्याची मुदत संपलेली असल्याने मक्तेदाराचे काम त्वरीत रद्द करुन पुढील मक्तेदाराची नियुक्ती होईपावेतो सदरचे काम मनपा कर्मचाऱ्यांमार्फत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्र. ७:-** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे कामी त्यांची विल्हेवाट लावणे कामी मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक राम सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांचे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नेमणूक करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया,

**मा.सभापती:-** बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हा विषय मान्य आहे पण १० महिन्यापुर्वी सभेत सदर विषय आलेला असतांना आम्ही काही सुचना प्रशासनाला केल्या होत्या व त्या प्रशासनाने मान्य देखील केल्या होत्या. मात्र त्याची अंमलबजावणी आता पर्यंत केलेली दिसुन येत नाही. दोनच्या एवजी चार कर्मचारी व त्यासाठी वाहन अशी मागणी केली होती. हे अत्यंत आवश्यक आहे आणि प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. याच उत्तर सांगावे प्रशासनाने.

**मा.सभापती :-** सदर विषया संदर्भात मागच्या सभेत जेव्हा हा विषय आला होता, नितीन भाऊंना सुध्दा आठवत असेल की, ही सेवा खुप आवश्यक सेवा आहे आणि हे दोनच कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासुन आपल्याकडे ही सेवा देत आहे. अनेक ठिकाणांवरून मेलेली जनावरे उचलण्या संदर्भातल्या तक्रारी प्राप्त होत असतात आरोग्य विभागाकडे, आणि दोन कर्मचारी हे मनुष्यबळ तेथे कमी पडत आहे. जेव्हा मागे हा विषय सभेसमोर आला होता त्यावेळेलाच सन्मा.सदस्यांनी सुचना दिल्या होत्या की, प्रत्येक प्रभाग समितीसाठी एक कर्मचारी म्हणजे दोनच्या ऐवजी चार कर्मचारी करण्यात यावे.आणि या कर्मचाऱ्यांना वाहन सुध्दा उपलब्ध करून देण्यात याव. कामगारांसहीत हे प्रशासनाने मान्य देखील केल होत. पण या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाकडुन झालेली दिसुन येत नाही. ती अंमलबजावणी का होऊ शकलेली नाही, प्रशासनाने स्पष्ट कराव.

**श्री.नितीन लढढा :-** वाहन उपलब्ध करून दिलेले आहे.

**मा.सभापती :-** दोनच्या ऐवजी चार कर्मचारी करावे म्हणजे प्रत्येक प्रभाग समितीला एक कर्मचारी राहिल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया,

**मा.सभापती :-** चर्चा होत आहे, सगळे सदस्यांच याच्यावर एकमत आहे की, दोनच्या ऐवजी चार कर्मचारी करावे. हा निर्णय पुर्वी झाला आहे. पण त्याची अंमलबजाणी झालेली नाही. प्रशासनाने याची नोंद घ्यावी की, त्वरीत अंमलबजावणी झाली पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि दुसरे असे की, सहा सहा महिन्याची जी मुदतवाढ देतो आपण, त्यांला आता या सभेतच असा धोरणात्मक निर्णय घ्यावा की, ११ महिन्याची मुदतवाढ द्यावी. घडीघडी तो निर्णय आपल्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांना घेता येत नाही.

**मा.सभापती :-** घेता येईल का? करता येईल का अस ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** करता येईल का ११ महिन्याची मुदत ?

**मा.सभापती :-** नियमानुसार करता येईल का तरी प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ११ महिन्याचा आहे का नियम, कारण आपण त्यांना ठेकेदारी पध्दतीने पेमेंट करत आहे. ११ महिन्याच बनवा, घडीघडी कागदपत्र बनविणे, मुदत संपल्यावर परत हा विषय येतो सभेमध्ये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, आयुक्त साहेब, या विषयाला अनुसरून एक विषय आहे. जळगांव शहरामध्ये कुत्र्यांची संख्या खुप वाढलेली आहे आणि नागरीकांचे वारंवार या विषयी फोन येत असतात आणि मला वाटत आपण निर्बीजीकरणाची प्रक्रिया ही थांबविलेली आहे की सुरु आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती महोदया, या कुत्र्यांच्या बाबतीत सांगु ईच्छितो की, रात्री झुंडचे झुंड कुत्रे प्रत्येक चौकामध्ये झालेले आहे. मी महापौरताई आणि आयुक्त साहेबांना अर्ज सुध्दा दिलेला आहे. रात्री हे असे आवाज येतात की, प्रभागातुन नागरीक रात्री दोन वाजता फोन करतात की, भाऊ हे कुत्रे हाकलायला लावा म्हणजे ते कुत्रे हाकलण्याच काम सुध्दा नगरसेवकाने केल पाहिजे अशी ईच्छा नागरीकांची आहे. तुम्हाला वाटत असेल तर रात्री दोन वाजता कोणा कोणाचे फोन आले मी ते सुध्दा प्रुफ देतो. गावात असा कुठलाच चौक सुटलेला नाही म्हणजे अध्यक्ष महोदया, ओंकार नगर असेल, माझ्या घरासमोरचा एरिया असेल, गांधी नगर असेल, नवजीवन मंगल कार्यालयाच्या मागे, जयकिसन वाडीतला विषय असेल. आकाशवाणी चौक असेल हॉटेल रॉयल पॅलेस असेल असे विविध शनिपेठ आहे. काल रात्री १.४५ वाजता एक जण मला उठवायला घरी आला होता. या कुत्र्यांसाठी घरी १.४५ वाजता. मी तेव्हा उठलो आणि अक्षरश: साहेब माझ्या जवळ माणसांची लाईन लागुन जाते. एकाला मी फोन केला आणि सांगितल की, जा याच्या बरोबर आणि ते कुत्रे हाकलुन ये. म्हणजे हे काम सुध्दा केल साहेब, काल १.४५ वाजेची गोष्ट आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जर ते नियमानुसार ११ महिने होत असेल तर ते करावे आणि पुढची कार्यवाही करावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नवनाथ भाऊ आपण कुत्र्यांचा विषय आहे आणि आपण त्याच्यावर चर्चा करावी.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुनिल खडके :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** सन्मा.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो विषय असा आहे की कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावा मुळे ते काम बंद होते.मागील आठवड्यात त्यांना काम सुरू करण्यासंदर्भातील आदेश देण्यात आलेले होते.त्यांनी काम देखील सुरू केले होते आणि शहरातील प्राणी संस्थांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या कामामध्ये काही त्रुटी असल्याचे त्यांनी सांगीतले होते. तसेच आयुक्त साहेबांच्या दालनामध्ये त्या प्राणी संस्थांचे प्रतिनिधी आणि ते मक्तेदार

यांची बैठक झाली आणि त्या बैठकीमध्ये त्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत की कुत्र्यांच्या बाबतीमध्ये शास्त्रोक्त पध्दतीने निर्बीजीकरण करण्याचा अवलंब त्यांनी करायचा आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती महोदया, आयुक्त साहेब मी मागे आपल्याशी पण त्या कुत्र्यांच्या बाबतीत चर्चा केली होती. आणि मला असे वाटते की आपले जे निर्बीजीकरणाचे काम आहे. आयुक्त साहेब ते लवकर करण्यात व त्याच्या अटी शर्ती तरी आयुक्त महोदय व सभापती महोदय हि पध्दत आपण पुन्हा चालु करण्यात यावी आणि नविन कुत्र्यांच्या अटी शर्ती टाकुन ती आपण सुरू करावी. तरी आयुक्त साहेबांनी या गोष्टी कडे लक्ष द्यावं.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता पर्यंत निर्बीजीकरण झालेल्या कुत्र्यांची संख्या भेटेल का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.अध्यक्ष महोदय , या बाबतीमध्ये आपण स्थायी समिती सभापती सुध्दा आयुक्त साहेबांकडे गेले होते त्या आकड्यापेक्षा आजच्या तारखेला राजुभाऊ आता आपल्याला याच्यापुढे काय करता येईल.मागील वेळेला त्यांनी जे काही कुत्रे पकडून घेवुन गेलेले होते निर्बीजीकरणासाठी त्यातील बरेच कुत्रे ईतके खराब झालेत की ते अक्षरश: म्हणजे गल्ली मध्ये सुध्दा फीरण्याच्या लायकीचे नाहीत म्हणून तो प्राब्लेम येवु नये म्हणून याची आपण कारवाई करतांना दक्षता घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुढचा विषय घ्यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अहो नवनाथ भाऊ हा विषयपत्रिकेवरीलच विषय आहे. शहराचा विषय आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ तो मान्य केला आहे. तरी तुम्ही त्याच्यावर चर्चा करताय.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** याच्या संदर्भात त्यांच्या ज्या मुदतीच्या बाबतीतील ज्या तरतूदी आहेत.स्थायी समितीला एक सांगणे राहील की याच्यामध्ये सहा महीन्यांचा कालावधी राहील तरी या येत्या सहा महिन्यांमध्ये यांच्या निर्बीजीकरणाची कार्यवाही करता येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चार लोक घ्यायला हरकत नाही.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** चार लोकांना जर याची मान्यता दिली तर आपण निश्चितच त्याच्यावर अंमलबजावणी करणार तसेच मेलेले कुत्रे उचलण्यासाठी चार लोक जर दिले कारण आता परिस्थिती कशी आहे की आता जर स्थायी समितीने जर मान्यता दिली याच्याबाबतीत परवानगी दिली तर या बाबतीत तर नक्की याबाबत जे कोणी तयार असतील तर आपण करू.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चार लोक घ्यायला हरकत नाही.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे या विषयाला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे करीता मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक राम सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांची उपायुक्त मनपा जळगांव यांचे आदेश क्र. जा.क्र./आस्था/१४०७/२०१९ दि.२०/११/२०१९ नुसार दि.२७/०८/२०१९ ते दि.२६/०२/२०२० या सहा महिन्याच्या कालावधी करीता सदर कर्मचाऱ्यांकडुन दैनंदिन मेलेली जनावरे उचलणेचे काम करुन घेण्यात येत आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्रं.१७४ दि.१४/११/२०१९ नुसार जा.क्र./आस्था/५३६/ दि.२३/०७/२०१९ अन्वये दरमहा रु.१४,०००/- (माहे जून २०१९ पासून) अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. मेलेले जनावरे उचलणेचे काम करणारे सफाई कामगार श्री.अशोक राम सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे हे गेल्या १५ ते १६ वर्षापासुन शहरातील मृत जनावरे उचलणेचे काम करीत आहेत.

सदरचे गलीच्छ काम करणेस कोणतेही कामगार तयार होत नसल्याने अत्यावश्यक सेवेची निकड लक्षात घेता स्थायी समिती ठराव क्र. १७४ दि.१४/११/२०१९ अन्वये श्री. अशोक राम सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे सदर मानसेवी कामगार यांना दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कर्मचारी यांची नियुक्ती दि.२७/०८/२०१९ पासुन सहा महिने करिता केलेली असून त्यांची मुदत दि.२६/०२/२०२० ला संपलेली असलेने पुर्वीच्या नियुक्ती मध्ये 2 दिवसांचा खंड देवुन दि.२९/०२/२०२० पासुन नव्याने दरमहा रु.१४,०००/- प्रमाणे सहा (६) महिनेच्या कालावधीसाठी नियुक्ती देणेस व सदर कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.१,६८,०००/- ला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच स्थायी समिती ठराव क्रं.१७४ दि.१४/११/२०१९ अन्वये प्रभाग समिती क्रं.१ ते ४ याठिकाणी प्रभाग समिती निहाय एक याप्रमाणे उपरोक्त दोन कर्मचारी व्यतिरिक्त अजुन दोन कामगार सहा महिन्याच्या

कालावधीसाठी नियुक्त करणेस व त्याअनुषंगीक येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच प्रभाग समिती १ व २ यांचेकरिता संयुक्त एक पिकअप व्हॅन तसेच प्रभाग समिती ३ व ४ यांचेकरिता संयुक्त एक पिकअप व्हॅन वाहन चालकासह उपलब्ध करुन दयावे

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** **१६** **प्रतिकुल मते :-** **००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र.८:-** आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत मतदार संघा साठी उपलब्ध होणाऱ्या निधीतुन कोव्हीड-१९ या विषाणु संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंधात्मक व नियंत्रण करणेसाठी औषधी खरेदी करणेस्त प्राप्त झालेल्या सर्वात कमीचे ई-निविदेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.भगतराम बालाणी :-** मा.सभापती साहेब, आयुक्त साहेब आणि नगरसचिव साहेब, क्र.८ आणि क्र.९ एकच विषय आहे आमदार निधी मधले, मी याच्यात एक प्रस्ताव मांडु ईच्छितो, जस जगभरात आणि त्या अनुषंगाने भारतात कोरोना महामारीचा जो संसर्ग झाला होता. त्या अनुषंगाने आमचे दोघ आमदार, आमदार श्री.चंदुभाई पटेल आणि आमदार श्री.राजुमामा भोळे यांनी आपले कर्तव्य समजुन जळगांवकरांसाठी, त्यांचे हितासाठी दवाई उपलब्ध आणि लवकरात लवकर झाले पाहिजे. म्हणुन त्यांनी कुठलीही देर न करता त्यांनी त्यांच्या निधीतुन ५०-५० लाख रुपये हे उपलब्ध करुन दिले होते परंतु काय विषय का दिरंगाई झाली, एक वेळा नाही, दोन वेळा नाही, चार चार वेळा ती निविदा प्रसिध्द करु न सुध्दा ते निर्णय घेता आला नाही. निर्णय घेता आला नाही. म्हणुन आमदार श्री.राजुमामा भोळे आणि मा.आ.श्री.चंदुभाई पटेल यांनी प्रशासनाला पत्र देऊन त्यांच्या ५० लाखच्या निधीतुन दोन दोन ॲमब्युलन्स आणि ॲन्टीजेन किट हे खरेदी करण्यात यावे ही विनंती केलेली आहे. मी सभागृहाला आणि आपल्याला विनंती करु इच्छितो की, दोघी आमदारांनी विनंती केलेली आहे. त्याला अनुसरु न ॲमब्युलन्ससाठी आणि ॲन्टीजेनकिटसाठी दिरंगाई न करता ताबडतोब त्याची अंमलबजावणी करावी. कारण ॲमब्युलन्स ही खुप अत्यआवश्यक सेवा आहे. जळगाव शहराची लोकसंख्या बघता आपण कोरोनाचे प्रादुर्भावापुर्वी सुध्दा लोक संख्याच्या दृष्टीने आपल्याकडे ॲमब्युलन्स हे कमी पडत होत्या. आता कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर रात्र बे रात्र पेशन्टांना आणणे, परत त्यांना सोडण यासाठी ॲमब्युलन्स खुप आवश्यक आहे. त्यामुळे या प्रस्तावामध्ये दुरुस्ती करुन आणि कोरोनासाठी जे काही दवाई लागणार आहे ते आपण म.न.पा. फंडातुन त्याची निविदा काढावे किंवा म.न.पा. इतर फंड जे शासकीय कोरोना फंड येईल मा.सभापती महोदया, आणि म.न.पा.फंडातुन त्याची प्रक्रिया ताबडतोब राबवावी असा मी प्रस्ताव मांडत आहे.

**मा.सभापती :-** भगतभाईंनी मांडलेला प्रस्ताव लक्षात ठेवा आणि आमदाराने दिलेल्या पत्रावर लवकरात लवकर अंमलबजाणी करावी.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** आमदार श्री.राजुमामा भोळे आणि आ.श्री.चंदुभाई पटेल यांनी हा निधी या विषयासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे म्हणुन मी आमदार श्री.राजुमामा भोळे आणि आ.श्री.चंदुभाई पटेल यांचा जळगांव शहरवासीयांतर्फे आभार मानतो.

**श्री.नितीन लढढा :-** जर कधी आता संपुर्ण आमदार निधी डोळयासमोर ठेवुन या निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेल्या होत्या. सन्मा.आमदारांच म्हणण अस आहे की, त्यांच्या आमदार निधीतुन काम बदल करण्याचे जर सुचना असतील तर मला वाटत हा निधी जो आहे आपण १४ व्या वित्तीय आयोगातुन खर्च करु शकतो. जी निविदा प्रक्रिया आता पर्यंत राबविलेली आहे. आपण उत्तर द्या.

**श्री.संतोष वाहुळे :-** सन्मा.सभापती महोदया , मा.आयुक्त साहेब तसेच सन्मा.सभागृह आता हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे की हा निधी कुठुन खर्च करावा. तर सद्यास्थितीत उपलब्ध असलेली आमदार निधीतुन किंवा म.न.पा. निधीतुन खर्च करावा.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आवाज येत नाहीये साहेब.

**श्री.संतोष वाहुळे :-** आता पर्यंत आपल्याला जे आदेश मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी दिलेले आहेत. त्यामुळे आपल्याला हे काम निविदा प्रक्रीया आपण मुदतीत नाही केलेली नाही तर आपल्याला मनपा निधी खर्च करावा लागेल.

**मा.आयुक्त :-** आमदार निधीमधील जे काम आपण घेतले होते आता आपल्या अभियंत्यांच्या गरजेप्रमाणे आपण त्यावेळेला सुरूवातीला केले होते. आता आपल्याला निविदा प्रक्रीया ज्या आहेत त्याच्यामध्ये वेळ झालेला आहे. परंतु तर आता आपल्याला जेवढा वेळ असेल तर आपण ती निविदा प्रक्रीया राबवुन याच्यामध्ये सगळे त्याचे व्हेरीफीकेशन आपले उपायुक्त करू शकतील जर वेळ नसेल तर आपण याच्यावर सविस्तर चर्चा करू. याच्या मध्ये जाणीवपुर्वक वेळ झालेला नाहीये. कारण हि निविदा प्रक्रीया मोठी आहे तसेच हि निविदा प्रक्रीया तांत्रिक स्वरूपाची आहे. त्याच्यामध्ये सर्व जे अॅटम आहेत हे ते आपल्या महापालिकेचे अॅटम आहेत की जे आपली महापालिका पर्चेस करत नाही तरी याच्यामध्ये अतिशय काळजीपुर्वक काम करावे लागेल आणि आपल्याला याच्यामध्ये ज्या दिवशी तांत्रिक अडचणी आल्यात म्हणून आपण हि निविदा प्रक्रीया लांबवलेली आहे.परंतू आता याच्यामध्ये जसे उपायुक्तांनी सांगितले की, मा.आमदारांच्या सुचनेप्रमाणे एक गोष्ट मान्य आहे हाआमदारांचा निधी आहे तर त्यांना त्यांच्या स्वेच्छेने ते निधी खर्च करण्याचे सुचविण्याचे अधिकार आहे. जरी प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी देत असतील. तरी सुध्दा त्याच्यावर आमदारांचे जे प्रस्ताव आहे त्याला महत्व आहेच. अद्यापपावेतो उपायुक्तांनी सांगितल्या प्रमाणे मा.जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला निधी उपलब्ध करुन दिलेले नाही. दोन्ही आमदार महोदयांकडुन आपल्याला २५-२५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे परंतु दोन्हीही आमदार महोदयांनी आपल्याला प्रस्ताव मंजुर करुन दिलेला आहे. जिल्हाधिकारी महोदय त्याच्यावर निर्णय घेतील. आणि जर आपण याच्यामधुन कॉम्पुटर आणि रेफ्रीजेरेटर, जे आपल्याला तातडीने गरजेच होत.तेव्हा आपण हे निधी खर्च केल नाही की, आमदारांनी खर्च सुचविलेल आहे. वस्तुस्थिती आपण मा.जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणुन दिलेली आहे. आताचा जो विषय आहे. जशी सन्मा.सदस्यांची सुचना आहे हे निधीतुन जर अॅम्ब्युलन्स आणि अॅन्टीजेन किट मागवायच असेल. तर आपल्याला याच्यामध्ये काही आयटम्स कोविडसाठी म्हणा किंवा अन्य हॉस्पीटलच्या दैनंदिन गरजेचे असतील. ते आपण मेडीकल ऑफिसरच्या सुचनेप्रमाणे मागण्या द्याव्या लागतील. याच्यासाठी या निधीचे आपल्याला अन्य ही उपयोग करुन उपलब्ध करून घ्यावे लागतील. आता सन्मा.नितीन भाऊंनी जी सुचना मांडली १४ व्या वित्तीय आयोगात बसेल का ? प्रथम दर्शनी बसणार नाही असे दिसत आहे. कारण १४ व्या वित्तीय आयोगासाठी नाही हा निधी फक्त स्वच्छतेसाठी वापरावे असे म्हटलेले आहे. उपचारासाठी कदाचित बसणार नाही. जर नसेल तर मा.महासभेत मा.सभापती स्थायी समितीच्या सुचनाप्रमाणे जी आपण ६० लाखाची तरतुद ५ कोटी केली. त्याच्यापैकी काही निधी आपल्याला याच्यामध्ये वापरात येऊ शकेल. काही निधी आपण मंजुर करुन घेऊ या. जशी जशी गरज भासेल तशी तशी मागणी देऊन आपल्या निधीमधुन किंवा अनुज्ञेय असेल तर १४ व्या वित्तीय आयोगातुन आपण खर्च करु या. आता अॅम्ब्युलन्स खरेदी असेल किंवा अॅन्टीजेन किट खरेदी असेल. याच्यासाठी अॅम्ब्युलन्स आपल्याला Gem Portal वर उपलब्ध होत नाही. आणि अॅन्टीजेनच्या बाबतीत तर ISI marked कंपन्याच अधिकृत केलेल्या आहे तर याच्याबाबतीत विलंब लागणार नाही अशी मी खात्री करतो.

**मा.सभापती :-** आता मा .आयुक्त साहेबांनी जसे सांगीतले आहे त्याप्रमाणे आयुक्त साहेब व प्रशासनाने कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या मागणीनुसार कोरोना (COVID १९) विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक औषधी पुरवठा करणे कामी आयुक्त यांचे दि.१८/०६/२०२० मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१८ (१)/२०२०-२१ (Tender ID २०२०-JCMCJ-५८७२६६-१) HTTP://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन अशी ई-निविदा सुचना म.न.पा.पत्र क्रं.भांडार/६६/२०२०-२१ दि.२२/०६/२०२० अन्वये दै.पुण्यनगरी (राज्यस्तरीय) या वर्तमान पत्रात दि.२३/०६/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार संकेतस्थळाव्दारे निविदा भरणे करीता दि.२२/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. दि.०१/०७/२०२० रोजी ०८ ई-निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी आयुक्त यांच्या दि.२८/०७/२०२० च्या मान्यतेने ५ निविदाधारक पात्र झालेले आहेत.

पात्र निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्त्यातील दरानूसार प्रत्येक बाबनिहाय येणारा L१ पाहाता खर्चात बचत होवून गुणवत्तापूर्ण औषधी प्राप्त होवू शकत असल्याने आलेल्या दरांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च हा मा.आमदार महोदयांनी दिलेल्या पत्रानुसार त्यांचे विनंती व सूचनेनुसार आमदार निधीतून न करता मनपा निधी अगर कोरोना साठी प्राप्त होणाऱ्या इतर विशेष निधीतून करावा व मा.आमदारांच्या निधीतून रुग्ण वाहिका व अॅन्टीजेन किट खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ९ :-** आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत मतदार संघा साठी उपलब्ध होणाऱ्या निधीतुन कोव्हीड-१९ या विषाणु संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंधात्मक व नियंत्रण करणेसाठी अत्यावश्यक साधनसामग्री किटस् इत्यादी साहित्य खरेदी करणेस्त प्राप्त झालेल्या सर्वात कमीचे ई-निविदेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.भगतराम बालाणी :-** विषय मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या मागणीनुसार कोरोना (COVID १९) विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक साधनसामग्री किटस् इत्यादी साहित्य पुरवठा करणे कामी आयुक्त यांचे दि.१८/०६/२०२० मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१८ (२)/२०२०-२१ (Tender ID २०२०-JCMCJ-५८७२६६- २) http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन अशी ई-निविदा सुचना म.न.पा.पत्र क्रं.भांडार/६६/२०२०-२१ दि.२२/०६/२०२० अन्वये दै.पुण्यनगरी (राज्यस्तरीय) या वर्तमान पत्रात दि.२३/०६/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार संकेतस्थळाव्दारे निविदा भरणे करीता दि.२२/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. दि.०१/०७/२०२० रोजी प्राप्त अहवालानुसार ०७ ई-निविदाधारक ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी आयुक्त यांच्या दि.२८/०७/२०२० च्या मान्यतेने ४ निविदाधारक पात्र झालेले आहेत.

पात्र निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्त्यातील दरानूसार प्रत्येक बाबनिहाय येणारा L१ पाहाता खर्चात बचत होवून गुणवत्तापूर्ण औषधी प्राप्त होवू शकत असल्याने आलेल्या दरांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च हा मा.आमदार महोदयांनी दिलेल्या पत्रानुसार त्यांचे विनंती व सूचनेनुसार आमदार निधीतून न करता मनपा निधी अगर कोरोना साठी प्राप्त होणाऱ्या इतर विशेष निधीतून करावा व मा.आमदारांच्या निधीतून रुग्ण वाहिका व ॲन्टीजेन किट खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. १०:-** महानगरपालिका वाहन क्रं.एम.एच.१९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी रक्कम रु.४०,८३९/- मात्र खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत:-** विषय मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अध्यक्ष साहेब, महानगरपालिकेचे जे.सी.बी. किती दिवस झाले बंद आहे.

**कर्मचारी वाहन व्यवस्था :-** महानगरपालिकेचे आता तीन जे.सी.बी. चालु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तीन कोणते चालु आहे, एक बांधकामाच एक पाणीपुरवठ्याच आणि एक आरोग्याच.

**श्री.विष्णु भंगाळे :- आरोग्यच काय ?**

**कर्मचारी वाहन व्यवस्था :-** अरोग्याचे जे.सी.बी. पंक्चर होत. ते काढले आहे आता.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कितीदा पंक्चर काढले आपण त्याचे पंक्चरची किती अमाऊंट झाली. सभापती महोदया, किती आमाऊंटचे पंक्चर काढले आहे आता पर्यंत आणि किती पंक्चर काढलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आम्ही मागणी करतो तर, जे.सी.बी.बंदची आम्हाला सुचना येते.

**मा.सभापती :-** मा.नितीन भाऊंनी हा मुद्दा आजच्याच सभेमध्ये थोड्या वेळापुर्वीच मांडलेला आहे. प्रशासनाला सदस्यांची वारंवारची तक्रार आहे की, ट्रॅक्टर मिळत नाही, जे.सी.बी. मिळत नाही. या तक्रारींची दखल प्रशासनाने गंभीरपणे घ्यायची आहे आणि नादुरुस्त असलेली ही अत्यावश्यक सेवा आहे. तर त्यांना ताबडतोब कार्यान्वीत करण्याची दक्षता घ्यावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया मी याच्या आधी सुध्दा पंक्चर वरती बोललो होतो. पण त्यावेळेस...

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, या जे.सी.बी. पंक्चरचा इतिहास आपण बघाल, जर जे.सी.बी.चे पंक्चर वारंवार होत आहे तर जे.सी.बी.चे टायर बदलुन घ्यावे. याची सुरुवात झाली दि.११/१२/२०१९ आणि त्याच्यावरती आज स्थायी समितीची सभा आहे आणि आज सभेमध्ये हा मुद्दा उपस्थित होऊ शकतो. मा.सहा.आयुक्त यांच्या पर्यंत दि.२४/०८/२०२० ला हा प्रस्ताव जाऊन पोहचलेला आहे. एकाने आठ महिन्यापहिले ही मागणी केली, आठ महिन्यामध्ये टायर पंक्चर होतात, पंक्चरवर खर्च हातो मान्य, परंतु एका टायरचे पंक्चर काढण्या संदर्भात एका टायरचा पंक्चर काढण्यामध्ये साधारणता ४ ते ५ तासाचा कालावधी लागतो. आणि म.न.पा.ची आर्थिक कुवत बघता रिपोर्टींग मध्ये सुध्दा लिहलेले आहे. टायर वाला मद्रासी यांना पैसे मिळत नसल्याने तो सुध्दा पंक्चर काढण्याच्या संदर्भात नकार देतो. महत्वाची वाहने आहे दोघ आपण घनकचरा व्यवस्थापनाला जाऊन भेट द्या. त्या वेळेला तुम्हाला त्या जे.सी.बी.ची उपलब्धता किती महत्वाची आहे. आणि जर दिवसातुन दोन वेळा चार वेळा पंक्चर होत असेल. तर त्याच वर्कींग आवर(working hour) जे आहे. ते फक्त एक किंवा दोन तासाच असत. बाकीच संपुर्ण दिवस जे आहे ते पंक्चर काढण्यामागे जात. आता आठ महिन्यापुर्वी दिलेली मागणी आज सहा.आयुक्तांपर्यंतच पोहचली. तर मला सांगा कस काय काम होणार. परिस्थिती इतकी भयानक आहे आणि त्या परिस्थितीलाच अनुषंगुन हा एक मुद्दा उपस्थित होतो की, घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या संदर्भात निविदा प्रक्रिया झालेली आहे. कोणत्यातरी पुण्याच्या कंपनीने ते मक्ता घेतलेला आहे. आज समजा ४ कोटी रुपयांची ती निविदा, परंतु कुठल्याही प्रकारच काम त्याच्यावर होत नाही. वास्तविक बघितले तर ही त्या कंपनीच्या मक्तेदाराची जबाबदारी आहे. मक्तेदार नेमका काय करतो याच्या संदर्भात चर्चेचा विषय प्रशासनाने अजुन पर्यंत केलेला नाही. आणि या सभागृहात ही उपस्थित झालेले नाही. तो ही एक गंभीर विषय आहे आणि वाहनांच्या दुरुस्तीच्या संदर्भातला विषय हा सुध्दा गंभीर आहे. आठ आठ नऊ नऊ महिने एका छोटयाश्या कामासाठी, हे टायर जास्तीत जास्त पन्नास हजार ते लाख रुपयांचा विषय असेल. परंतु लाख रुपयासाठी आपली २५-२५ लाख रुपयांची मशिनरी ही निव्वळ तेथे नावाला काम करत दिसतो. पण त्याच्यातुन कामे होत नाही. आणि दिवसांदिवस ही परिस्थिती भयानक होत चालली आहे. म्हणुन बायोमिनचे जे मक्तेदार आहे त्याच्या संदर्भात सुध्दा या सभागृहात स्पष्ट होणे अपेक्षित आहे. आणि या वाहनांना दुरुस्तीसाठी इतक विलंब का होत. याच्या संदर्भातली भुमिका सुध्दा या सभागृहासमोर येणे अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त :-** आपल्याला जे लागणारे स्पेअरपार्टस आहे ते ई-निविदा प्रक्रियेने खरेदी करुन घेतो. याच्या बाबतीत मुख्यलेखा परिक्षकाने असे शेरे दिलेले होते. अश्या प्रकारे ३ लाखाच्या वर जे निविदा आहे ते ई-निविदेने करावे. त्याच्यावर आयुक्तांनी असे लिहलेले आहे की, तातडीने ई-निविदा प्रक्रिया करुन त्याच्या मध्ये मक्तेदार निश्चित होई पर्यंत आपली जी वर्षानुवर्ष चालविलेली पध्दत आहे त्यात या आर्थिक वर्षात कोणत्याही वस्तु खरेदी करण्यासाठी मान्यतेचा प्रस्ताव सादर करावा. एवढया सक्त सुचना असुन सुध्दा यांना ते करता आले नाही का ? दुसरी गोष्ट याच्या मध्ये नितीन भाऊंनी जो मुद्दा उपस्थित केला, मागच्या डिसेंबर मध्ये डिसेंबर २०१९ मध्ये काही तरी मान्यतेचा प्रस्ताव आला आणि त्या सहाय्यक आयुक्तांकडे यायला म्हणजे एक स्टेप पुढे यायला आठ महिने लागले. हि कसली कार्यक्षमता आहे. का नाही ही निविदा राबवु शकला,म्हणजे सदस्यांची तक्रारी येत आहे आणि जे.सी.बी. हे अत्यावश्यक वाहन आहे ते पण पावसाळयामध्ये गटार चोकअप असेल, नाले साफसफाई असेल किंवा रस्ते दुरुस्तीसाठी काही ठिकाणी आपल्याला मुरुम टाकण्यासाठी वाहने लागतात. मला सांगा आरोग्यचा मोठा जे.सी.बी. किती दिवस दुरुस्तीसाठी पडुन राहिल. वाहन दुरुस्ती करणे हे गरजेच आहे ना. यासाठी ऑडिटर नाही म्हणणार नाही किंवा आयुक्त नाही म्हणणार नाही. या गोष्टीचा परिणाम आरोग्यावर पडतो. शहराच्या नागरीकांना आणि सदस्यांना सामोरे जाव लागत. प्रशासनाकडे जर या तक्रारी आलेल्या आहे तर संबंधीत सदस्यांकडे ऑलरेडी ह्या तक्रारी आलेल्या असतात आणि अश्यावेळेला सदस्यांकडून प्रश्न उपस्थित होतो कि अधिकारी जर काम करत नसतील तर मग काम कसे होतील हे सभागृहात आता उपस्थित होतो. प्रशासनास प्रत्येक वॉर्डही आवश्यक आहे. विशेष करून आरोग्याच्या बाबती मध्ये , पाणी पुरवठ्याच्या बाबती मध्ये जे धोरण आपण आखलेले आहे. काही त्याच्यामध्ये मान्यतेचे काहीही राहणार नाही हे बघुन घ्या. आताही तुम्ही सांगताहेत की मध्ये मा.आमदार

महोदयांनी एक पत्र दिले होते. त्याला उत्तरही दिले नव्हते.अश्या पध्दतीने जर वाहन विभागाचे काम चालणार असेल तर मग प्रशासनाला पण तश्या पध्दतीने वागाव लागेल.

**श्री.**नितीन लढ्ढा :- साहेब एक वाहन आहे ते दुरूस्ती साठी गेले होते.अश्याप्रकारे कंपनीच्या मालकाने ५ दिवस वाहन तिथे कंपनीच्या ताब्यात देतात आणि तो म्हणतो कि मला पैसे द्या तर मी वाहन ताब्यात देईल. शेवटी उदय पाटील साहेबांना फोन करून सांगीतले की ही कुठली पध्दत आहे. एखादा रिपेअर करणारा तो महानगरपालिकेचा काही फायनांसर नाहीये की जो जेणेकरून वाहन जप्त करून घेवुन जावे. दुरूस्ती साठी दिलेले वाहन आहे. पैश्यासाठी ताब्यातच देणार नाही. त्याला तक्रार असेल तर त्याने रितसर महानगरपालिके विरूध्द त्याच्या थकीत रकमेच्या बाबतीत दावा दाखल करायला पाहीजे. परंतू बेकायदेशीर रित्या वाहन ताब्यात ठेवुन ते वाहन परत न देण्याच्या संदर्भातील हि भुमिका सुध्दा चुकीची आहे. त्याच्या बाबतीत ही प्रशासन काही पाऊलं उचलत नाही.

**मा.आयुक्त :-** वाहन विभागाकडुन आपल्याला काही माहिती दिली असती तर आपण त्याच्या संदर्भामध्ये सुध्दा कार्यवाही करू.आता आपल्या ज्या अडचणी आहेत. खरोखर अश्या पध्दतीने महानगरपालिकेचे वाहन नियमबाह्य पध्दतीने जर का वाहन अटकावुन ठेवत असेल. तर मग आपल्याला निर्णय घेणे गरजेचे आहे. असे काही घडत असेल तर तुम्ही त्याच्यावर कार्यवाही करा. आणि जर आता ठिक आहे की महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती जी आहे की आपण त्याचे पमेंट वेळेवर त्याला देवु शकत नाहीयेत आणि अश्या वेळेला तो काम करत नसेल तर ती कार्यवाही करावी यासंबंधी त्यावेळी वाहन विभागाने प्रस्ताव ठेवुन ती पुढील कार्यवाही करावी. याच्यामुळे विस्तृत कामाला वेळ लागणार नाही . तरी याची दक्षता घ्यावी. याबाबतीत मी आढावा घेतो आणि येणाऱ्या पुढील मिटींगमध्ये आपण यावर चर्चा करूया.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका आयुक्त कार्यालयाकडील प्रशासकिय वाहन क्रं.एम.एच.१९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) हे वाहन कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालील तक्त्यात नमूद दुरुस्ती, पार्टस् बदली करणे आवश्यक आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर), (उत्पादीत वर्ष मार्च-२०११) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील कामे |
| १ | पॉवर स्टेअरिंग मॉडल, एअर बॅंग मॉडल, मेंटींग सेट नविन, वॉशिंग व क्लिनिंग करुन मिळावे इ. |
| २ | CONTROLLER ASSY, EPS |
| ३ | CONTROLLER ASSY, A/B |
| ४ | ABS ACTUATOR ASSY OR ABS HYDRAULIC UNIT / CONTROL MODULE ASSY |
| ५ | ELECTRICAL POWER STEERING CONTROLLER |
| ६ | FLOOR CARPET |
| ७ | VEHICLE WASHING & CLEANING |

| वर्षनिहाय दुरुस्ती खर्च | | |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१८-१९ चा एकुण दुरुस्ती खर्च | आर्थिक वर्ष २०१९-२० चा एकुण दुरुस्ती खर्च | आर्थिक वर्ष २०२०-२१ चा आजपावेतोचा दुरुस्ती खर्च |
| हिस्ट्री बुकनुसार रक्कम रु.४७,१४६/- | हिस्ट्री बुकनुसार रक्कम रु.४४,०४३/- | हिस्ट्री बुकनुसार रक्कम रु.३०५/- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्तीची कामे, पार्टस् बदली करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता मे.मानराज मोटर्स जळगांव यांचेकडील सर्व्हीस इस्टीमेट क्र.ES२००००३८७ दि.०९/०७/२०२० अन्वये सदर वाहनाचे दुरुस्ती करण्याकामी येणारा रक्कम रु.४०,८३९/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ११:-** कोवीड-१९ चे रुग्ण व संशयित रुग्णांच्या तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) अत्यंत आवश्यकता असल्याने शासनाने निर्देशीत केलेल्या SD Biosensor Manesar, Gurugram (Haryana) यांचे कडून खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.१५,१२,०००/- मात्र चे खर्चास प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे:-** विषय मान्य आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** योग्य विषय आहे सभापती महोदया त्याच्या पर्यायी खर्चाला सुध्दा मान्यता देण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** हा जो आपला खरेदीचा विषय आहे अँटीजीन टेस्ट किटचा तर याच्यामध्ये आपल्याला जस जशी गरज आहे जसे जसे आपल्याला हया किट खरेदी करावे लागणार आहेत तर माझी सभागृहाला अशी विनंती आहे की आपली जर सभागृहाची मान्यता असेल तर ज्या ज्या वेळेला लागणार असेल तर त्या त्या वेळेला ज्या ICMR ने ज्या निश्चित केलेल्या कंपन्या आहेत किंवा जे दर आहेत तर आपण त्यावेळी त्यांच्या कडून हया किट घेवु . त्याप्रमाणे आपण ऑर्डर देवु तर आपण जर मान्य करत असाल तर सोईस्कर होईल. त्याचे दर सुध्दा मार्केटला कमी होताहेत. पहिले रु.४५०/- होते नंतर दुसऱ्या कंपनीचे रु.४४०/- आले. त्यानंतर पहिले कंपनीने रु.४१०/- दिले. यात जस कॉम्पीटीशन होते तसे दर कमी होतात. असे कमीचे दर आल्याने आपल्याला निविदा प्रक्रिया राबविण्याची गरज नाही. त्यासाठी संमती असावी. ज्या वेळेला आम्ही खरेदी करु त्या वेळेला तसा प्रस्ताव आम्ही महासभेसमोर सादर करु.

**श्री.नितीन लढढा :-** योग्य विषय आहे. आणि येणाऱ्या पर्यायी खर्चाला सुध्दा...

**श्री.दिलीप पोकळे :-** २४ तारखेच्या लोकमत पेपरला आणि दिव्यमराठी पेपरला बातमी आहे. त्याच्यात पेपरला अस म्हणत आहे. हॉकर्ससह, व्यवसायीकाकडे कोरोना तपासणीचे प्रमाणपत्र बंधनकारक, त्यांची टेस्ट करणे बंधनकारक आहे व्यापाऱ्यांची अशी एक बातमी आलेली आहे. आणि एका वृत्तपत्रात अस आलेल आहे की, लक्षण नसलेल्या व्यापाऱ्यांची कोविड चाचणी करु नये. शासनाचे निर्देश आहे. या दोन वृत्तपत्रामध्ये हे जे दोन विरुध्दात बातम्या आलेल्या आहे त्याच्या बद्दल प्रशासनाचे काय म्हणणे आहे खुलासा करावा.

**श्री.संतोष वाहुळे, उपायुक्त :-** मा.सभागृह व सन्मा.सदस्य या विषयाबद्दल जो आता प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्या प्रश्नाबद्दल मी अस सांगु ईच्छितो की, व्यापाऱ्यांची तपासणीसाठी आपण चौबे शाळेत आयोजन केलेले होते. २४ तारखेपासुन २९ तारखेपर्यंत आपण सर्व व्यापाऱ्यांची चाचणी केली. परंतु दोन दिवसापुर्वी शासनाने अशी सुचना दिलेली आहे की, व्यापाऱ्यांसाठी ॲन्टीजेन टेस्ट नाही. जर खुपच सिमटम्स दिसत आहे. तर टेस्ट करण्यात यावी अदरवाईझ टेस्ट करण्याची गरज नाही. अशी स्पष्ट सुचना शासनाने दिलेली आहे. परंतु ज्यांचे सिमटम्स दिसत असतील त्यांनी ते टेस्ट कराव. आपल्याला जे आदेश मिळालेल आहे त्याची पायमल्ली होऊ नये म्हणुन आपण ही पध्दत पाडली आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपणास अशी विनंती आहे की, याच्या संदर्भात एक प्रेसनोट आपण द्यावी. कारण या दोन बातम्या एकाच दिवशी दोन वेगवेगळया वृत्तपत्रात आलेल्या आहे. लोकमत आणि दिव्यमराठीला. दोघांचे अर्थ वेगळे आहेत. लोकांमध्ये संभ्रम आहे. तरी आपण एक प्रेसनोट द्यावी. कशाला बंधनकारक आहे कश्या परिस्थितीत बंधन कारक आहे. त्याचा खुलासा करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोविड-१९ चा संसर्ग सतत वाढत असल्याने संशयित कोविड-१९ रुग्णांची स्थानिक पातळीवर तात्काळ तपासणी होवुन उपचार सुरु करणे व त्यायोगे मृत्युदर कमी करणे आवश्यक आहे.

यासाठी, Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) चा वापर करुन वरील संशयित रुग्ण शोधणे वेळेत शक्य होणार आहे. तरी Rapid Antigen Test Kit सत्वर खरेदी करुन व ICMR व्दारे निश्चीत करुन दिलेल्या मानकांनुसार त्याचा तात्काळ वापर सुरु करणेबाबत जिल्हाधिकारी जळगांव यांनी जा.क्रं.स्वीय सहा/कवि/२०२०/५६/१२७/२२१० दि.१५/०७/२०२० अन्वये आदेशीत केले आहे. प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या मागणी नुसार Rapid Antigen Test Kit तात्काळ शासनाने प्रमाणीत केलेल्या पुरवठादाराकडून ३००० किट खरेदी करणे आवश्यक आहे.

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोविड-१९ चे रुग्ण व संशयित रुग्णांच्या तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) ची अत्यंत आवश्यकता आहे. शासनाने निर्देशीत केलेल्या SD Biosensor Manesar यांनी दिलेले दरपत्रक खालील प्रमाणे आहे.

Rapid Antigen Test Kit :- रु.४५०/- प्रति किट + रु.५४/- (१२%GST) = रु.५०४/- प्रति किट

एकूण रक्कम रु.५०४/- x ३००० किट = रक्कम रु.१५,१२,०००/- मात्र

उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.१५,१२,०००/- मात्रच्या खर्चास तसेच Rapid Antigen Test Kit ची आवश्यकता लक्षात घेता यासोबतच अजून १० हजार किट खरेदी करणेस व प्रशासनाने आवश्यकतेनूसार वेळोवेळी Rapid Antigen Test Kit खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास तसेच सदर खर्च Diagaonstic including Sample transport या लेखा शिर्षाखाली करणे व Rapid Antigen Test Kit ची तात्काळ आवश्यकता असल्याने शासन निर्देशीत केलेल्या SD Biosensor Manesar, Gurugram (Haryana) पुरवठादार यांना कार्यादेश निर्गमीत करणेस व सदरची खरेदी मनपा लेखाशिर्षाव्दारे त्याचे समायोजन एकत्रित प्राप्त रकमेतून करणेस (मनपा निधीमध्ये) मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. १२:-** कोवीड-१९ चे रुग्ण व संशयित रुग्णांच्या तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) अत्यंत आवश्यकता असल्याने शासनाने निर्देशीत केलेल्या Mylab Discovery Solutions Pvt.Ltd.Pune यांचे कडून खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.४९,२८,०००/- मात्र चे खर्चास प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे:-** विषय मान्य आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोविड-१९ चा संसर्ग सतत वाढत असल्याने संशयित कोविड-१९ रुग्णांची स्थानिक पातळीवर तात्काळ तपासणी होवुन उपचार सुरु करणे व त्यायोगे मृत्युदर कमी करणे आवश्यक आहे.

यासाठी, Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) चा वापर करुन वरील संशयित रुग्ण शोधणे वेळेत शक्य होणार आहे. तरी Rapid Antigen Test Kit सत्वर खरेदी करुन व ICMR व्दारे निश्चीत करुन दिलेल्या मानकांनुसार त्याचा तात्काळ वापर सुरु करणेबाबत जिल्हाधिकारी जळगांव यांनी जा.क्रं.स्वीय सहा/कवि/२०२०/५६/१२७/२२१० दि.१५/०७/२०२० अन्वये आदेशीत केले आहे. प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या मागणी नुसार Rapid Antigen Test Kit तात्काळ शासनाने प्रमाणीत केलेल्या पुरवठादाराकडून १०००० किट खरेदी करणे आवश्यक आहे.

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोविड-१९ चे रुग्ण व संशयित रुग्णांच्या तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit (ICMRव्दारे प्रमाणीत) ची अत्यंत आवश्यकता आहे. शासनाने निर्देशीत केलेल्या Mylab Discovery Solutions Pvt.Ltd.Pune पुरवठादार यांच्या कडून सदर किट खरेदी करता येईल. Mylab Discovery Solutions Pvt.Ltd.Pune यांनी दिलेले दरपत्रक खालील प्रमाणे आहे.

Rapid Antigen Test Kit :- रु.४४०/- प्रति किट + रु.५२.८०/- (१२%GST) = रु.४९२.८०/- प्रति किट

एकूण रक्कम रु.४९२.८०/- x १०००० किट = रक्कम रु. ४९,२८,०००/- मात्र

उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.४९,२८,०००/- मात्रच्या खर्चास तसेच सदर खर्च Diagaonstic including Sample transport या लेखा शिर्षाखाली करणे व Rapid Antigen Test Kit ची तात्काळ आवश्यकता असल्याने शासन निर्देशीत केलेल्या Mylab Discovery Solutions Pvt.Ltd.Pune पुरवठादार यांना कार्यादेश निर्गमीत करणेस तसेच सध्यास्थितीत सदर टेस्ट किट ची खरेदी मनपा निधीतून करुन भविष्यात याचे समायोजन शासनाव्दारे प्राप्त निधीव्दारे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. १३:-** जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे कामी दैनंदिन ४५०(आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे कामी येणारा रक्कम रु.४,२८,४९,८१०/- मात्र चे खर्चास प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत:-** विषय मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे कामी दैनंदिन ४५०(आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे बाबत आयुक्त यांचे दि.१०/०७/२०२० रोजी निविदा प्रक्रिया राबविणेकरीता प्रशासकिय मान्यता प्रदान केलेली आहे.

उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.४० / सन-२०२०-२१ https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच ई-निविदा सुचना आरोग्य वि./जा.क्र./२७७/२०२०-२१ दि.११/०७/२०२० नुसार ई-निविदा सूचना दैनिक लोकमत (मराठी) जिल्हास्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. दि.२१/०७/२०२० रोजी विहित मुदतीत फक्त २ निविदा म.न.पा.संकेतस्थळावर प्राप्त झाल्यामुळे आयुक्त यांचे दि.२२/०७/२०२० चे मान्यतेने स्पर्धात्मक निविदा प्राप्त होणेसाठी ५ दिवसांकरिता मुदतवाढ देण्यात आलेली होती. विहित केलेल्या मुदतीत संकेतस्थळावर ३ निविदा पुढीलप्रमाणे प्राप्त झालेल्या आहेत, १) भिमज्योत महिला बचत गट,जळगांव २) आराध्या इन्फ्रास्ट्रक्चर सोलापुर ३) दिपक उत्तराधी, अमरावती सदर ३ निविदाधारक पात्र ठरत असल्याने निविदा समितीच्या तसेच आयुक्त यांच्या दि.०४/०८/२०२० च्या मान्यतेने आर्थिक लिफाफा क्र.२ उघडला असता प्राप्त तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहेत.

| निविदाधारकांचे नांव | पुरवठा करावयाची कामगार संख्या | किमान वेतन + सेवाकर एकूण रुपये | सेवाकर प्रती दिवस खर्च रुपये | सेवाकर मासिक खर्च रुपये (३० दिवस) | किमान वेतन रु.५२९/- प्रमाणे मासिक खर्च रुपये | किमान वेतन + सेवाकर मासिक खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| दिपक उत्तराधी, अमरावती | ४५० | ५२९+०.०१ = ५२९.०१ | ४.५० | १३५.०० | ७१,४१,५००/- | ७१,४१,६३५/- |
| आराध्या इन्फ्रास्ट्रक्चर सोलापुर | | ५२९+७२ =६०१ | ३२,४००/- | ९,७२,०००/- | | ८१,१३,५००/- |
| भिमज्योत महिला बचत गट,जळगांव | | ५२९+४९ =५७८ | २२,०५०/- | ६,६१,५००/- | | ७८,०३,०००/- |

तुलनात्मक तक्ता पाहता L१ निविदाकार मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांचे सर्वात कमी प्राप्त सेवाकर प्रती कामगार प्रती दिन रु.०.०१(पैसा) =रु.५२९.०१ असा आहे. त्यांनी अंदाजपत्रकिय दरात काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

| कामगाराचा किमान वेतन दर | मक्तेदाराचा सेवाकर | एकुण रुपये | दैनंदिन कामगार संख्या | प्रती दिन खर्च | प्रतीमहा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| रु.५२९/- | रु.०.०१/-(पैसा) | रु.५२९.०१/- | ४५० | रु.२,३८,०५४.५०/- | रु.७१,४१,६३५/- |

म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड केअर सेंटर व क्वारंटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे इ. कामी आवश्यकतेनुसार दैनंदिन

४५० कामगार पुरवठा करणेसाठी महापालिकेने ठरवलेले किमान वेतन दर रु.५२९/- + L१ निविदाकार मे.दिपक उत्तराधी,अमरावती यांचे प्राप्त सेवा कर रु.०.०१/- असे एकूण रु.५२९.०१/- प्रती दिन प्रती कामगार प्रमाणे एका दिवसाला रु.२,३८,०५४.५०/- प्रती दिवस आणि ३० दिवसांकरिता रु.७१,४१,६३५/- खर्च येणार असून ६ महिन्यांकरिता रक्कम रु.४,२८,४९,८१०/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

L१ निविदाकार मे.दिपक उत्तराधी,अमरावती यांचे प्राप्त झालेल्या रु.५२९.०१/- प्रती दिन प्रती कामगार दरास, कामगार पुरविणेस तसेच ६ महिन्यांकरिता रक्कम रु.४,२८,४९,८१०/- येणाऱ्या खर्चास व सदर खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून करणेस तसेच याबाबत L१ निविदाकार यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (ड) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १४:-** सन २०२०-२१ आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका मालकीच्या विविध वाहनांकरिता आवश्यक लागणारे साहित्य (स्पेअर पार्टस्), टायर टयुब फलॅप, बॅटरी, देखभाल दुरुस्ती, इंधन इ. अधिकृत विक्रेत्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता खरेदी करण्याकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.भगतराम बालाणी :-** सन २०१३ पासुन निविदा न मागविता आपण हे साहित्य खरेदी करीत आहे. आपण आता यात जे नमुद केलेल आहे की, पुढच्या दोन महिन्यात निविदा काढुन आपण ते साहित्य खरेदी करावा. माझी सभागृहाला विनंती आहे की, तातडीने ८ दिवसाच्या आत याची प्रक्रिया पुर्ण होऊन साहित्य निविदेनेच खरेदी करण्यात यावे. जे काही पार्ट निविदेमध्ये मेन्शन नाही आणि आपल्या गाईडलाईन्स मध्ये मेन्शन नाही. हे मा.आयुक्त साहेब प्रशासन आपल्या अधिकारात खरेदी करण्यात यावे. आणि वाहन प्रमुखाने पुढच्या सभेत, या सभेत जास्त वेळ न घालता, पुढच्या स्थायी समिती मध्ये सन २०१३ पासुन आजपर्यंत दर वर्षी निविदा न काढता किती आपण स्पेअर पार्टस घेतलेले आहे याचा संपुर्ण तक्ता सभागृहाला सादर करावा.

**श्री.दिलीप पोकळे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सन २०२०-२१ आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका मालकीच्या विविध वाहनांकरिता आवश्यक लागणारे साहित्य (स्पेअर पार्टस्), टायर टयुब फलॅप, बॅटरी, देखभाल दुरुस्ती, इंधन इ. अधिकृत विक्रेत्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता खरेदी करण्याकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, प्रशासनाच्या प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता वाहन व्यवस्था विभागासाठी कोणत्याही साहित्याची खरेदी करु नये. प्रशासनाने साहित्याची व कामाची निकड पाहाता दोन महिन्या ऐवजी आठ दिवसातच निविदा प्रक्रिया पुर्ण करावी व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो प्रशासनाने मनपा वाहनांकरिता आवश्यक ते साहित्य खरेदी स्वत:च्या अधिकारात शक्य असेल तेवढेच खरेदी करावे. पावसाळयाचे दिवस असल्याने साहीत्या अभावी वाहने बंद राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

तसेच सन २०१३ ते २०१९-२० पावेतो दरवर्षी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागवता कोणकोणते साहित्य कोणकोणत्या विक्रेत्यांकडून खरेदी केले त्याची सविस्तर माहिती पुढील होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेत सादर करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. १५:-** कोविड-१९ संसर्गामुळे निर्माण झालेल्या महामारीच्या काळात केशरी रेशन कार्डधारक तसेच विनारेशनकार्डधारक दिव्यांगांना रेशनापोटी/अन्नधान्यापोटी नोंदणीकृत प्रती दिव्यांगांना रक्कम रु.२०००/- त्यांचे बँक खातेवर वर्ग करणेबाबत तसेच सदर कामी येणारा अपेक्षीत अंदाजीत रक्कम रु.६,१४,०००/- मात्र खर्च दिव्यांग कल्याणाकरीता राखून ठेवलेल्या ५% निधी अंतर्गत करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे मात्र दिव्यांग बांधवांना हि रक्कम देणे हि माझी भावना आहे आणि हा विषय मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव दिव्यांग कल्याणकरीता आयुक्त यांचे परिपत्रक क्र.५९२ दि.२०/०७/२०२० अन्वये समिती गठीत केली असुन सदर समितीची बैठक दि.२२/०७/२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये नोंदणीकृत ३०७ दिव्यांगांना कोविड-१९ संसर्गामुळे निर्माण झालेल्या महामारीच्या काळात केशरी रेशन कार्डधारक तसेच विनारेशनकार्डधारक दिव्यांगांना रेशनापोटी/अन्नधान्यापोटी नोंदणीकृत प्रती दिव्यांगांना रक्कम रु.२०००/- त्यांचे बँक खातेवर वर्ग करणेस तसेच सदर कामी येणारा अपेक्षीत अंदाजीत रक्कम रु.६,१४,०००/- मात्र खर्च दिव्यांग कल्याणाकरीता राखून ठेवलेल्या ५% निधी अंतर्गत करणेस तसेच शहरातील नोंदणी राहिलेल्या इतर दिव्यांग बांधवांची नावे देखील यादीत समाविष्ट करण्यांत यावीत व त्यांना देखील सदर योजनेचा लाभ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १६ :-** कोविड-१९ केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, जेवण (मटेरिअल व मजुरी सह) रक्कम रु.१४०/- मात्र प्रतिदिन प्रति व्यक्ती नुसार पुरवठा करणेकामी श्री.लालाजी केटरर्स व पूजा केटरर्स यांना पुरवठा आदेश देणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब एक मिनिटं आता सांगीतले की. . .

**श्री.विष्णु भंगाळे :-** सर्व मंजुर आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे पण सद्यास्थितीत पुरवठा करणेकामी फक्त श्री.लालाजी केटरर्स यांचे नांव प्रस्तावीत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने कोवीड केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, दोन वेळेस जेवण, अंडी, फळे, काढा रक्कम रु.१४० मात्र प्रतिदिन प्रति व्यक्ती नुसार पुरवठा करणे बाबत दि.०५/०८/२०२० चे वृत्तपत्रात अल्प मुदतीची जाहिर ECI सुचना प्रसिध्द करण्यात आली होती, त्यानुसार एकुण सात पुरवठादारांन सहभाग नोंदवला असता त्यामध्ये सहा पुरवठादार

पात्र ठरले असता ते पुढील प्रमाणे १) लालाजी केटरर्स,जळगांव २) बडी बिजासनी महिला बचत गट ३) गणपती कॅन्टीन ४) पुजा केटरर्स ५) शबरी आदिवासी महिला बचत गट व ६) गौरी शंकर महिला बचत गट

भांडार जा.क्र.१४९ दि.१८/०८/२०२० अन्वये पात्र सहा पुरवठादार यांना पत्राव्दारे आपण आपले कडील क्षमता व अतिरिक्त काय मेनु देऊ शकता याबाबत विचारणा केली असता त्यांचे दि.११/०८/२०२० चे प्रस्ताव प्राप्त झाले, नुसार त्यामधील पुरवठादार १) लालाजी केटरर्स यांनी १५०० लोकांची क्षमता असले बाबत तसेच वरील अॅटम व्यतिरिक्त सोयाबीन राईस / व्हेज बिर्यानी तसेच रात्री एक ग्लास दुध हळदी युक्त देणेबाबत सुचविलेले आहे. तसेच २) पुजा केटरर्स जळगांव यांनी ३००० लोकांची क्षमता असलेबाबत व सोयाबीन राइस तसेच रात्री हळदी युक्त दुध देणेबाबत सुचविलेले आहे.

मात्र उपरोक्त पुरवठादारांपैकी केवळ लालाजी केटरर्स यांनाच रक्कम रु.१४०/- प्रतिदिन प्रति व्यक्ती नुसार पुरवठा करणेसाठी पुरवठा आदेश देणेस व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १७ :-** कोविड-१९ केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, जेवण (मटेरिअल व मजुरी सह) रक्कम रु.१४०/- मात्र प्रतिदिन प्रति व्यक्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणेकामी पुरवठादार श्री.लालाजी केटरर्स जळगांव यांना काम देणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय वस्तीगृह व शासकीय पॉलीटेक्नीक महाविदयालय वस्तीगृह येथील कोवीड-१९ सेंटर मधील कोवीड व क्वारंटाईन केलेल्या रुग्णांना चहा, दुध, बिस्कीट, नास्ता, अंडी, फळे, काढा व दोन वेळचे जेवन हे प्रतीदिन प्रती रुग्ण रु.१४०/- याप्रमाणे इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांचे कडून पुरविणेत येत आहे. त्यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्रं.ऑगस्ट ६/२०२०-२१ दि.१२/०८/२०२० चे पत्रानुसार सदर सुविधा बंद करत असले बाबत विनंती पत्र दिलेले आहे. रेड क्रॉसच्या वैदयकीय कारणामुळे सेवा कार्य एम.आय.डी.सी. तील ऋषीराज इंडस्ट्रीज,जळगांव यांचे कडे अन्न शिजवणे व वितरीत करणेचा परवाना असल्याने त्यांचे कडून सदरचे सेवाकार्य इंडियन रेडक्रॉस सोसायटी करुन घेत आहे. सदर कार्य ते वैदयकीय कारणास्तव यापुढे सुरु ठेवू शकत नसल्याने सेवा दि.१५/०८/२०२० पासुन बंद करत असलेबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने, स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव प्रसिध्दीव्दारे मागविले असता दि.०७/०८/२०२० रोजी एकूण ०७ प्रस्ताव प्राप्त झालेले असुन त्यातील ६ पात्र झालेले प्रस्ताव पुढील प्रमाणे, १) पुजा केटरर्स,जळगांव यांनी सकाळी चहा, नास्ता, १ अंडी, काढा, जेवणामध्ये ३ पोळी २ भाजी दाळ व भात, सोयाबीन राईस तसेच दुपारी चहा व १ फळ, संध्याकाळच्या जेवणात ३ पोळी १ भाजी भात व काढा, रात्री १ ग्लास हळदी युक्त दुध तसेच ३००० रुग्णांना जेवन पुरविणेची क्षमता असलेबाबत कळविले आहे. २) लालाजी केटरर्स यांनी सकाळी चहा, नास्ता, १ अंडी, काढा, जेवणामध्ये ३ पोळी १ भाजी दाळ व भात, सोयाबीन राईस/व्हेज बिर्याणी तसेच दुपारी चहा व १ फळ, संध्याकाळच्या जेवणात ३ पोळी १ भाजी, भात व काढा, रात्री १ ग्लास हळदी युक्त दुध तसेच १५०० रुग्णांना जेवन पुरविणेची क्षमता असलेबाबत कळविले आहे. ३) बडी बिजासनी महिला बचत गट यांनी नियमित १ बिस्कीट पुडा, दररोज १ फळ तसेच

आठवडयातून १ दिवस मांसाहार रुग्णांकरीता चिकन करी व शाकाहारी रुग्णांकरीता गोड पदार्थाचा समावेश असेल तसेच क्षमतेबाबत मनपा कडून मिळालेल्या सूचने नुसार पुरविणेची क्षमता याबाबत कळविले आहे. ४) गणपती कॅन्टीन आपण नमूद केलेल्या सर्व आहार मी उत्कृष्ट व चांगल्या प्रतीचा पुरविणार असले बाबत तसेच १९ रुग्णांसाठी योग्य असे हळद दुध पुरविणे बाबत तसेच २००० लोकांची क्षमते बाबत कळविले आहे. ५) शबरी आदिवासी महिला बचत गट यांनी ५०० ते १००० रुग्णांना जेवण देण्याची क्षमता असले बाबत तसेच या व्यतीरिक्त रुग्णांना आहारात काही पदार्थ अपेक्षीत असेल त्याबाबत लेखी मागणी आल्यास ते देखील देण्यास आम्ही तयार आहोत. असे कळविले आहे. ६) गौरी शंकर महिला बचत गट, यांनी सकाळचा चहा दोन वेळचे जेवन, संध्याकाळचा चहा, काढा, अंडी, फळे इ. या व्यतिरिक्त आम्ही शेंगदाना गुळाची चटणी व हळदी युक्त दुध तसेच १००० ते १३०० रुग्णांना जेवन पुरविणेची क्षमता असले बाबत कळविलेले आहे.

वरिल प्रमाणे पुरवठादारांचे प्रस्ताव पाहता गैरसोय होवू नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपात पूढील कालावधीसाठी लालाजी केटरर्स,जळगांव यांचे कडून उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रती रुग्ण रु.१४० मात्र याप्रमाणे चहा, दुध, बिस्कीट, नास्ता, अंडी, फळे, काढा व दोन वेळचे जेवन याप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात काम करुन घेणेस व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १८ :-** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३०/०३/२०२० ते दि.५/०४/२०२०, दि.०६/०४/२०२० ते दि.१२/०४/२०२०, दि.१३/०४/२०२० ते दि.१९/०४/२०२०, दि.२०/०४/२०२० ते दि.२६/०४/२०२० व दि.२७/०४/२०२० ते दि.०३/०५/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सौ.रेश्मा काळे :-** माहिती घेतली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३०/०३/२०२० ते दि.५/०४/२०२०, दि.०६/०४/२०२० ते दि.१२/०४/२०२०, दि.१३/०४/२०२० ते दि.१९/०४/२०२०, दि.२०/०४/२०२० ते दि.२६/०४/२०२० व दि.२७/०४/२०२० ते दि.०३/०५/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण संविदांची माहिती घेतलेली आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे:-** माहिती घेतली.

**श्री.चेतन सनकत:-** अनुमोदन आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** सभापती महोदया, सर्व संविदा वाचण्याची गरज नाही. इतके नंबर पासुन तर इतके नंबर पर्यंत.

**श्री.नितीन बरडे :-** अध्यक्ष महोदया, या संविदांमध्ये काही लाईटांचे कामे आहे. पहिले आमदार निधी पासुन काही लाईट लागलेले आहे जळगांव शहरात. ते बंद आहे काही ठिकाणी बंद आहे. त्यांची दुरुस्तीची व्यवस्था काय ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** याच्यामध्ये काय आहे की काही ठिकाणचे लाईटस बंद आहेत आणि याच्या पुर्वी जे आमदार निधीतुन काम करण्यात आलेले आहे. ते मिनी हायमस्ट चे काम पुर्ण केलेले आहे. त्याच्यामध्ये हायमस्ट दुरूस्तीचे काम सुरू आहे

**श्री.नितीन बरडे :-** साहेब असे हायमस्ट आहेत की वर्ष झाले ते बंद पंडलेले आहे.मुदत संपुन गेलीय काही भागातआमदार निधीतील लाईट चालु आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** रिपेअर ला काढुन नेले आहे का .

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग :-** आपण त्यांचे काम सुरू केलेले आहे. आणि त्याच्यामध्ये स्ट्रीट लाईट जे आहेत त्यंचेही काम आपण हाती घेणार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आपण फक्त मिटींग मध्ये सांगीतलेले लाईट सुरू करतो काही ठिकाणचे लाईट काढून नेलेले आहे. यांच्या माणसांनी काढून ईकडे तिकडे लावुन दिलेले आहेत.

**मा.आयुक्त :-** सगळयाच ठिकाणची ही परिस्थिती नाही आहे सगळया ठिकाणांची दुरूस्ती वेळोवेळी दुरूस्ती करण्याची कार्यवाही विद्युत विभागाने करावी . जर त्यांना काही अडचण असेल तर तसे सादर करा आणि बसविलेल्या लाईटची दुरूस्ती करणे याची खबरदारी घ्या.

**श्री.विष्णू भंगाळे :-** येणाऱ्या पुढच्या सभेत रिपोर्ट द्या.

**श्री.नितीन बरडे :-** साहीत्य जे होते माझ्या वॉर्डात माझ्या प्रभागामध्ये अमृतचे काम चालु आहे. काहि कॉलन्यांमध्ये ते काम उलट्या पध्दतीने होतय तर ते काम बंद केलेले आहे.त्याचं पुढे काय झालं

**मा.आयुक्त :-** माझ्या या सुचना आहेत आपली चर्चा झाल्यानुसार एजन्सी वाल्यांना मी सुचना दिलेल्या आहेत आणि आपल्याशी चर्चा करून कामाच्या दृष्टीने याची खबरदारी घ्यावी म्हणजे याच्यामध्ये आपल्याला जे काही लेआऊट बदल करावे लागतील ते चर्चा करून करू आपण त्यानंतर त्या ठिकाणी नविन पाईपलाईन टाकली जाईल.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला अस म्हणणे मांडायचे आहे की, प्रभाग क्र.२ या मध्ये अमृत योजना आणि ड्रेनेज याची सद्यास्थिती काय आहे. याच मला आढावा पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आता ज्या चाऱ्या खोदल्या आहेत त्यापण बुजवत नाहीत.आता येथे खडके साहेब पण आहेत. गिरणा टाकीवरून आमच्या भागातली टाकी भरली जाते आणि त्याच्यावरुन मग आमच्या वॉर्डामध्ये सप्लाय होतो. दिड वर्षापुर्वी खडके साहेबांना याच सभागृहात सुचना केली होती काव्यरत्नावलीचौकाच्या टाक्या कधीच भरल्या जात नाहीत नुसत्या देखावा म्हणून आहेत त्या डायरेक्ट पाणी जात आणि आमच्या उंच सखल भाग असल्यामुळे प्रेशरने पाणी येत नाही तर त्याचे काय प्रॉब्लेम आहे ते मला खडके साहेबांनी सुचित कराव कारण ईतके वर्ष झाले खडके साहेबांनी दिडवर्षापुर्वी सांगीतले होत की आपण नविन मोटर बोलवु मी त्यावेळेस खडके साहेबांना सुचना केली होती की ती मोटर येता येता तुम्ही रिटायर्ड होसान आणि तो टाईम आलाय.

**श्री.विष्णू भंगाळे :-** भाऊ ते पाणी पुरवठ्याला नाही आता.

**श्री.नितीन बरडे :-** तो टाईम आता आलाय .आमचा महाबळ परिसर ईतका मोठा परिसर आहे. पाण्याच्या टाकीची लेव्हल जी असते ती शुन्य लेव्हल असते

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आपल्याला त्या ठिकाणी जी मोटर बसवायची होती त्याच्यामध्ये काही निविदा प्रक्रीया मध्ये काही पुरवठादारांनी जे . . .

**श्री.नितीन बरडे :-** ते मला माहिती आहे वर्ष भरापासुन तेच चालु आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रभाग क्र.१ आणि प्रभाग क्र.२

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आपण तो प्रस्ताव तयार केलेला आहे. पाण्याच्या टाकीवर मोटर बसवायचा

**श्री.नितीन बरडे :-** साहेब गिरणा टाकीवर जवळ जवळ ३० ते ४० वर्ष जुन्या मोटारी आहेत. त्याला दुसरा पर्याय नाही का कारण की ४२ कोटी आहेत तर मग आज त्याठिकाणी सप्लाय होतोय मग मोटर का बसविलेली नाहीये.

**मा.आयुक्त :-** त्याच्यामध्ये अस आहे की जर हे काम करण्यासाठी आपण निविदा प्रक्रीया सुरू केली होती नाही झाल्या ४२ कोटींमध्ये काही तांत्रिक अडचण आली तर आपण मनपा निधीमधुन करू शकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आता ते काम होत नाहीये आणि आता भरपुर वर्ष झालेना आमच्याकडे पाणी येत नाही ना साहेब.

**मा.आयुक्त :-** याच्याबाबत माझी सभागृहाला अशी विनंती राहील की , आपल्याला या सगळया गोष्टी करायच्या आहेत त्यामुळे आपल्याला हे प्राधान्यक्रमाने करण आणि मनपा निधीमध्ये हे काम करण्याच्या दृष्टीने करण्याचे प्रयत्न आहे याच्यामध्ये प्रशासनाचं काही दुमत नाहीये कारण हे काम करण आवश्यक आहे आणि दुसर असे की आपल्याकडे जो पर्यंत निधी उपलब्ध होत नाही तोपर्यंत आपल्याला फक्त थोडीशी ॲडजेस्टमेंट करावी लागेल . आणि मग ४२ कोटींचा

आपला पाठपुरावा चालु आहे आपण सगळेजण प्रयत्न करतोय आणि जर तो निधी आला तर मग आपला ताणही कमी होईल आणि जर नाहीच प्राप्त झाला तर मात्र मग आपल्याला आपल्या निधीमधुन करावे लागेल.

**श्री.दिलीप पोकळे :-** नाही, आमच म्हणण अस आहे की, अमृत योजनेचे काम आणि आमच्या प्रभाग क्र.१ आणि २ शिवाजी नगर परिसरामध्ये अमृत योजना आणि ड्रेनेजच किती काम झालेल आहे. याची माहिती द्या.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** अमृत योजना हि पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत काम सुरू आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** नाही नाही, आम्हाला जे सांगितल जात की, अमृत योजना आणि ड्रेनेजच काम झालेल आहे शिवाजी नगरमध्ये जे काम सुरू आहे ते म्हणता की आता कनेक्शन देऊ. मग त्याच्यानंतर रस्ते गटारी प्रस्तावीत करता येतील. त्याच्यानंतर रस्ते होतील. आम्हाला तो कार्यकाळ किती लागेल कसा लागेल, आम्हाला आता पाहिजे. हाच पाच सहा वर्षापासुन विषय चालु आहे. ड्रेनेजच काम झालेल आहे. आमचे रस्ते गटारींच काय ? चालायला रस्ते नाही. तुम्ही तेथे पाय ठेऊ शकत नाही वार्डात. पुर्ण वार्डामध्ये रस्ते नाही. जाता येता येत नाही. अमृतच आणि ड्रेनेजच कारण किती दिवस सांगायच आम्ही लोकांना, तुम्ही मला सांगा, अमृतच आणि ड्रेनेजच काम पुर्ण झाल का आमच्या वार्डात.

**श्री.नितीन बरडे :-** जाऊ द्या शांततेत रिटायर होऊ द्या खडके साहेबांना.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आपण हे जे काम दिलेले आहे त्याला आपण ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदत दिलेली आहे. आणि ड्रेनेज चे जे काम आहे ते तसे मी कळविल.

**श्री.दिलीप पोकळे :-** किती दिवस लागतील.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आढावा घेऊन सांगतो,

**श्री.दिलीप पोकळे :-** अरे ऐवढ महत्वाचा विषय सिरियस आहे आणि तुम्ही म्हणतात आढावा घेऊन सांगातो. तुम्ही तर होते ना पाणी पुरवठा विभागात तर आता कोणाचा आढावा घेता.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आता दिड वाजता मिटींग घेतली आहे

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ दोनच मिनीट, माझ्या वार्डामध्ये पाण्याच्या टाकीच काम पुर्ण झालेल आहे. २५ टक्के काम बाकी आहे. तुमचे लोक असे म्हणतात की, जो पर्यंत पाण्याची टाकी होत नाही तो पर्यंत तुम्ही लोकांना कनेक्शन देणार नाही का ? अमृतच्या लाईन टाकलेली आहे, तुमच्या टेस्टींग सुध्दा झालेल्या आहे. कनेक्शन सुध्दा दिलेले आहे. लोक पैसे सुध्दा भरायला तयार आहे. मग आता काय करायचे सांगा.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** त्यांना कनेक्शन देणार आहे आपण अमृतच्या योजनेमध्ये ते कनेक्श्न देण्याच जे काम आहे त्या भागात ७५००० हजार कनेक्शन आहेत त्यामध्ये काही तरी काम त्यांनी केलेले आहे .४ दिवसांपुर्वी आपण त्यांच्या अधिकारी व आयुक्त साहेबांसोबत मिटींग घेतली होती व ते काम पुर्ण करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी हे म्हणतो की ज्या प्रभागामध्ये लाईन टाकलेली आहे अमृतची, पण त्या लोकांना प्यायला पाणी नाही तेथे, ते नगरपालिकेची वाट पाहत आहे, ते कनेक्शन घ्यायला तयार आहे. तुम्ही तुमचे अधिकारी पाठवा. मी आजच तुम्हाला २०० कनेक्शन देतो नळाचे. तुम्ही त्या लोकांना पाणी का देत नाही. तुम्ही ते टाकीची वाट का पाहता.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, मी आपल्या वतीने आयुक्तांनाही बोलु ईच्छितो, संपुर्ण जळगांव शहराच्या दृष्टीकोणातुन महत्वाचा असलेला शिवाजी नगर उड्डाणपुलाचा विषय, बांधकाम हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन सुरु आहे. परंतु आज जवळपास ५० हजार पेक्षा जास्तच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने शिवाजी नगरचा एक मोठा हिस्सा या शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडला जातो. निव्वळ फक्त हे ईलेक्ट्रीकचे पोल स्थलांतरीत करण्याच्या संदर्भातील एक वाद आहे की, हे ईलेक्टींकल पोल हे कोणी स्थलांतरीत करावे. सार्व.बांधकाम विभाग म्हणतो की ती आमची जबाबदारी नाही. महानगरपालिका म्हणते त्या निविदा प्रक्रिया संपुर्ण सार्व. बांधकाम विभागाच्या माध्यमातुन राबविण्यात आलेली असल्याने, ती आमची जबाबदारी नाही. महावितरण म्हणतो की, ती आमची जबाबदारी नाही. महावितरणच म्हणण आहे जो पर्यंत आम्हाला पैसा मिळणार नाही. तो पर्यंत आम्ही त्याची निविदा प्रक्रिया राबविणार नाही.

अश्या पध्दतीने आज जवळपास दोन वर्ष होऊन गेले कामाला सुरुवात होऊन, ती मुदत संपुष्टात आली असेल किंवा संपुष्टात येईल. मुदतवाढ ही मिळेल त्या बद्दल ही वाद नाही. परंतु मोठया लोकसंख्येच्या भागाला अत्यंत गैरसोय होणारी अवस्था तेथे झालेली आहे. रेल्वेलाईन ओलांडुन अक्षरश: जिव धोक्यात टाकुन आज हजारो नागरीक रोज या शहरी भागात येत असतात. मध्यंतरी काळात रेल्वेच जे ओवर ब्रिज होत. त्याच्या मधुन काही मंडळी वाहतुक करायची परंतु रेल्वेने सुध्दा त्यांची वाहतुक बंद केल्यामुळे अक्षरश: नागरीक रोज जिव धोक्यात टाकुन प्रवास करीत आहे. आणि या विषयाच गांभिर्य कोणीच समजुन घ्यायला तयार नाही. अश्याच पध्दतीने प्रत्येक विभाग एक दुसऱ्यांकडे बोट दाखवत असेल. आणि प्रकल्प रेंगळला जात असेल. प्रकल्पामध्ये समजा दरवाढ ही असेल. प्रश्न दरवाढीचा नाही. प्रश्न कामाच्या मुदतीमध्ये काम मार्गी लागण अत्यंत महत्वाच आहे. कारण तो शहराच्या दोन भागांना जोडणारा सर्वात महत्वाचा पुल आहे. परंतु याच्या बाबतीत महानगरपालिका प्रशासन असेल किंवा महावितरण असेल, जिल्हा नियोजन असेल किंवा

सार्व.बांधकाम विभाग असेल. अश्याच पध्दतीने एक दुसऱ्याकडे बोट दाखविल जात असेल. तर मला सांगा सामान्य नागरीकांचा याच्यामध्ये काय दोष आहे. तो आर्धा भाग माझ्या प्रभागाला जोडला जातो, आर्धा भाग सन्मा. सदस्य नवनाथ भाऊ असतील, पोकळे साहेब असतील, गायत्री शिंदे असतील या सगळयांना जोडणारा भाग आहे. परंतु त्याच गांभिर्य कुठल्याच प्रशासनाला नाही. आपण आपली जबाबदारी म्हणतो की, त्या कामाची निविदाच सार्व.बांधकामाने केल्या असल्या कारणाने महानगरपालिकेचा त्याच्याशी संबंध येत नाही. महावितरण म्हणते पोल शिफ्टींगचे पैशे मिळाल्या शिवाय आम्ही पोल शिफ्टींग करणार नाही. सार्व. बांधकाम विभाग म्हणतो आम्हाला निविदा फक्त पुल उभारण्याच्या संदर्भातली आहे. मग त्याच्यात येणारे अडथळे दुर कोणी करावे आणि अस हे किती दिवस चालेल. नाही तर ते वर्षांमध्ये मोजावे लागेल काही कालावधी नंतर. म्हणजे शहराच्या दृष्टीकोणातुन हा एक गंभिर असा प्रश्न आहे. लोकप्रतिनिधींनी, प्रशासनाने किंवा जेथे जेथे आमची गरज असेल तेथे आम्ही सुध्दा मदत करायला तयार आहोत. परंतु अश्या पध्दतीने त्या गंभिर समस्या या शहराच्या, याच्यावरती कुठे तरी लक्ष केंद्रीत करणे अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त :-** पाणीपुरवठा असेल किंवा बांधकाम असेल याची एक पध्दत आपण ठरवुन घेवु किंवा निविदा प्रक्रीयेचा भाग असेल तर आपण ते एकदा समजुन घेवु आणि आता त्याचे काय स्टेटस आहेत हे मला माहिती नाहीत पण याबाबतीत जो पाठपुरावा आपल्याला करावा लागणार आहे त्याच्याबद्दलचं आपण एकदा सर्वांच म्हणण ऐकुण मग आपण त्याच्यावर निर्णय घेवु जर समजा आपल्यास शहरातल्या हया सगळया गोष्टी करण्यासाठी जर खर्च करावा लागणार असेल त्याच्यामध्ये काही टेंडर वगैरे असेल तर किंवा एजन्सी नेमायची असेल तर याला तो विषय येणार आहे आणि जर समजा रेल्वेच्या जागेमध्ये ते येत असेल तर मग आणि रेल्वे तस करणार नाही तसेच महावितरण किंवा महापालिका या दोघांनाही योग्यतो निर्णय घ्यावा लागेल . याच्यात सर्वसाधारण आपण जर बघीतल तर ईलेक्ट्रीक पोल शिफ्टींग असेल किंवा कोणते पोल शिफ्टींग करायचे असेल तर महावितरणला महापालिका पैसे देतेच. तर ही त्याची प्रचलित पध्दत आहे. कदाचित ते आपल्या महापालिकेला परत देईल पण आपण तो विषय समजुन घेवु आणि मग त्याच्यामध्ये आपल्याला महापालिकेला निर्णय घ्यावा लागणार आहे. तो आपण घेवु

**श्री.नितीन लढढा :-** ती निविदा प्रक्रिया जी आहे ना ती लवकरात लवकर राबविण्यात यावी.

**श्री.दिलीप पोकळे :-** आम्ही याबाबत महासभेत व स्थायी समिती मध्ये वारंवार हा विषय मांडलेला आहे. म्हणून सर्वांची विनंती आहे की कोरोना मध्ये व्यस्त झाले किंवा निधी नाही परंतू सदस्यांचे कोणीही ऐकत नाही शहरामध्ये रस्ते नाही आरोग्य नाही सर्वांना माहिती आहे. आणि माहिती देण्याची गरजच भासत नाही. लोक आम्हाला भेटतात लोकांकडे आम्हाला जाव लागत साहेब .

**मा.सभापती :-** याच्या संदर्भात पोकळे भाऊ आपण चर्चा करूया .

**नगरसचिव :**- सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** एक मिनिट ताई मला एक विचारायचे आहे , मागच्या सभेत दोन नंबरचा विषय होता त्याची माहिती दिली तर बर होईल मागे मी अर्ज दिला होता ती माहिती आली नाही.खरेदीचा विषय होता तो.

**मा.आयुक्त :-** पुढच्या बैठकीला सादर करण्यात येईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.०९/ दि.२१/०५/२०२० अन्वये नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.१७६/१, १७६/२ पिंप्राळा शिवार येथे कॉक्रींटचे रस्ते तयार करणे कामी मक्तेदार श्री.योगराज गणेश पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दरानुसार दर स्विकारुन रक्कम रु.२४,७४,८५३/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.११/ दि.२१/०५/२०२० अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१७ लक्ष्मीनारायण नगर ते राम नगर या भागास जोडणाऱ्या नाल्यावर पुल बांधकाम करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१९,५५,३२२/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.१८/ दि.२३/०६/२०२० अन्वये नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०३ मधील जुना असोदा रस्ता व जुना खेडी रोड येथे आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ६.३०% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१८,६२,११३/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.२०/ दि.२३/०६/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.०६ मेहरुण न.र.यो.क्रं.२ अंतिम भुखंड क्रं.४८७ आरक्षित जागेस कुंपन भिंत बांधणे कामी

मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.५,४६,२५१/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.२३/ दि.२६/०६/२०२० अन्वये नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१३ नेहरु नगर स.नं.४१५ ओपनस्पेस मध्ये क्लब हॉल बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.५१% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.११,१५,९३१/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.०८/ दि.२१/०५/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.११ पिंप्राळा शिवार गट क्रं.१४०/२,१४०/१क, १२९, १३० महाविर किराणा परिसरात नविन आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,९९,४२३/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.२४/ दि.३०/०६/२०२० अन्वये नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१० पिंप्राळा गट नं.३०३, ३०४ गणपती नगर परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील आसाराम सोनवणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,०८,००१/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.२९/ दि.१४/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.०८ पिंप्राळा रोड द्रोपदी नगर पेट्रोल पंपच्या बाजुला गल्लीत आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.रुपेश ललित चोपडा यांचे निविदा रक्कमेपेक्षा ५.५५% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.६,४५,२५५/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.२७/ दि.१४/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.०९ गट क्रं.३४ प्लॉट नं.३४ बेंडाळे नगर (मुक्ताई नगर) येथे ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे बाबत मक्तेदार श्री.शशिकांत गोविंद कोल्हे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८.६९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.४,६१,४७३/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.३३/ दि.२१/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्र.०१ मध्ये ठिकठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बन्सीलाल धामणे, जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.६,६८,४१४/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.३४/ दि.२७/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.६२,६३,६४ विदयुत कॉलनी परिसरात आर.सी.सी.गटार बांधून स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.वरुन शिरीष पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,०८,५०८/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.३५/ दि.२८/०७/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्र.१९ सुप्रिम कॉलनी गट नं.१६२/१ खुल्या भुखंडास कंपाऊंडवॉल करणे कामी मक्तेदार श्री.शशिकांत गोविंद कोल्हे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०.६९% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१७,८२,३२१/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.०३/ दि.२९/०६/२०२० अन्वये मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.१ अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रं.१ मधील शिव शंकर कॉलनी हनुमान मंदिर १, गेंदालाल मिल मस्जिद १, दुध फेडरेशन रोड बौध्द विहार १, महाविर नगर १, वार्ड क्रं.२ मधील शिवाजी नगर स्मशान भुमी १, क्षत्रिय मराठा मंगल कार्यालय १, वार्ड क्र.५ मध्ये विविध ५ ठिकाणी, वार्ड क्र.६ मधील स्वामी समर्थ केंद्र प्रताप नगर १, टागोर नगर पोलीस लाईन जवळ १, वार्ड क्र.७ गणेश कॉलनी पेट्रोल पंम्प जवळ साईबाबा मंदीर १, शिक्षकवाडी बगिच्या जवळ १, नवसाच्या गणपती जवळ १, वार्ड क्र.८ वैष्णवी देवी मंदीर भोईटे नगर १, खोटेनगर सुविधा प्रोव्हिजन १, आनंद कॉलनी (खोटेनगर परिसर) १, वार्ड क्र.९ मधील स्वामी समर्थ केंद्र निवृत्ती नगर १, वार्ड क्र.५ मधील व.वा.वाचनालय जवळ १, वार्ड क्र.१ मधील गट नं.२३८ शिवाजी नगर १, पटेल वाडी येथे ३ ठिकाणी, एन.३२ ए.महाविर नगर १, वार्ड क्र.६ रोज गार्डन कोर्टच्या मागे १, इत्यादी विविध ठिकाणी एकुण २८ सोलर स्ट्रीट लाईट (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतके सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१८,५१,६२०/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.१३/ दि.१४/०८/२०२० अन्वये (कोविड-१९) चा प्रादुर्भाव वाढत असून शहरात बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने अशा रुग्णांना स्वतंत्र रित्या उपचार करणे कामी स्थापन केलेल्या कोविड केअर सेंटर

मधील रुम आणि शौचालय, बाथरुम, पॅसेज व परिसर स्वच्छ ठेवणे कामी दि.१५/०८/२०२० ते ३१/०८/२०२० पर्यंत प्रती दिवस १०० कामगार पुरविणे कामी मक्तेदार मे.दिपक उत्तराधी अमरावती यांचे मंजूर दरानुसार रक्कम रु.८,४६,४१६/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र.०४/ दि.२९/०६/२०२० अन्वये मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.३ अंतर्गत वार्ड क्र.१३ मध्ये नागेश्वर कॉलनी ओपन स्पेस, वृदांवन कॉलनी ओपन स्पेस, रायसोनी नगर साई विहार, अंजनाबाई प्रभाकर सोनवणे यांच्या घरासमोर, वार्ड क्र.१४ श्री.स्वामी समर्थ केंद्राजवळ, बांधावर हनुमान मंदिर जवळील चौक, सन्मा. सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांच्या घरासमोर, तडवी समाज मंदीर, यादव देवचंद पाटील मेहरुण, वार्ड क्र. १५ मध्ये पटेल गल्ली मागील वाडा, नारायण सोमा महाजन यांच्या घरासमोर, मोहंमदिया नगर ओपन स्पेस, गांव दरवाजा मेहरुण, वार्ड क्र.१७ मध्ये धनदाई मंदिर सुप्रिम कॉलनी, वार्ड क्र.१८ मदरसा गेट मेहरुण, रजा कॉलनी चौक मेहरुण, कब्रस्तान जवळ मेहरुण, रमाबाई आंबेडकर शाळेजवळ, वार्ड क्र.१९ नवनाथ मंदिरा जवळ, मयुरेश्वर मंदिराजवळ रामेश्वर कॉलनी, वंजारी वाडा सुप्रिम कॉलनी, मंगलपुरी नक्षत्र गार्डन ईश्वर चौधरी यांचे घरावजळ इत्यादी विविध ठिकाणी सोलर स्ट्रीट लाईट (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे मक्तेदार लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतके सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,५४,८४४/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र.०५/ दि.२९/०६/२०२० अन्वये मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.४ अंतर्गत वार्ड क्र.०९ मध्ये हनुमान मंदीर शंकरआप्पा नगर, शंकर मंदीर ओमशांती नगर, साईबाबा मंदीर गुरुदत्त कॉलनी,, वार्ड क्र.१० मध्ये सिध्दार्थ नगर हुडको, रुपल महाराज मंदीर मयुर कॉलनी, कब्रस्तान गट नं.२११, २१२, गणपती मंदीर मयुर कॉलनी, वार्ड क्र.११ मध्ये गजानन महाराज मंदीर, जिजामाता शाळेमागील गल्ली कमलाकर देवरे यांचे घरासमोर, शिव मंदीर भुषण कॉलनी, मुंदडा नगर ओपन स्पेस, वार्ड क्र.१२ मध्ये मरीमाता नगर, समता नगर, पुजा अपार्टमेंट समोर, मंदीरा जवळ, एम.जे.रोड गणपती मंदीराजवळ, ओकांरेश्वर मंदीराजवळ, वार्ड क्रं.११ बिस्मील्ला चौक हरिविठ्ठल नगर, वार्ड क्रं.११ हरिविठ्ठल नगर इ.विविध १८ ठिकाणी सोलर स्ट्रिटलाईट (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतके सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.११,९०,३२७/- मात्र खर्चाची संविदा.

१७. प्रशासकीय आदेश क्र.०६/ दि.१३/०७/२०२० अन्वये मा.आ.श्री.चंदुभाई पटेल विपस यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत विदयुत विभाग यु.क्र.२ अंतर्गत वार्ड क्र.०२ मध्ये श्रीराम चौक, शिवशंकर नगर मोहन टाकी जवळ, वार्ड क्र.३ मध्ये शिवाजी महाराज पुतळा खेडी, तळेले कॉलनी दशरथ नगर मेनरोड, DNX कॉलेज मनुदेवी अपार्टमेंट मन्यार वाडा, वार्ड क्र.४ मध्ये आप्पाच्या घराजवळ, रथचौक हनुमान मंदीर, तेली चौक, गवळीवाडा कृष्ण मंदीर, वार्ड क्रं.६ मध्ये डांबरेआप्पा यांचे घरासमोर, गणेश नगर सबजेलच्या मागे, वार्ड क्रं.१६मध्ये वर्षा कॉलनी मंदीरा समोर, सम्राट कॉलनी येथे दोन, सटवाय मंदीर, वार्ड क्रं.१७ मध्ये महादेव मंदीर श्रीकृष्ण नगर, हनुमान मंदीर श्रीकृष्ण नगर, सावीत्रीनगर, लक्ष्मीनारायण नगर गट नं.५८ श्रीकृष्ण नगर गोपाळ पुरा, ज्ञानदेव नगर प्लॉट नं.३२ गट नं.७० इ.विविध २२ ठिकाणी सोलर स्ट्रीट लाईट (दोन पॅनल) उभारुन लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतके सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,५४,८४४/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**